## ३) आचार्यांच्या मुलाखतीच्या आधारे प.पू. गुरुदेवांच्या शैक्षणिक विचारांचे विश्लेषण :-

प्रस्तुत संशोधनांतर्गत आधुनिक शिक्षण व प.पू. गुरुदेव यांचे शिक्षण विषयक विचार यास अनुसरुन एक आचार्यांकरिता मुलाखतीचे प्रारुप बनविण्यात आले. आचार्यांच्या वेळेची अननुकूलता विचारात घेऊन प्रस्तुत संशोधन मार्गदर्शकांनी संबंधीत मुलाखतीच्या प्रारुपावरुन आचार्यांकडून मते मागविली. त्या मतांचा आढावा पुढील प्रमाणे घेण्यात आलेला आहे.

प्रस्तुत आढाव्यात पुढील मुद्यांचा समावेश झालेला आढळतो.

- शिक्षणाची व्याख्या
- राष्ट्रीय एकात्मतेचे मूल्यवर्धनाचे शिक्षण
- व्यक्तिमत्वा सार्वजनिक विकास करणारे शिक्षण
- कला व मनुष्य घडविणारे शिक्षण
- बाल शिक्षण / तरुण तरुणींकरिता शिक्षण
- चारित्र्य घडविणारे शिक्षण
- मन / बुध्दी काय आहे?
- संस्कृतीची व्याख्या
- धर्माची व्याख्या
- गुरुची व्याख्या
- शिष्याची व्याख्या
- गुरु शिष्याचे नाते
- शिस्त व स्वातंत्र्य याची व्याख्या

## शिक्षणाची व्याख्या :-

फळबाग विकासात एखादा बुध्दीमान माळी बागेतील वेलींची वाढ अशारितीने वळवितो की त्या वेली आपणहून त्याला हव्या त्या ठिकाणी वळतात, वाढतात व जाळ्यावर चढतात. त्यामुळे माळ्याने ठरविल्याप्रमाणे बागेतील वेलीची जोमाने वाढ होते. शिल्पकार सुंदरतेचा विचार करुन दगडाच्या तुकड्यापासून हळूहळू घाव घालून कलाकृती निर्माण करतो, जी त्याच्या मनात असते. त्यामुळे पाहणाराच्या मनात हास्य निर्माण होते आणि हे काम फक्त कलाकाराच्या हातातील छन्नी व हातोड्यामुळे. लहानसे पिल्लू जे बुध्दीमान जातीतले आहे त्याला शिक्षक हळूहळू बुध्दीमत्तेची कामे शिकवत असतो. पुढे हेच कुत्र्याचे पिल्लू मोठमोठे गुन्हे शोधण्याचे कामी मदत करते, जो गुन्हा पोलिसांचे दृष्टीने चक्रावून टाकणारा होता.

थोडक्यात, ज्या गेष्टी कला, कौशल्याच्या विविध प्राण्याच्या मनात सुप्तावस्थेत असतात त्यापूर्ण प्रकाशात आणता येतात पण जर योग्यप्रकारे व तत्परतेने त्यांना शिकवण दिली तर. आपल्या समाजात वाढत्या वयातील तरुण, तरुणींना देशातील शिस्त पालन व अन्य जीवनमूल्ये ते योग्यप्रकारे पाळत नसल्याबात दोष दिल्या जातो. जर आपण बुध्दीमान व शिक्षित वर्गाची पाहणी केली तर असे दिसेल की या जीवनमूल्याचा पूर्णपणे ऱ्हास सध्याचे घटकेला झालेला आहे. जगाचा जुना इतिहास ह्यातील विविध संस्कृतीतील बारकावे जर अभ्यासीले तर त्यावरील उपाययोजना, आंतरिक घडामोडीने आलेल्या दिसतील. आजची तरुण मुले व मुली हे भविष्यातील घडामोडीचे वारसदार होणार आहेत. त्यांना योग्य वळण, मार्गदर्शन हवे आहे आणि हे काम आज वाढत्या वयातील मुलांचे आहे.

आपल्या संस्कृतीवर आधारीत शिक्षण महत्वाचे आहे. तसे ते दिले गेले तर तेच खरे शिक्षण होईल ! जे शिक्षण सर्व संधीचा उपयोग करुन घेण्यास असमर्थ आहे ते कुचकामी आहे. ते दुसऱ्याला उपयुक्त असले पाहिजे व ते आपले आपणास सुखद असले पाहिजे. शाळांतील सद्यस्थितीत आजचे शिक्षण हे शिक्षणच नव्हे तर ते फक्त सुचना देणारे आहे. शाळा व कॉलेजेस ह्या फक्त संस्था आहेत व शिक्षक व प्राध्यापक हे सूचना देणारे आहेत. संस्थेतील सूचना देणारे शिक्षकांना विद्यार्थ्यांना त्या ऐवजी कोणत्या गोष्टी कशा कराव्यात व कुटुंबाचे पालन पोषण करण्यासाठी अर्थाजन कसे करावे याविषयी ज्ञान द्यावे.

आज जर आपणास काही हवे असेल तर ते आपल्या जगण्यासाठी उदरनिर्वाहासाठी पैसा कमावणे आहे. आदर्श मूल्ये दुर्लक्षिली जात आहेत. चारित्र्याचा ऱ्हास झाला असून ते अशोभनीय स्तरावर आले आहे. आपणाला फक्त आरामदायी काम हवे आहे. कमीत कमी कामात जातीत जास्त पगार, पैसा. शाळेतील शिक्षकांनी आपल्या शाळेतील शिक्षकांना विद्यार्थ्यांना घडवितांना त्यांना शासकीय शालेय शिक्षणाबरोबरच मनाचा मोठेपणा, थोरपणा यांचे शिक्षण देऊन ते शिस्तप्रिय नागरिक तयार होतील याचे प्रशिक्षण द्यावे. नैतिक मूल्ये जपण्यावर भर दिला पाहिजे. या सर्वांचा उद्देश एवढाच आहे की विद्यार्थी शाळेतून बाहेर पडतांना फक्त शैक्षणिक दृष्ट्या बुध्दीमान व्हावयास हवा असाच नसून त्याने जबाबदार नागरिक म्हणूनही भविष्यकाळी पुढे यावे असा आहे. चारित्र्य संपन्नता, मोठ्यांचा थोरांचा आदर, देवा प्रति भक्ती, सचोटी, शिस्तप्रियता इत्यादी सद्‌गुणही त्यांच्यात यावयास हवेत.

आपण जर शालेय वातावरण सुदृढ ठेवले तर मुलांची वाढ होतांना त्याचा सर्व साधारण उत्साह मानसिक सवयी, बौध्दिक तत्परता व शारीरिक सुदृढता या बाबीकडेही लक्ष द्यावयास हवे व यावर भर द्यावयास पाहिजे आहे. शाळेतील व घरतील वातावरण जर पोषक ठेवले तर वरील प्रमाणे मुलांची आश्चर्यकारक प्रगती करता येईल. शिक्षक व पालक यांच्यातील संबंध हे अधिक जवळचे असावयास हवेत. तसेच शिक्षकांनी पाल्याचे आईला शाळेतील व्हरांड्यात येऊन वर्गातील वातवरणाशी समरस होण्यासाठी विनंती करुन आपसातील आपुलकी वाढवावी. शाळेचे स्वरुप घराचे मागील परस बागे सारखे किंवा घराचे विस्तारित स्वरुप आहे असे विद्यार्थ्यांना वाटले पाहिजे.

शिक्षकांनी प्रयत्न करुन विद्यार्थ्यावर होणारी नकारात्मक टिका टाळावी. या उलट त्यांच्यामधील सुप्त सद्‌गुण व प्रगतीबाबत तारीफ करावी. त्यामुळे शिक्षक विद्यार्थ्यांचे प्रेम मिळविल तसेच त्यांचा मानही राहील. अशा प्रकारे राष्ट्रनिर्मितीचे कार्यक्रम हे जवळजवळ लुप्त झाले आहेत. त्यामुळे अशा प्रकारच्या वैविध्यपूर्ण गोष्टीची शिक्षणात अत्यंत गरज आहे. आपण जर शांतपणे वसून चिंतन केले तर असे दिसून येईल की, आपण आपले भवितव्य फक्त विद्यार्थ्यांमार्फतच घडवू व सुधरवू शकतो. हेच विद्यार्थी भविष्यातील पुढारी आहेत. त्यामुळे त्यांना उद्याचे जगाला तोंड देण्यासाठी पुढाकार घेण्यास व मार्गदर्शन करण्यास तयार करावे.

अशा प्रकारचे शिक्षण विश्वासपूर्वक सुरु केले आहे व भवितव्यातील पिढीला परिपूर्ण बनवेल, असे शिक्षण त्यांची आंतरिक मूल्ये व बाह्य मूल्ये यांच्यात विजय मिळण्यास उपयुक्त ठरेल. अशा प्रकारे सर्वसमभावाने दिलेले शिक्षण मुलांना आपल्या धंद्यात व्यवसायात तसेच जीवन मूल्ये घडविण्यास समाजातील उत्तम पुरुष होण्यास उपयुक्त ठरेल.

## व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास करणारे शिक्षण :-

देश हा विविध प्रकारच्या व्यक्ती नागरिकांपासून तयार होतो. जर नागरिक कार्यक्षम, सुदृढ, कार्यमग्न व निस्वार्थी असतील तसा देश मोठा होतो. पण जर माणसे स्वार्थी, चारित्र्यहीन, आळशी व लाचखोर असतील तर ते दुःखी राष्ट्र समजावे. व्यक्तिचे विमोचनात राष्ट्राचे विमोचन व प्रगती संम्मीलीत आहे. हे वातावरणातील सुदृढतेसाठी अतिशय उपयुक्त आहे. तसेच वाढत्या वयातील मुलांसाठी शक्तीदायक आहे.

मुले ही शाळांपेक्षा प्रात्यक्षिकाद्वारे लवकर समजतात. जर आई वडीलांजवळ जीवनमूल्ये असून ती सुशिक्षित असतील तर त्यंची वागणूक ही अशा प्रकारच्या उच्च जीवनमूल्यानी परिपूर्ण असावी. अशा प्रकारच्या उदात्त वातावरणात राहणारी मुले, पालक, शिक्षक व शिक्षणसंस्था, शाळा यांच्यात आता आमुलाग्र बदल व्हावयास हवा. याकडे आपण गेली हजारो वर्षे दुर्लक्ष करीत आलो आहोत. जागतिक स्तरावर विचार करण्याची प्रक्रिया पूर्णपणे बदलली असून ही एक दुःखद अनिष्ट प्रकारची दुर्घटना आहे. त्यामुळे नवनवीन प्रश्न निर्माण झाले असून परिस्थिती बदलली आहे.

यासाठी बदल आवश्यक असून लहापणीच मुलांना समजून घेतले पाहिजे व त्यांच्या आवडी निवडीचा अभ्यास करुन योग्य मार्गदर्शन केले पाहिजे, असे आढळून आले आहे की मुलांच्या वयाच्या ६ वर्षेपर्यंत त्यांनी अनुभवलेले विविध विकार, संस्कार हे त्यांचे व्यक्तित्व घडविण्यास फार मोठ्या प्रमाणात कारणीभूत होतात. याकरिता हे महत्वाचे आहे की, त्यांना पोषक असे घरगुती वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. आयुष्यातील एखादी घटना किंवा प्रसंग किंवा प्रयोग, अनुभव हा त्या त्या पाल्याचा शिक्षक म्हणून उपयुक्त ठरु शकतो जर हे खुल्या मनाने व ग्रहणशील वृत्तीने केलेले कार्य असेल !

शिक्षण म्हणजे फक्त शाळेत जाणे व पदवी मिळविणे हाच अर्थ नाही. अशाप्रकारचे आत्मियता असलेले व जवळीक असलेले वातावरण मुलाचे व्यक्तिमत्व घडविण्यास पोषक आहे. मुलांमध्ये कोणत्याही प्रकारचे गौणत्व निर्माण न होण्यासाठी चांगल्या वागणूकीचे वातावरण निर्माण करीत रहावे. त्यामुळे त्याच्यातील सुप्त गुणांचा विकास होऊन मनुष्याचे एकमेकांशी असलेल्या नात्याची त्यांना जाणीव होईल. मुलांचे बाबतची शिस्त ही त्यांचे व्यक्तिमत्व विकासातील अडथळा ठरु नये तसेच ही बाहेरुन त्यांचेवर लादलेली घटना आहे असे त्याला वाटू नये. त्यामुळे मुलात त्याचेकडे असलेली उपजत ऊर्जा रोखली जाऊ नये.

प्रेमाने व सुरक्षितपणे आपल्या पाल्याची वाढ कशी करता येईल याबाबत पालकांनी जाण ठेवावी व खबरदारी घ्यावी. पालकांनी काळजी घेतली पाहिजे की आपल्या पाल्याने शिकतांना पालक व पाल्य यांचे अग्रपणाचे नाते स्विकारावयास हवे. परस्परातील प्रेम, आदर व शिस्त हे माणसातील संबंध व या व्यक्तिमत्व विकासास आवश्यक बाबी आहेत. शिक्षणाने स्वतंत्र अस्तित्वाचे मजबुरीकरण होते तसेच व्यक्तिमत्वाचा घडविण्याकडे उपभोग होतो. शालेय शिक्षण हे मुलांसाठी वास्तविक आपलेच घराचे वातावरणाचे विस्तारिकरण आहे. मुले नवीन जगतात प्रवेश करीत असतांना नवीन मित्र मंडळ व ज्येष्ठ व्यक्तींचे सहवासात (जसे शिक्षक व उपदेशक) येतात. त्यामुळे सध्या त्यांचे जवळ असलेली जीवनमूल्ये बळकट होतात व नवनवीन मूल्यांची वाढ होते. आवडी-नावडी निर्माण होतात. माहिती करुन घेण्याची इच्छाशक्तीचे बाजारीकरण होते व मुलाचे स्वत:चे व्यक्तिमत्व तयार होते.

व्यवस्थित, योग्य शिक्षणाने शिक्षण प्रकाराने मुलाचे मानसिकतेला वळण लावता येते. कोणत्याही कार्यात सखोल ध्यान देणे, निर्धार आणि सातत्य ही जीवनमूल्येच वाढत्या वयातील मुलांना पोषक असतात. शिक्षण म्हणजे फक्त शाळेत जाऊन पदवी प्राप्त करणे इतक्यापुरते मर्यादित नाही. मनाची आर्द्रता, कुलीनता, समुदाय स्वभाव, उच्च पदवी हा शिक्षणाचा खरा अर्थ आहे. भविष्यातील जगताची मुले ही आधारभूत आहेत. मानवतेचे घडणकार आहेत. पालक व शिक्षक यांचे कर्तव्य आहे की, या मुलांचे भवितव्य भारतीय उच्च संस्कृतीला अनुरुप असे बनवावे. या तरुण मुलांचे मनामध्ये मानवी मूल्यांचे बीजारोपण करावे आणि आसपासचे वातावरण असे असावे की त्यांनी बीजारोपण केलेल्या मनांमध्ये नियंत्रितपणे

व शिस्तीने अंकुराचे निर्माणीकरण व्हावे. अशा रितीने व्यवस्थितरित्या, प्रेमाने व आपुलकीनी वाढविलेल्या या अंकुराचे फुललेलया वृक्षामध्ये रुपांतर होईल. त्यामुळे भाईचारा, जागतिक प्रेम, शांती, सौंदर्य व या वृत्ती व परिपूर्णतिची फुले उमललेली दिसून येतील.

## समृध्दतेचे नैतिक मूल्यांचे सधनीकरण बौध्दिक वाढ करणारे शिक्षण :-

आपल्यातील प्रत्येकजण हा जीवनाचे लक्ष्य ठरवूनच आला आहे. त्यामुळेच आपल्यातील प्रत्येक विचार हा या बौध्दिक विचारानेच आत्यंतिक व रंगून गेलेला आहे. हे सर्व विचार आपआपसातील जीवनमूल्ये उद्युत करण्यासाठी प्रगट होतात. गेल्या काही वर्षात ही जीवनमूल्ये अमेरिकेमध्ये अतिशय लोकप्रिय झालेली आहेत. मूल्याधारित शिकवण हेच आर्थिक घडामोडीवर आधारीत आहे. मूल्याधारिक राजकारण, वैवाहिक, संसारिक जीवन, परिषदा, सभा यामध्ये जीवन मूल्याबाबत विविध विद्यापीठात परिसंवाद आयोजित करण्यात येतात.

## जीवनमूल्ये म्हणजे काय ?

तर त्याचे पालन करतांना प्रत्येकजण कशा प्रकारे उद्दिपित होतो व शेवटी कशाप्रकारे तो बाहेरील जगात अंमलात आणतात हे महत्वाचे आहे. लहान मुलांसाठी जीवनमूल्ये ही त्यांचे लहान वयातच रुजवावयास हवीत. कारण ही इतकी नाजूक असतात की मोठ्या माणसांना देखील ती उमजत नाहीत, जो पर्यंत एका विशिष्ट परिस्थितीत ती ठळकपणे मांडली जात नाहीत. त्यामुळे राजा हरिश्चंद्राची गोष्ट मुलांना सांगतांना ती मुले परिस्थितीचे गांभीर्य व आवश्यकता याचा पूर्णपणे अभ्यास करतात आणि ती राणी जेव्हा स्वत:चा मुलगा मृत्युमुखी पडल्यावर मुलाची आई त्याचे कलेवर (मृत शरीर) त्याचेकडे (राजाकडे) गाडण्यासाठी घेऊन येते तेव्हा राजा तिला म्हणतो, "मला क्षमा कर". पण यासाठी १० पैसे कर द्यावा लागेल. (कारण राजा हरिश्चंद्र या (मूल्यापायीच) स्मशानात चौकीदाराचे काम करीत असतो.) आपण सदर कर द्यावा. त्याची पत्नी म्हणते, परंतु माझे जवळ एक फुटकी कवडी सुध्दा (एक छदाम / पैसा) नाही. तेव्हा राजा म्हणतो आपण येथून बाहेर पडावे. कारण या स्मशानभूमीचे मालकाने मला कर वसूलीसाठी नेमणूक दिलेली आहे. करिता थोडे थांबवे व माझे मालक सकाळी येथे आल्यावर याबाबत त्याचेशी बोलणे करावे. त्यांनी जर प्रेत पुरण्याबाबत काहीही

आक्षेप घेतला नाही तर या प्रकरणाचा निकाल लागू शकतो. यावरुन राजा हरिश्चंद्र किती थोर खरा प्रामाणिक बोलणारा व सत्यव्रती सचोटीचा होता हे दिसून येते आणि अशी जीवनमूल्ये मुलांना पटतात. हे या गोष्टीवरुन दिसून येते. आपण जरी गोष्ट विसरलो तरी त्यामागील भावना / कल्पना कायम राहते. हीच खरी शिकवून मनावर बिंबविण्याची खरी पध्दत आहे. आजकालच्या आपल्या आधुनिक शिक्षणात आपण अशा प्रकारचे आदर्श शिकवित नाही. भरमसाट शिकविले जाते पण त्यामागील भावना / आदर्श शिकविले जात नाहीत.

अशा प्रकारच्या गोष्टी या इतिहासात जमा होण्यासाठी नसून जीवनमूल्ये व आदर्श मनात ठसविण्यासाठी असतात. अशा प्रकारचे शिक्षण दिसल्यास मुले आपल्या जीवनातील घडामोडी व वाटचाल तपासून पाहतील व त्या घडामोडी या नैतिक दृष्ट्या, सुंदर होत्या किंवा नाही हे तपासून पाहतील.

अशा मुलांपासूनच पुढे समाज तयार होत असतो. या समाजात वावरणाऱ्या अशा प्रत्येक व्यक्तीचे वागणे मग ता कोणत्याही प्रदेशातील मुले असोत किंवा कोणत्याही काळातील असोत. ह्यापासून समाजाची जडणघडण होत असते. त्यातून अशा विचारांनी प्रेरित झालेली मुले व त्यांचा समाज हा जीवन मूल्याधारित असतो. अशी उत्कृष्ट मूल्ये सांभाळल्यामुळे समाजाला दु:खापासून अलिप्त राहता येते. याकरिता म्हणजे अशा प्रकारे शिक्षण देण्यासाठी प्रथम आपणासच नवनवीन विचारांची मांडणी करावी लागेल व सर्व स्तरातील मुले या बाबत जागृत आहेत व मूल्यांचा अभ्यास करुन ती प्रत्यक्षात आणीत आहेत. याची खात्री करणे आवश्यक आहे व निरनिराळ्या गोष्टीच्याद्वारे ही जीवनमूल्ये रुजविली गेली असल्याची खात्री करणे आवश्यक आहे. या बरोबरच आपले पुराणांतील आदर्श गोष्टींचा यथायोग्य वापर करुन मुलांना शिकविता येतील. जीवनातील सत्य मूल्ये मुलांना उघड करुन गोष्टीद्वारे सांगितली नाहीत तर मुलांचे शिक्षण अपूर्ण राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

भौतिक सुखे व मूल्ये यांचा योग्य तो ताळमेळ राखून शिक्षण दिले पाहिजे. त्यामुळे जीवनाकडे पाहण्याची मुलांची सौंदर्य दृष्टी वाटेल व या प्रकारच्या गोष्टीरुपी शिक्षणाने त्यांचे व्यक्तिमत्व घडविण्यास हातभार लागेल. याद्वारे त्याच्यातील सुप्त असलेल्या गायन कला, नृत्य कला किंवा चित्र कला या गुणांना उजाळा मिळू शकेल आणि हे बक्षिसपात्र कृत्य होईल.

## राष्ट्रीय एकात्मतेचे शिक्षण :-

एका विशिष्ट भौगोलिक भागावर वास्तव्य करणारी, समुदायाने राहणारी लोकसंख्या म्हणजे काही राष्ट्र नव्हे तर ती एक फक्त लोकांचा समूह किंवा जमात म्हणता येईल. परंतु जर अशाच प्रकारचे समुदाय एका विशिष्ट कारणासाठी व कार्यक्रमासाठी एकत्र येऊन निर्धारपूर्वक एखाद्या व्यवसायासाठी उद्योगासाठी एकत्र येऊन राहतात तेव्हा असे दिसून येते की अशा समुदायाची राष्ट्राची भरभराट नजरेस येते. जोपर्यंत लोक वेगवेगळे राहत असतात व गटागटाने राहू लागतात ज्यांचा इतरांशी काहीही संबंध नसतो व ते फक्त स्वत:च्या गरजा पुरतेच मर्यादित राहतात व इतरांची पर्वा करीत नाहीत व सर्वाचे भले करण्याबबात विचारही करीत नाहीत, अशी माणसे किंवा मनुष्य समूहाचे केव्हाही राष्ट्र तयार होऊ शकत नाही.

आपले राष्ट्र उभारणीचे कार्यात अशा प्रकारच्या तुकड्यांनी / गटगटांनी राहणाऱ्या व एकमेकांवर सतत कुरघोडी करुन स्वार्थी कृती बाळगणाऱ्या व एकत्रित काम करण्याची व सहकार्य करण्याची वृत्ती नसणाऱ्या वृत्ती असणाऱ्या लोकांपासून राष्ट्रनिर्मिती करणे शक्य नाही. फक्त एकच गोष्ट जी आपणाला एकत्र आणू शकते ती म्हणजे दक्षिणेतील व उत्तरेतील भागातील लोकांनी एकमेकांना आपले मानले पाहिजे. त्यामुळे देशाची संस्कृती टिकून राहिल. वरील गोष्ट आजच्या राष्ट्र बांधणीस फार आवश्यक व उपयुक्त आहे यावर भर दिला पाहिजे व प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे.

विविध प्रकारच्या शास्त्रीय, आर्थिक व सर्वपक्षीय शास्त्रामध्ये वारंवार योजना तयार करण्यात येऊन त्या अंमलात आणण्याबाबत कसोशीने प्रयत्न केलेले आहेत. परंतु सदर योजना कुचकामी ठरल्या आहेत. त्यापासून देश बांधणीसाठी काहीही उपयुक्त अशी निर्मिती होऊ शकलेली नाही. अशा योजना फक्त पर्यावरण सुधारण्यास उपयुक्त ठरल्या त्यांचा वैयक्तिक लाभासाठी उपयोग झाला नाही व राष्ट्राला फायदाही झाला नाही. त्यामुळे अशा योजना यशस्वी ठरल्या नाहीत आणि त्यांचा राष्ट्र निर्मितीस काहीही उपयोग झाला नाही. अशा प्रकारच्या सामुहिक योजनांमुळे लोकांचा कुठलाही वैयक्तिक लाभ झाला नाही. त्यामुळे केवळ अशा योजना या प्रभाव पाडू शकल्या नाहीत व व्यक्तिंना त्यांचा काहीही उपयोग झाला नाही.

मग राष्ट्र उभारणीसाठी व्यक्तिंच्या लाभदायक ठरतील, ज्यामुळे आर्थिक उत्थान होईल व सामाजिक न्याय मिळेल त्याचबरोबर विज्ञानातील वाढ शक्य होईल व तांत्रिक ज्ञानात भर पडेल अशा योजना आणणे आवश्यक आहे. याचा अर्थ असा नव्हे की, राजकीय चळवळ आर्थिक नियोजन व वैज्ञानिक प्रगती यांचा त्याग करावा. या गोष्टी त्यांच्य त्यांच्या ठिकाणी योग्य आहेत. परंतु राष्ट्राचा कणा होऊ शकत नाहीत. राजकीय कार्यकर्ते त्यांची दुराग्रही मते मांडीत असतात त्यामध्ये देशप्रेमाची भावना नसते व पेटून उठविण्याची क्षमता नसते. त्यामुळे देशाची एकत्मता, उत्थान व उत्कर्ष यांचा या राजकीय प्रवृत्तीमुळे काहीही उपयोग होत नाही. यामध्ये मोठमोठी राष्ट्रे गर्तेत पडली असून त्यांचा विनाश झालेला आहे व त्यांचा नामशेष झालेला आहे. परंतु पुन:पुन्हा आर्थिक क्षेत्रात अर्थात आर्थिक नीति सुधारुन राष्ट्रीय संपत्ती वाढवून राष्ट्रास भौतिक समृध्दी आणतात. मग ती कोणत्याही दृष्टिकोनातून असेल. परंतु त्यामुळे लोकांचे चारित्र्यात व एकात्मतेत कुठलीही बळकटी येत नाही आणि काहीही साध्य होत नाही. यात सर्व लोकांना काहीही उपयोग होत नाही. त्याचप्रमाणे वैज्ञानिक प्रगती साध्य केल्याने मानवी जीवनात स्थैर्य निर्माण होत असेल तर ते उपयुक्त आहे. पण ते सारासार विवेकपूर्वक व प्रामाणिक असावे. अशा प्रकारे प्राप्त केलेले स्थैर्य तोपर्यंतच योग्य असते की जोपर्यंत मानव आपली नैतिक मूल्ये जपत असतो व माणसा माणसात भेद करीत नाही आणि मानवी संहारासाठी त्याचा वापर करीत नाही आणि हेच आपण आजकालच्या जगात सर्वत्र पहात आहोत. त्यामुळे अशा पध्दतीने प्राप्त केलेल्या प्रागतीक गोष्टी या मनुष्य जीवनास शाप ठरु शकतात नव्हे त्या विध्वंस करण्यासाठी कारणीभूत ठरतात. परंतु मनुष्याने त्याला प्राप्त झालेल्या या साधनांच्या मानवी कल्याणासाठीच वापर करणे अत्यावश्यक आहे आणि हेच आपण आज प्रत्यक्षात पहात आहोत.

कितीही प्रगती व सुधारणा झालेल्या असोत त्या विविध क्षेत्रातीलही असोत या जगातील लोक हे चारित्र्य संपन्नता आणि तत्वाने एकमेकांशी बांधल्या गेले आहेत. यासाठी त्याग भावनाही तितकीच महत्वाची आहे. परंतु हे सर्व एकत्र राहण्यासाठी एका विशिष्ट धर्माची अत्यंत आवश्यकता आहे. थोडक्यात स्वधर्म हे बंधनात ठेवण्यास कारणीभूत आहे. या स्वधर्म पालनामुळेच आपआपसातील बंधुभावाची नाती निर्माण होतात व त्यामुळे राष्ट्रीयत्वाचीही भावना निर्माण होते.

अशा रितीने एकत्र बांधल्या गेलेल्या नात्यामुळे राष्ट्र उभारणीस सहाय्यभूत ठरणारी भावना निर्माण होते व मानव आपल्यातील सर्वस्व पणाला लावण्याचा प्रयत्न करतो. यात तो स्वार्थ विसरतो आणि फक्त राष्ट्राला मजबूत करण्यास सतत झटत असतो. याचसाठी स्वत्वाची भावना विसरणे आवश्यक आहे व राष्ट्र उभारणीस व ते भरभराटीस नेण्याचे प्रयत्न करीत राहिले पाहिजे. म्हणजेच "एकमेका सहाय्य करु, अवघे धरु संपंथ !" या कारणानेच जागतिक शांतता व सुबत्ता लाभू शकते.

यासाठी जेव्हा आपण एकत्र जमतो व बसतो त्यावेळी देशाची घडण घडविण्याबाबत व सुखी जीवनाबाबत निश्चित रुपाने विचार झाला पाहिजे आणि हे सर्व आजकालच्या तरुण-तरुणींवर अवलंबून आहे. कारण उद्याचे तेच आधारस्तंभ व पुढारी आहेत. यासाठी आपण त्यांना योग्य दूरदृष्टी दिली पाहिजे व त्याचे मनावर हे बिंबविले पाहिजे की कोणतीही गोष्ट, योजना कार्यक्रम हे स्वत:पुरते मर्यादित न ठेवता ते सर्व समाज व राष्ट्र यासाठी असावयास हवेत. अन्यथ आपली अवस्था क्रूर कारस्थानी हिटलरप्रमाणे होऊन जाईल. ज्यामुळे संपूर्ण मनुष्य जीवन हे अंध:कारमय व उध्वस्त झाले होते आणि ही घटना दुसरे महायुध्दानंतरची आहे. हिटलरसारख्या दुर्लक्षित मुलाने सतत दु:खी व एकलकोंड्यात जीवन जगून जो एका विद्वान माणसाचा मुलगा होता, त्याने सर्व जगताला दु:खाचे खाईत लोटले.

कुठलेही लहान रोपटे जर योग्य दिशा देऊन लहानपणीच वळविले तर ते पुढील काळात निश्चितच सन्मार्गाला लागेल व त्याची सरळ वाढ होईल. त्याच्यावर सतत नजर ठेवली पाहिजे. रोपट्याची योग्य निगा राखून वाढ करता येते पण झाड मोठे झाल्यावर काहीही करता येत नाही. एकदा का झाड वाकडे झाले की त्याच्या फांद्या आपण सरळ करुन वळवू शकतो परंतु झाडाचा बुंधा सरळ करता येत नाही. यासाठीच तरुण/तरुणीला नियोजनपूर्वक व जपून शिकवून तयार केले पाहिजे. त्यांनी स्वत:च्या कोणत्याही विषयाचा अभ्यास करुन निर्णयाप्रत जावयास हवे. तसेच प्रत्येक गोष्टीबाबत निर्णय घेण्याची हिंमत दाखविली पाहिजे. यासर्व गोष्टी या उपजतच त्यांनी नियोजन करुन व दूरदृष्टी ठेवून करावयास शिकले पाहिजे. यामुळे समाजाप्रती असलेले त्यांचे प्रेम, आपुलकी व जबाबदारी दिसून येते. यातच त्यांचे राष्ट्रप्रेम सिध्द होते याचा अर्थ शासनास मदत करावी असा नव्हे.

तारुण्य व बाल याचा वापर चुकीचे मार्गाने वापरला जात नाही. याची दक्षता घेणे ही आपली आवश्यकता आहे. हा एक राजकीय प्रश्न आहे म्हणून त्याकडे डोळे झाक करुन चलाणार नाही. समाजातील दुष्टप्रवृत्ती निर्माण करणारी देखील माणसेच असतात आणि हीच माणसे पूर्वी मुले होती हे विसरता कामा नये.

## माणसाचे कलागुण वाढविणारे शिक्षण :-

आपण आपल्यात बदल करणे म्हणजे तुमचे लक्षात येईल की जगही बदलते आहे. हा एक प्रकारचा भौतिक विचार आहे. त्याद्वारे आपण विचार करतो की जगात बदल झाला पाहिजे. त्यामुळे मी सुखी होईन. गेली हजारो वर्षं आपण याच प्रकारे जीवन जगत आलो आहे. आपण जग सुंदर होण्यासाठी सारखे प्रयत्नशील आहोत. परंतु आपण अंतर्बाह्य सुंदर व्हावे, प्रमाणिक व्हावे असे कधीही वाटत नाही. यामुळे सुंदर जगात लोक राहतात पण ते स्वत: मात्र सडक्या मनाचे असतात. त्यामुळे संपूर्ण जगाचा विनाश होण्याचा संभव असतो.

जर एखादे डुक्कर आपले दिवाणखान्यात आणून रात्रभर ठेवले तर दुसरे दिवशी त्या खोलीची काय स्थिती होईल याचा विचार करा. तर ती दुसरे दिवशी डुक्कराचे विष्ठेने भरलेली असेल. कारण ज्या ठिकाणी डुक्करे राहतात ती जागा अतिशय घाणेरडी असते. अशा प्रकारचे बरेच लोक जिणे जगतात व जगाला ते सारखी नावे ठेवतात. परंतु प्रत्यक्ष स्थिती या उलट आहे. जगामध्ये वावगे असे काहीच नाही. आकाशातील सूर्य, चंद्र, तारे व जगतातील झाडे, झुडपे, जनावरे व पक्षी यांना या जगात राहण्याचा कुठलाही प्रश्न, अडचण नाही. परंतु हा प्रश्न बुध्दी असलेल्या मनुष्य प्राण्याला, निर्बुध्द माणसास आहे. याचे मुख्य कारण असे की मनुष्य हा निसर्ग नियमाप्रमाणे वागत नाही. तो स्वत:वर कुठलेही निर्बंध आणू इच्छित नाही. त्याला वाटले तसा वागतो व राहतो आणि यातूनच खऱ्या समस्या निर्माण होते. मग यातून आपण कसा बदल घडवून आणू शकतो? तर आपल्या शैक्षणिक पध्दतीत अमुलाग्र बदल घडवून आणणे यासाठी फक्त एखाद दोन पुरुष किंवा साधुसंत हे काम करु शकणार नाहीत. तर यासाठी जागतिक पातळीवरील एखादी संघटना, जशी यु.एन.ओ. इत्यादीची अत्यावश्यकता आहे.

याकरिता आपली शैक्षणिक पध्दती ही कालानुरुप सारखी बदलती असली पाहिजे. परंतु हा बदल करतांना मी असे म्हणत नाही की, सर्वच्या सर्व पुस्तके नव्याने लिहून काढावीत. कारण ही देखील तथाकथित विद्वानांनी (Rascals) कोणाच्यातरी मोठेपणाबद्दल लिहिली आहेत. तुम्हीही कृपाकरुन तसे करु नका.

खरं तर निव्वळ पुस्तके नव्हे तर आसपासचे प्रदूशित वातावरण हे देखील यास कारणीभूत आहे. हे वातावरण नेहमी उदात्त व सुंदर असले पाहिजे. आजकालच्या मुलांना याचा लाभ घेवू द्या. आईवडीलांनी आपआपल्या मुलामुलींना म्युझियममध्ये (संग्रहालयात /अंजनखान्यात) जरुर घेऊन जावे. कारण सध्याचे युगात ते जास्त झालेले आहेत. त्यामुळे या त्यांचे वाढत्या वयात त्यांना आंतरिक व बाहय सौंदर्याबाबत जाणीव नाही. पालकांनी याबाबतचे सखोल ज्ञान जरुन त्यांना करुन द्यावे. तसेच एकमेकांवर प्रेम करणे शिकवावे. त्यामु आनंदी व मोकळे वातावरण निर्माण होईल व त्यामुळे जीवनमूल्याचे त्यांना ज्ञान होईल. या गोष्टी बंदुकीचे धाकावर करता येत नाहीत. कम्युनिस्ट शासीत देशात याचा गेली ५५ वर्षे प्रयोग व वापर करीत आहेत.

आजकालच्या जमान्यात जवळ जवळ प्रत्येकाजवळ बंदूक असते. बदल हा कधीही बंदूकीचे धाकावर घडू येत नाही. हा बदल लहान मुलामुलींना हळूहळू शिकवण देऊन घडवून आणता येईल. ही काही पंचवार्षिक किंवा दशवार्षिक योजना नाही. ही एक अव्याहत व दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. कारण पागल व अस्ताव्यस्त झालेल्या या दुनियेला वठणीवर आणण्यासाठी दीर्घ काळ लागणे हे स्वाभाविक आहे. यासाठी विचार करण्याची व व्यवस्थित जगण्याची आणि तरुणांना या गर्तेतून बाहेर काढण्याची अत्यंत व तात्काळ गरज आहे. यासाठी आपल्या वेदांमध्ये परिपूर्ण माहिती दिलेली आहे. त्यांच्या अभ्यासाने मुलामुलींची बौध्दिक भूक पूर्णपणे भागविता येईल आणि आधुनिक काळातील या पाल्यांना सुमार्गाला लावता येईल. आजच्या युगातील आधुनिक माणूस हा आपल्या वाडवडिलांप्रमाणे नाही. ते म्हणत असत की, निव्वळ प्रार्थनेत बळ आहे. वायबल सांगते की, केवळ प्रार्थना करणे हे पुरेसे आहे. हिंदू संस्कृतीतील रामायण व भगवद्गीता हेच सांगते की, सर्व काही वंदनेत व प्रार्थनेत आहे. त्याकाळी यावर कोणीही संशय घेत नसे व नसते प्रश्न विचारीत नसे परंतु आजकालची मुले

प्रार्थना का करायची?, असा प्रश्न विचारतात. त्यामुळे निव्वळ प्रार्थना करा अस म्हणताच तुमची मुले विचारतील कशासाठी? याचे उत्तर तुमचे जवळ नाही. कारण तुमचे वाडवडिल तुम्हाला प्रार्थना करावयास सांगत व तुम्हीही ती आज्ञाधारक पणे प्रश्न न विचारता करीत असत. आता मात्र मुले विचारतात प्रार्थना म्हणजे काय? ही कुणासाठी करावयाची व कोणाची करावयाची? देव कुठे आहे? देव कोण आहे?

यावर आपण म्हणता ही तर भयंकरच मुले/मुली आहेत आणि यावर उपाय म्हणून तुम्ही त्यांना निघून जाण्यास सांगता व हा विषय तेथेच संपविता. हे पूर्णत: तुमचे अज्ञान आहे. जर तुम्ही त्यांना समजाऊन सांगू शकले असता की चर्चमध्ये कशासाठी जावयाचे आहे ! ते विचारतात आई ! तू म्हणतेच की देव सर्वत्र व सर्वात आहे पण तो तर या आपल्या घरात नाही ! आणि जर तो या घरात असेल तर तो माझे झोपण्याचे खोलीत नाही आणि जर तो माझे झोपण्याचे खोलीत असेल तर तो मग माझे ब्लॅकेटखाली नसेल ! तुम्ही उत्तर देता ते सर्वत्र आहे ! तो विचारतो असे जर आहे तर मी त्याला भेटायला चर्चमध्ये कशासाठी जावयाचे? तो सर्वत्र आहे. त्यामुळे देव माझे बरोबर आहे. जर मुलेमुली अशा रितीने बोलावयास लागली की आई म्हणते आजकालची मुले / मुली फारच भयंकर आहेत ! अगदी राक्षसासारखी आहेत. ती अशा रितीने विक्षिप्त आहे. मी त्यांना अशा प्रश्नाची उत्तर देण्यास समर्थ नाही. मुला मुलींना काय दूध म्हणजे गाईचा अंश नाही? होय ! हा अंश गायीच्या अंग प्रत्यंगात नाही काय? खरे आहे !

जर तुम्हाला थोडे दूध पाहिजे असेल तर तुम्ही मग ते तिचे कानातून, नाकातून किंवा तिचे शेपटीतून काढू शकता काय? कारण दूध हा गायीचा अंश आहे. आपण जर गाईचे शेपटातून दूध काढण्याचा प्रयत्न केला तर दूध येणार नाही. त्यासाठी तुम्हाला गाईचे खाली जाऊन तिचे स्तनातूनच दूध काढले पाहिजे. तसेच देवाचे अस्तित्व पाहण्यासाठी तुम्हाला चर्च, मस्जिद किंवा देवळातच जावे लागेल. त्या ठिकाणी अतिशय शांत वातावरण असून अत्यंत मन:शांतीला ती पोषक जागा आहे. या ठिकाणाचे वातावरणाने तुम्ही अति उच्च अशा स्थितीप्रत पोहोचण्याचे समाधान मिळवू शकता.

आपण असे ही म्हणू शकतो की, अशा गोष्टीला तरुण वर्ग तयार होईल. कारण त्यांच्या इतर प्रश्नांची उत्तरे आपण देवू शकलो नाही. आता हा काही त्यांचा गुन्हा नाही. आपण पिढ्यानपिढ्या चालणाऱ्या या परंपरेला धरुन असल्याने त्या मागची कारण परंपरा विसरलो होतो. आपले वेद-वेदांतांचा अभ्यास करा. याचा अर्थ आपण फक्त वेदांचाच अभ्यास करावा असे नाही. आपली बुध्दी जर विविध प्रश्न निर्माण करणारी किंवा शंका उपस्थित करणारी असेल आणि प्रत्येक गोष्ट तार्किकदृष्ट्या का व कशासाठी? कुठे? आणि केव्हा? अशा विचारसरणीची असेल तर त्यासाठी सखोल शास्त्रीय मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. आपली जुनी सर्व उपनिषदे हे तथ्य आपल्यातच पाहण्याचा प्रयत्न करीत असतात.

आपल्यात व वेदवेदांतात वास्तविक काहीही भेद नाही. कोणताही धर्मग्रंथ हा तुम्हाला एका अत्युच्च ठिकाणीच जरुर नेऊन पोहोचवेल पण त्यासाठी तुम्हाला तुमचा अभ्यास करणे आवश्यक आहे. कारण ते आत्मनिष्ठ विज्ञान आहे. फक्त माझे वडील उत्कृष्ट संगीतकार आहेत आणि मोठे आहेत म्हणून त्यांनी मलाही संगीत दिले असे म्हणणे हा भ्रम आहे. कारण की संगीत हे काही कपातील चहासारखे कोणालाही देता येण्यासारखे नाही. जास्तीत जास्त तुमचे वडील तुम्हाला संगीत शिकवू शकतात. परंतु त्यासाठी तुम्हाला बसावे लागेल व रियाज करावा लागेल. त्याचप्रमाणे आत्मिक वाटचाल करण्यासाठी प्रत्येकाला प्रयत्न करणे आवश्यक आहे. यासाठी आपल्या पाल्यांना त्या प्रकारचे वातावरणाची निर्मिती करुन देणे आवश्यक आहे. तसेच आवश्यक ती माहितीही देणे गरजेचे आहे. परंतु हे सर्व अत्यंत हळूवारपणे घडले पाहिजे. तसेच ते पाल्याचे अगदी लहानपणा पासूनच झाले पाहिजे. या मागचे तर्कशास्त्र हे आहे की, एकदा का असे संस्कार त्याचेवर लहानपणीच झाले तर ज्याप्रमाणे बदक पाण्याकडे धाव घेते त्यापमाणे ती बालकेही वैदीक विषयाकडे व त्यातून मिळणाऱ्या आनंदाकडे आकर्षित होतील.

या म्हणण्यात काही अर्थ नाही की, आजचा तरुण हा आत्मा हरविलेला आहे. याला कारणीभूत आपली झालेली दिशाभूल हीच आहे. तसेच आपण त्याला योग्य मार्गदर्शन करण्यास असमर्थ ठरलो आहोत. वेदांतामुळे आपणास योग्य ते ज्ञान प्राप्त होते हे मी आपणास आदर्श म्हणून सांगत नाही तर याचा प्रयोग मी स्वत: लहान मुलांवर करीत आहे. आमच्याकडील

जवळजवळ ६२ शाळांमध्ये ज्यात अगदी लहान, तरुण व मोठ्या मुलांचा समावेश आहे. त्या ठिकाणी तत्वज्ञानाचे अभ्यासावर भर देण्यात येतो. ते तत्वज्ञान नव्हे जे पाश्चात्य देशात शिकविले जाते. फक्त पाश्चात्य तत्वज्ञानावर चर्चा होते व ते ही फक्त बौध्दिक पातळीवर, त्याच्या बाहेर नाही. यासाठी तयार केलेली पुस्तके अतिशय उपयुक्त ठरतील आणि यासाठी मुलांकडूनही आवश्यक तो प्रतिसाद मिळत आहे. याचा लाभ बहुतांश विद्यार्थ्यांना झाला आहे व होत आहे. अशारितीने आमची शैक्षणिक वाटचाल सुरु आहे.

## बाल शिक्षण / तरुणांचे शिक्षण :-

आजची मुले ही संपूर्णत: सलग प्रकारची आहेत ती अधिक बुध्दीमान व सखोल ज्ञान असणारी आहेत. आपल्या सर्व सामान्य पालकांपेक्षा ही मुले जास्त चिकित्सक आहे. किंबहूना त्यांना आपल्या पालकापेक्षा जास्त ज्ञान आहे, माहिती आहे. त्यांनी चालू वेगाने पुढे जाणाऱ्या युगात जगता येण्यासाठी विशेष पध्दती, ज्ञान आत्मसात केले आहे. आधुनिक जगतातील विज्ञान व तंत्रज्ञान यांचा प्रसार यामुळे या बालकांसाठी पूर्वीपेक्षा आमुलाग्र बदल असलेले वातावरण आलेले आहे आणि या सर्वांशी त्यांना सामना करावयाचा असून त्यानुसार जगणे अत्यावश्यक आहे. त्याचे भोवती असलल्या या बदलेल्या जगात जगण्यासाठी किंवा आपले अस्तित्व कायम ठेवण्यासाठी त्यांनी आपआपल्यात परिस्थितीनुरुप बदल घडवून आणला आहे किंवा तिच्याशी तादात्म्यता राखली आहे. याकरिता त्याच्यातील कौशल्य जागृत झाले आहे. यामुळे आजचे तरुण हे अगदी वेगळ्या वातावरणातील असून त्यामुळे त्यांचे स्वभावातही फरक जाणवतो. तोच बदल त्याचे शरीराचे ठेवणीतही आहे. ते एका विशिष्ट प्रकारचे घडलेले आहेत. यासाठी कमीत कमी प्रेममय वातावरणात राहण्याची व कष्टमय जीवन जगण्याची त्यांना सवय लागली आहे. तसेच कोणाचेही कृपादृष्टी शिवाय जगण्याची त्यांची वृत्ती बनलेली आहे. एवढेच काय त्यांचे स्वत:चे पालकाकडूनही कोणत्याही प्रकारची कृपादृष्टीची त्यांना गरज नाही.

जगात सर्वत्र स्वार्थ भरलेला त्यांना दिवस आहे. तसेच प्रत्येक गोष्टीमध्ये अत्यंत चुरस लागलेली अनुभवीत आहेत व यामध्ये वय वा जात, पात यांचा काहीही संबंध नाही. ही मुले पहात आहेत की सध्याचे जगात कोणाचाही आपले मनावर ताबा नाही व दुसऱ्यासाठी त्याग करण्याची अजिबात वृत्ती व तयारी नाही. आपले आई वडिलांनाही कुठलीही गोष्ट पवित्र

नाही. त्यांना पावित्र्याचा लवलेशही नाही. सर्वजण थोड्याशाही सुखासाठी धावपळ करीत आहेत व कोणत्याही कार्यातून आपली सुटका करुन घेण्यासाठी प्रयत्नशील आहे. तसेच कसातरी वेळ काढत आहेत. त्यामळे मुलांना या बुजविणाऱ्या वातावरणात व असुरक्षिततेच्या भावनेत स्वत:ला जमवून घ्यावे लागत आहे अशी ही त्यांची आंतरिक भावना आहे. तसेच बाह्य जगतात दुर्लक्षित राहणे व त्याची काळजी करणारे कोणी नाही याची सतत जाणीव त्यांना होत असते. याबद्दल काही शंका नाही की आपले आपल्या पाल्याबद्दलचे ज्ञान अत्यंत अपूरे व तोकडे आहे. जवळ जवळ नगण्यच आहे. यासाठी आपण प्रयत्न केलेत परंतु त्यात आपणास यश आले नाही आणि हे आपले पाल्याला माहिती आहे.

याकरिता आपली शिक्षण पध्दती, जी गेल्या शतकापासून अस्तित्वात आहे ही आता ओंगळवाणी व पंगुळावस्थेत आली आहे. ती आज कालच्या युगासाठी असलेल्या कसोटीस उतरली नाही. आपण फक्त आपल्या मुलांना बेजबाबदारपणे वागणे शिकवले व त्यामुळे खेळा व मोठे व्हा एवढेच केले आहे. आजकालची, आजच्या युगातील ही मुले पूर्वीच्या युगातील ४०-५० वर्षे वयातील मुलांपेक्षाही बुध्दीमान आहेत. त्यामुळे त्यांचेबरोबर यांची तुलना अयोग्य आहे. या युगातील मुले ही अतिशय हुशार आहेत. त्यांचा बुध्दीगुणांकही अतिशय उच्च आहे. त्यांना बाहेरील जगताची पूर्ण जाणीव आहे आणि योग्य निर्णय घेण्याची क्षमता, ताकद आहे. ते कोणत्याही गोष्टीचे विश्लेषण त्वरीत करु शकतात ही त्यांना प्राप्त झालेली जन्मजात देणगीच आहे. जी निसर्ग दत्त आहे आणि त्यामुळेच ते आजच्या जगात जगण्यात व यशस्वी होण्यात समर्थ आहेत आणि हे आजचे दुष्ट जग निर्मितीस आपणच कारणीभूत आहोत. त्यांना आपण प्रेम, आपलेपणा, मानसन्मान व पूज्यबुध्दी यापासून निश्चितपणे वंचित ठेवले आहे.

त्यामुळे हा पुढचा प्रश्न अतिशय भव्य व त्यामुळेच अतिशय गुंतागुंतीचा व कठीण आहे. यासाठी सर्व बुध्दीमान व जागृत लोकांनी जाणीवपूर्वक लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. आपण काळजी नसलेल्या राक्षसासारखे हृदय असलेल्या राष्ट्रात वाढत आहोत, जगत आहोत. त्यामुळे खरे तर आपण खरोखरीच अशिक्षित व असभ्य आहोत. अशा प्रकारचे गर्तेतून उठण्याचा व आपले राष्ट्राला पूर्ववत आपल्या मार्गावर आणण्यासाठी आपल्याला अत्यंत कठोर व्हावे लागेल व पश्चाताप होऊन कठीण निर्णय घ्यावे लागतील आणि अशाच प्रकारे जर चालू

राहिले तर पुढील १२ वर्षात ही अवस्था आणखी रसातळाला जाईल आणि काहीही मार्ग नाही अशी अवस्था येईल आणि मग त्यावर काहीही उपयायोजना राहणार नाही.

यात शंका नाही की, जगात अशा प्रकारे हळूहळू नैतिक मूल्याचे अध:पतन होत रहात आहे. परंतु या सर्व अंधाधुंद वातावरणात एक आशेचा किरण, उध्दारक नजरेस येतो आणि तो म्हणजे देशप्रेम ! आर्थिक व सामाजिक नितीवरील विश्वास व सध्या अस्तित्वात असलल्या पध्दतीविरुध्द बंड करण्याची क्षमता ! परंतु भारतातील संस्कृतीत व विचार सरणीत अशा प्रकारचे आदर्श नाहीत. या ठिकाणी राजकारणातील अंधाधुंद वापरलेल्या धर्म व सामाजिक व्यवस्था मग ती नोकरीतील व उद्योगधंद्यातील असो ती प्रदूषित व स्वार्थापायी कलुषित झालेल्या कलुषित मनातून झालेली आहे.

आपण कमीत कमी या दुष्टचक्रातून आपल्या मुलामुलींना वाचविले पाहिजे. कारण हेच भविष्यातील आदर्श नागरिक म्हणून पुढे येणार आहेत. त्यांना यापुढची अवघड वाढ ही अत्यंत अवघड व गूढ आहे, असे वाटणे साहजीकच आहे. या बाबत निश्चितच मतमतांत आहेत व ती एकमेकांच्या विरुध्द आहेत आणि ही देखील जगाजगात विखुरलेली आहेत.

याकरिता आपण कमीत कमी ही आपली आजची मुले या पासून वाचविली पाहिजेत. कारण ते भावी नागरिक आहेत आणि हे सर्व करण्यासाठी मार्ग शोधणे फार आवश्यक आहे आणि तो ही मार्ग समाधानकारक असला पाहिजे. ज्यामुळे मुलांच्या तातडीच्या व आवश्यक गरजा भागविल्या जाऊ शकतील. ह्या गरजा घरच्या व बाहेरच्याही असू शकतील. पुढील वाट ही दुर्मिळ आहे. तशीच अंधुक अशी आहे. यात मतमतांतरे जरुर आहेत. परंतु यातून मार्ग काढणे हे आपल्यासाठी अत्यंत गरजेचे आहे. या मार्गाने या मुलांचे घरचे तसेच समाजातील सर्व गरजा समाधानकारकरित्या त्यांना पूर्ण करता आल्या पाहिजे. वास्तविक जगातील सर्व देशांमध्ये हीच परिस्थती आहे. याचे कारण या मुलांची प्रगती, त्याचे भवितव्य हे त्या त्या देशातील बुध्दीमान व्यक्तीने विचारपूर्वक तसेच नियोजन करुन ठरविलेले आहे. परंतु दुर्दैवाने मी जिकडे बघतो तिकडे मला मनुष्य हा जनावराचे स्वरुपातच पहावयास मिळतो. तो अत्यंत स्वार्थी आहे व दुसऱ्याबाबत अजिबात विचार न करणारा त्याची काळजी न घेणारा तसेच आपल्या देशाबाबत कुठलीही दूरदृष्टी न ठेवणारा त्याच्यावर प्रेम न करणारा असा मला

दिसून येतो आहे.

जीवनाची ही अत्युच्च मूल्ये आता ढासळून पडली आहेत. आपण सर्व जनावराचे वृत्तीचे झालो आहोत. प्रत्येक जण फक्त स्वत:चेच पोट कसे भरता येईल याचाच विचार करतांना दिसतो. यात भर म्हणून असत्यांची संख्या भरभरसाठ वाढत आहे. त्यामुळे प्रचंड लोकसंख्या वाढ झालेली आहे. याचे दुष्परिणाम म्हणून विविध समस्या आपोआपच निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे मग ते राजकीय क्षेत्र असो की, सामाजिक क्षेत्र असो अथवा शास्त्रीय क्षेत्र असो. आपल्या भारताचा ही समस्या निराकरणातील सहभाग जवळ जवळ नगण्यच आहे. आपण इतक्या गर्तेत गेलेलो आहोत ही सद्य परिस्थितीबाबतचे आपण कुठल्याही प्रकारे समर्थन करु शकत नाही. यासाठी सध्याची मुले सुधारण्यासाठी आपण संपूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे. त्यांचे तरुणपणात सुधारणेसाठी आपण काहीही मुद्दामहून प्रयत्न केलेले नाहीत. मागे गेलेल्या या भयंकर चुकांचे परिणाम आपण भोगत आहोत. यामुळे सध्याचे युग हे अत्यंत घाणेरड्या स्वरुपाचे, चिंताजनक परिस्थिती निर्माण करणारे व अतिशय दु:खद अशा स्थितीतून जात आहे.

यासाठी काय आपणास भविष्यातही अशी शोकदायक परिस्थिती चालू राहू द्यावयाची आहे काय? आपले राष्ट्र या मुर्खपणाचे गर्तेत सतत पडलेले राहिले पाहिजे काय? तसेच स्वार्थीपणाचा पाहिजे काय? यासर्व गोष्टीचा आपण काळजीपूर्वक व गंभीरतापूर्वक विचार केला आहे काय? यापुढेही आपली तरुण पिढी अशाच प्रकारच्या संशयी वातावरणात, स्वार्थी, मूर्ख रहावीत अशी आपली धारणा आहे काय? नाही ना ! मग या मुलांचे उज्ज्वल भवितव्यासाठी आपणास सुरुवातीला अतिशय कष्ट घ्यावे लागतील. थोडीशी झीज जरुर सोसावी लागेल. यातून आपण त्वरित बाहेर येवू शकणार नाही. ही काही क्रांती नव्हे की एका रात्रीत हा सर्व चमत्कार घडून येईल. तर ही एक संपूर्ण पेटून उठण्याची प्रक्रिया आहे. ज्यास उत्क्रांती म्हणता येईल. यामध्ये संपूर्ण देशाची संस्कृतीच आपणास बदलावी लागणार आहे. तसेच सामाजिक वातावरणही बदलावे लागणार आहे. प्रत्येकाचे व्यक्तिमत्वात बदल घडवून आणावा लागणार आहे यासाठी या मुलांच्या सध्याच्या अभ्यास क्रमात सखोल परंतु आदर्श बदल घडवून आणावा लागेल. त्याचे भवितव्य उज्ज्वल रहावे असे जर वाटत असेल तर यासाठी नवीन

दृष्टिकोन अंगीकारले पाहिजेत. इतिहास बदलवून टाकणारी निर्णय घेण्याची तयारी ठेवली पाहिजे आणि असा इतिहास बदलवून टाकू शकण्याचे परिस्थितीत ही नवीन पिढी आहे. त्यामुळे त्याची इच्छाशक्ती वाढवण्याचा प्रयत्न करावा आणि त्यांना नवीन दृष्टिकोन लाभेल अशी शिकवण द्यावी. जुन्या काळात ज्या चुका आपल्या जुन्या पिढीने केल्या त्याचे पुन्हा या पिढीने अनुकरण करणे योग्य होणार नाही. उलट ते घातक ठरेल आणि या गोष्टीचे ज्ञान त्यांना देणे हे आपले कर्तव्य आहे. योग्य निर्णय घेण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण केली पाहिजे.

जुनी पिढी ही आपल्या जुन्या रुढ पध्दतीप्रमाणे वागतील. ते नवीन जमान्यातील बदल अंगीकारणे शक्य नाही. तसेच योग्य अशा कल्पनाही ते करु शकणार नाहीत. एवढेच काय अशा नव्या कल्पना अंमलात आणणे त्यांना कठीण आहे. जुनी माणसे त्याचे जुन्याच पध्दतीने शिकविण्याचा प्रयत्न करतील. सध्याच्य युगात जे सत्ताधारी आहेत ते या नवीन पिढीला त्यांच्या बुध्दीमत्तेला झेपेल असे निर्णय घेवू देण्यास तयार होणार नाहीत व स्वत:ही काही करणार नाहीत. त्यांना आहे तसेच ठेवण्यात जास्त स्वारस्य आहे. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे त्यांना धर्मात जास्त स्वारस्य आहे. त्यामुळे राजकारण, विज्ञान किंवा इतर दैनंदिन जीवनात एक प्रकारचा तोच तोचपणा आला आहे.

आणि नवीन तरुण जर अशा प्रकारच्या वातावरणात व्यस्त झाले तर कठीणच आहे. कारण जुनी माणसे यांना फक्त आपली सत्ता उपभोगण्यातच मस्त असतात. ते या नवीन तरुणांना कुठलाही बदल घडवून आणू देण्यास तयार नसतात आणि जुन्या घडीत ते चालू आहे. तेच पुढे चालविण्यात मस्त असतात. ते स्वत: तर काही नवीन करत नाही किंवा करु शकत नाहीत. कारण त्यांच्यात ती क्षमताच नाही. यामुळे तरुणांमध्ये कोंडमारा झाल्याची भावना निर्माण होते व त्यांनी जर का गुलामासारखे या परिस्थितीला तोंड दिले, नवीन काहीही मार्ग शोधून काढू शकले नाहीत किंवा त्याचा अंमल करु शकत नाहीत. तेव्हा मग त्यांच्यात वैफल्याची भावना निर्माण होते. आणि मग ते आपली ही उर्जा गैर ठिकाणी व्यक्त करतात. त्यामुळे ते शारीरिक, मानसिक व बौध्दिक संतुलन बिघडवून बसतात. आणि ही शक्ती बिडी, सिगारेट पिणे, दारु पिणे, अफू-गांजा-चरस आणि बायाबाजी, भांडाभांडी या बाबींवर व्यर्थ खर्च करतात.

यावर मार्ग आहे काय? याचे उत्तर आहे. त्यांना नियोजनपूर्वक अभ्यास करणे आणि प्रसिध्दी माध्यमांनी प्रसारित केलेल्या चुकीच्या गोष्टीकडे दुर्लक्ष करणे हे आहे. कारण ते खरे ज्ञान नाही. तर तो एक प्रकारचा प्रचाराचा भाग आहे. यासाठी जाणत्या जुन्या लोकांनी आपण काय चूक करीत आहोत याची जाणीव करुन घ्यावी व धैर्याने तोंड देण्याची तयारी ठेवावी. यासाठी देशप्रेम समाजाप्रती निष्ठा व इमानदारी या सर्व गोष्टी राष्ट्रप्रेम म्हणून करावयास हव्यात. अशा प्रकारे जर वागणूक एखाद्या नेत्याने पुढाऱ्याने ठेवली तरी तोच बदल घडवून आणू शकतो. नवीन तरुणांमध्ये असलेली ही उर्जा चुकीच्या मार्गाने जावयास नको. यासाठी त्यांना नेहमी अगदी तत्पर तयार रहावयास हवे. तसेच राष्ट्रहीत लक्षात घेऊन अत्यंत चपल व कार्य तत्पर व्हावयास हवे. अन्यथा त्यांचे भवितव्य अंधारमय होईल व ते गर्तेत पडतील. एकंदरीत अत्यंत बलशाली असलेली ही सत्ता बेशिस्त व जाचक होईल. ज्याप्रमाणे अत्यंत उच्च पातळीवरील शक्ती स्वत:च स्वत:चा नाश करते. यासाठी या तरुणांमध्ये मतांची शक्ती असून ते त्याचा उपयोग योग्य मार्गदर्शक व आदर्श पुढारी निवडून आणू शकतो. त्यांनी या लाचार पुढाऱ्यांना आंधळेपणाने पाठिंबा देऊन चालणार नाही. या उलट त्यांनी त्यांचेकडून नाक दाबून व्यवस्थित कामे करुन घ्यावयास हवीत आणि तीच खरी स्वातंत्र्याची गणतंत्राची व्याख्या आहे. तीच खरी लोकशाही आहे. याआधी याच तरुणांनी आपली शक्ती दाखविली नव्हती. त्याची त्यांना जाणीव आहे हे ही दाखविले नव्हते. तसेच त्यांना राष्ट्रीय दृष्टिकोनही नव्हता.

आजच्या या तरुणांनी म्हणूनच बलवान राष्ट्र बनविण्याची प्रतिज्ञा केली आहे. यातून भ्रष्टाचाराला पूर्णत: मुक्ती देण्यात आली आहे. या तरुणांचे मतामध्ये योग्य पुढारी निवडून आणण्याची अफाट शक्ती आहे. ते अंधाप्रमाणे कुठल्याही पुढाऱ्याचे मागे धावत जात नाहीत व त्यांचे समर्थन करीत नाहीत. या ऐवजी या पुढाऱ्यांनी समाजात कसे वागावे याबाबत ते सतर्क असतात व त्यांनाच मार्ग सांगतात व सरळ मार्गाने जाण्यास भाग पाडतात. यालाच खरी लोकशाही म्हणतात. आतापर्यंतचे आयुष्यात त्यांनी स्वत:चा काहीही विचार केलेला नाही व या आधी समाजात जाऊन सामाजिक बांधीलकी वगैरे विचार त्यांनी अद्यापपर्यंत व्यक्त केलेले नाहीत तसेच राजकीय खरे खोटेपणा बाबत विचार केलेला नाही.

या तरुणांनी आता विविध राजकीय व सामाजिक कामे करण्यासाठी तयार रहावयास हवे. त्यातून सुदृढ राष्ट्राची निर्मिती होईल. त्यामुळे भ्रष्टाचारास पायबंद बसेल. स्वार्थीपणाने कामे करण्याची सवय नाहीशी होईल व कर्करोगाप्रमाणे पिच्छा पुरवणाी ही व्यक्तिमत्वे ऱ्हास पावतील. कारण या सर्व दुष्ट प्रवृत्तींना या तरुण पिढीचाच विरोध राहील. यासाठी यांना गुंडशाहीचा आधार घ्यावा लागणार नाही किंवा शाळा कॉलेजेस मध्ये जी जमाव करुन नासधुस करण्याची सवय आहे तिचीही गरज राहणार नाही. तसेच अतिरेक्यासारखी बंदूकांचीही गरज राहणार नाही तर शिस्तबध्द नियोजन व धाडसानेच हे सर्व साध्य होईल. पुणत: या गोष्टीवर विश्वास ठेवून कार्य केल्यास हे सहज साध्य आहे.

यासाठी या तारुण्यातील मुलामुलींबाबतीतले संपूर्ण ज्ञान प्राप्त करावे, त्यावर विचार विनिमय करावा व निर्णय घ्यावा. त्यातून भविष्याचा मार्ग काढता येईल आणि एकदा का योग्य मार्ग सापडला की त्यानुसार तो अंमलात आणण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही लगेच सुरु करावी. यासाठी कोणत्याही धर्माच्या वेदाची गरज नाही. ते मग, व्यावसायिक, सामाजिक किंवा आर्थिक आधारावरचे विचाराधार असोत असे क्षेत्राची निवड करा व हे असाध्य साध्य मिळवा. त्यासाठी आपण राष्ट्राला नवीन सुर्योदय दिसू शकेल. पण हे बंदूकीने साध्य होणे शक्य नाही आणि यासाठी आपल्याला कोणत्याही शत्रूशी लढावे लागणार नाही. ज्यावेळी महात्मा गांधींनी असहकार व अहिंसेचे आंदोलन छेडले त्यावेळी सर्व लोक त्यांचेवर हसले व त्यांना मुर्खात काढले तसेच त्यांनी जेव्हा मीठासाठी आंदोलन केले तेव्हाही ते अगदी एकाकी पडले होते. परंतु यावेळी जेव्हा त्यांनी गांवे ओलांडली तेव्हा फार मोठा लोकांचा समूह त्यांना पाठिंबा देण्यासाठी या आंदोलनात व मोर्चात सहभागी झाला. यातील काही शंकेपोटी आले होते तर काही कुतूहलापोटी आले होते. त्याबरोबर वर्तमान पत्रातील बातमीदार देखील या प्रसंगी बातमी मिळण्यासाठी त्या ठिकाणी आले होते. ते ज्याक्षणी मुंबईला पोहोचले त्याचक्षणी आतापर्यंत त्यांना हसणारी माणसे तीच माणसे त्यांची पाठराखण करणारी व त्यांच्यावर स्तुतीसुमने उधळणारी झालीत व त्यांनी गांधीजींच्या पायावर क्षमायाचनेसाठी लोळण घेतले.

म्हणून कोणाला तरी पुढाकार हा घ्यावाच लागतो व कुठल्याही विधायक कार्याची सुरुवात करावी लागते. अशा प्रकारची या आधी कधीही आलेली संधी आजच्या

तरुणांना प्राप्त झालेली आहे. या देशात अशी संधी कधीही प्राप्त झालेली नव्हती. त्यामुळे आपण आता एक तर ढासळून जावयाच्या किंवा सुधारण्याच्या टप्प्यावर येऊन पोहोचलो आहे. याकरिता आपल्या देशासाठी आपल्यातील आत्मविश्वास, प्रेम व देशाप्रती आदराची भावना त्यागाची भावना या तरुणांमध्ये असणे अत्यंत गरजेचे आहे. ते जर अशा प्रकारच्या अत्युच्च भावनेने प्रेरित झालेत व आदर्श मूल्याप्रती संमिलीत झालेत. आपल्या जुन्या वैभवाची आठवण करीत राहिलेत तरच त्यांना प्रेरणा मिळेल.

जर एखाद्या निराधार व्यक्तिला आपले कोणास म्हणावे हे समजले नाही आणि त्याला कोणीही आपलेसे केले, समजले नाही तर ती व्यक्ती लुटपात करण्याकडे किंवा चोरीचे मार्गाकडे वळण्याची शक्यता असते. या उलट ज्या साधार व्यक्तिंना आपले आई-वडील ज्या सन्मार्गाने गेलेत व ज्या जुन्या संस्कृतीत वाढले याची त्याला जाणीव असते ती व्यक्ती आपल्या कुटुंबाला डाग लागणार नाही अशा प्रकारचे विधायक कार्य करते.

हे सर्व त्या व्यक्तीचे आपल्या राष्ट्रापती किती प्रेम आहे तसेच त्याचा स्वत:वर किती विश्वास आहे व आपल्या धर्मावर किती विश्वास आहे यावर अवलंबून आहे. याबाबतीत आपली सध्याची शिक्षण पध्दती अगदी चुकीची आहे. यामध्ये इतिहासाला अजिबात स्थान नाही. आपल्या देशाचे पूर्व वैभव ज्यांना माहित नाही ते या देशावर काय प्रेम करु शकणार? किंवा त्यात सुधारणा करण्यासाठी काय प्रयत्न व मदत करणार? यासाठी कुठल्याही राजकीय पक्षावर विसंबून राहून चालणार नाही. ते काहीही करणार नाहीत. त्यामुळे यासाठी राजकारणी मंडळींना अलग राहू द्यावे लागेल. या तरुण-तरुणींचा कठोर अभ्यास करावा व आपल्या बुध्दी चातुर्यानेच या देशाची पुनर्बांधणी करावी.

## चारित्र्य बांधणीसाठीचे (घडविण्याचे) शिक्षण :-

जेव्हा एखादा देश त्यातील व्यक्ती असे ठरवितो की, देशाची प्रगती ही राजकारण रहित असावी तसेच आर्थिक स्थितीचा त्यात लवलेशही नसावा तर या देशात राहणारी प्रत्येक व्यक्ती ही देश उभारणीसाठी सतत कार्यरत रहावी तसेच प्रत्येकाची बुध्दीमत्ता व व्यक्तिमत्व यासाठीच झटावे व त्याद्वारे या देशातील नवीन पिढीतील तरुण-तरुणी या

भविष्यातील उत्कृष्ट नागरिक म्हणून पुढे येवोत. तसेच ही पिढी शारीरिक दृष्ट्या सुदृढ, हुशार व बुध्दीमान निर्माण होवो. हे लक्षात घ्यावे की आपली मुले-मुली हीच राष्ट्राची संपत्ती आहे. ही विचार सरणी आपल्या पूर्वजांनी कित्येक वर्षापासून पिढ्यांपासून आपणास दिलेली शिकवण आहे. हिंदूत्वातच याची सगळी मेख आहे. ही आदर्श देणगी आपल्या जुन्या गुरुंनी आपणास निर्मळपणे दिलेली आहे त्याचे जतन करा. कारण सध्याचे त्यांचे लहानपण हा एक ठेवा आहे. याचे जतन करणे आवश्यक आहे. याचवेळी त्यांचे स्वभावाची जडण-घडण योग्य मार्गाने घडविता येते व संस्कार सजविले जाणे शक्य आहे आणि हेच भावी समाजासाठी अपेक्षित आहे. हीच शिकवण सध्याचे शिक्षणातून या मुलांना मिळावी अशीची अपेक्षा आहे. हे सुसंस्कार एकदा का या मुलांचे मनावर या वयात शिक्षणाद्वारे बिंबविले तर पुढील कालावधीत ते अत्यंत घट्टपणे त्यांच्यावर कायमचे कोरले जातील आणि मग शैक्षणिक शास्त्रीय व सामाजिक शिक्षणाद्वारे त्यांना योग्य दिशा मिळून ते भावी आदर्श नागरिक होतील. याचाच परिणाम म्हणजे आपली नवीन शिक्षण पध्दती योग्य दिशेने कार्यरत राहिली तर या मुलांना विकासाची नवीन दालने उघडतील व ती मुले भावी पिढीचे आदर्श पुढारी, आथिकतज्ज्ञ, विचारवंत, शास्त्रज्ज्ञ व समाज सुधारक निर्माण होतील व देशाची भरभराट होईल हे सर्व होण्यासाठी या मुलाचे चारित्र्य आतापासूनच घडविले पाहिजे व तसे शिक्षण प्रत्येक शाळेत दिले गेले पाहिजे. तरच हे सर्व शक्य आहे. सध्याचे शिक्षण त्यादृष्टीने उपयुक्त ठरणार नाही. यामध्ये आवश्यक ते बदल तात्काळ घडवून आणले पाहिजेत ही काळाची गरज आहे आणि आपण याकडे जातीने लक्ष देण्याची अत्यंत गरजेचे आहे. आपल्या असल्या प्रयोगाने जर या मुलाचे बुध्दीला योग्य चालना मिळणार असेल तर ते उत्तमच अहे. अशा आंतरिक चालना मिळाल्याने मुलांना नवजीवन योजना, कल्पना व पुढाकार घेण्याची इच्छाशक्ती येवू शकते. हे पायाभूत ठरणारे चारित्र्य घडणीचे शिक्षण सुध्दा सुरु करणे अत्यावश्यक आहे.

खऱ्या शिक्षणाची व्याख्या अशी करता येईल की ज्यामुळे मुलांमध्ये खरे शहाणपण व समजूतदारपणा येईल. या सर्व गोष्टी होण्यासाठी व मुलांना योग्य वळण लागण्यासाठी खरी गरज आहे ती योग्य शिक्षकांची हे सर्व शिक्षण मुलांवर नियंत्रण ठेवण्यास तज्ज्ञ असले पाहिजेत. मग ते फक्त प्रेमापोटीच नसो तर तळमळीचे व आत्मिकतेचे असावे. शिक्षकांचे शिकविणे व वागणूक हीच जर क्रमिक असेल तर ती उपयोगाची नाही. अशा रितीने

इमानदारीने व मेहनतीने शिक्षण देणाऱ्या शिक्षकांनी तयार केलेली मुले व त्यांच्यावरील संस्कार हे मुलांवर कायमचे कोरलेले राहतील. उदाहरणे देणे व त्याचप्रकारची वागणूक ठेवणे यासाठी फार आवश्यक आहे. मुलांनी आपल्या शिक्षकाकडे एक मित्र म्हणून पाहणे आवश्यक आहे. हाच मित्र आपल्याला मार्गदर्शन करेल. याची त्यांना खात्री पटली पाहिजे. सर्वांसाठी सच्चेपणा आवश्यक आहे. कोणत्याही गोष्टी मुळे ही ऐकण्यापेक्षा पाहून जास्त तत्परतेने आत्मसात करतात. याकरिता आपले पूर्वकालीन शिक्षण हे आत्म समर्पित वृत्तीने देण्याची त्याकाळी पध्दत होती व तसे आपले गुरुही होते. त्यांना धर्माबद्दल प्रेम व आदर होता. त्या परिणामी मुले आत्मनिर्भर सात्विक विचारांची निपजत असत.

## मन म्हणजे काय ?

माणसाचे व्यक्तिमत्व हे त्याचे आंतरिक मन व बुध्दीमत्ता यावरुन ओळखता येते. त्याचा धर्म फक्त हा त्याच्यातील या गुणांना व्यक्त करण्याचा एक मार्ग असून त्याच्या शिक्षणाने तो आपल्यातील योग्य बदल घडवून आणू शकतो. या बदलत्या परिस्थितीमुळे तो आपल्या आयुष्यात अत्यानंद आणू शकतो. तसेच आसपासचे वातावरणाचा पूर्णपणे उपभोग घेऊ शकतो. तसेच त्याद्वारे आत्मिक सुख, समाधानाची अनुभूती घेऊन आपली बुध्दीमत्ता वाढू शकतो आणि आजूबाजूला सतत घडण्याऱ्या घटनांचा मनमुराद आनंद घेवू शकतो. तसेच आजूबाजूला सतत घडणाऱ्या बदलात सहभाग घेवू शकतो. आणि हे सर्व घडत असतांना त्याला ही सातत्याने जाणीव असते की याला कारणीभूत ही माणसाची उपजत मन बुध्दी आहे. यातून सर्व प्रकारच्या योजना उद्‌भवतात व माणसाचा स्वभाव घडत असतो. तसेच धर्माधारित ही त्याची मन व बुध्दीच त्याला विकासाची चालना देते व प्रत्येक गोष्टीत, विषयात पारंगत होण्यासाठी प्रेरणा देते. यासाठी निसर्गाला प्राधान्य देण्याची गरज आहे. तसेच आजूबाजूची परिस्थिती, वातावरण तसेच माणसाचे आंतरिक मन हे ही मदत करीत असतात व या घडणीत त्यांचाही सहभाग असतो.

माणसाचे मन हे त्याच्या विविध जाणीवाचा मूळ पाया आहे. या मनामुळेच या जगाचे पाठीवर वावरणाऱ्या प्राणीमात्रांना व माणसांना सुखः, दु:खाची जाणीव होते व आंतरिक स्पंदनाची अनुभूती येते. कोणत्याही घटनांची प्रथम आपले मन हे योग्य प्रकारे

चाचणी घेत असते. ही गोष्ट प्राण्यातही आहेच. कोणत्याही घटनेची प्रथम आपले मनाला जाणीव होते. ते त्यावर सारासार विचार बुध्दीने योग्य व अयोग्य या बाबत निर्णय घेते व मगच मनुष्य कोणत्याही निर्णयाप्रत पोहोचतो. मन हे प्रत्येक जाणीवेचे केंद्रस्थान आहे. त्यात भावनाही समाविष्ट आहेत. मानवी जीवनात या भावना व जाणीव अत्यंत महत्वाचे कार्य करीत असतात. जगातील कोणत्याही गोष्टीच्या संपर्कात आल्यानंतर प्रथम सर्व प्राणीमात्रांचे मन त्याबाबत सारासार बुध्दीने विचार करते. पुढील आवश्यक त्या कार्यवाही बाबत सूचना देते जसे आपण कुत्र्याला धक्का लावला किंवा त्याचे शेपूट ओढले तर त्याला राग येतो व तो तुमच्यावर भूंकून प्रकट करतो. या सर्व कार्यवाहीत तुमच्या मनातील हेतू काय आहे व कोणता उद्देश आहे याची त्याला अजिबात जाणीव नसते. तो ही कार्यवाही त्याच्या मनाने त्याला दिलेल्या आदेशानुसार करीत असतो. विचार करण्याची माणसारखी क्षमता त्याच्यात नसते.

फक्त माणसाजवळ जो जग निर्मात्याने सर्वोच्च व प्राणीमात्रांचा मुकुटमणी म्हणून गणल्या जातो ही क्षमता आहे की तो प्रत्येक गोष्टीत किंवा प्रयोगात भेदाभेद याबाबत विचार करु शकतो. तोच फक्त प्रत्येक गोष्टीचे प्रसंगाचे योग्य प्रकारे विश्लेषण करतो आणि त्या अनुरुप निर्णय घेऊन कार्यवाही करु शकतो. हा भेदाभेद करण्याची क्षमता व निर्णय घेण्याची क्षमता व खरे खोटे पणाची योग्य अयोग्य हे जाणून घेण्याची क्षमता ही फक्त माणसालाच असेल. या बुध्दीच्या जोरावरच तो या जगतात योग्य अयोग्य व चूक, बरोबर याचा निर्णय घेत असतो. तसेच आपणास काय करणे योग्य होईल याबाबतची बुध्दीमत्ता फक्त माणसातच आहे आणि यातच माणसाचे वैशिष्टपण दिसून येते. त्याच्यातील या सभ्यतेमुळे त्याच्या अंगी असलेले उपजत गुणाकडे बरेचदा दुर्लक्ष होते आणि असे जर झाले तर माणूस हा जनावरासारखा वागावयास लागतो आणि मग त्या पासून निर्माण होणारे सर्व भोग त्याग भोगावे लागतील व परिणामाची जाणीव ठेवणे आवश्यक आहे.

आजकालच्या या सुसंस्कृत व आधुनिक जगतात आपण या क्षणभंगूर जीवनात क्षुल्लक गोष्टीचे मागे उगाच वाहवून जातो. त्यामुळे खरे, खोटे काय याचा अभ्यास न करता व बुध्दीमत्तेचा योग्य वापर न करता काय करावे व करु नये याबाबत संभ्रम निर्माण होतो. मानवी जीवनाचे हे बहुमूल्य तत्व विलयास जाते व मानव काय अद्भूत कार्ये करु शकतो याचा

पूर्णत: विसर पडतो. मनुष्य यामुळे जनावराचे गतीस पोहोचतो व त्याचे परिणाम भोगत राहतो. आपल्या या रोजच्या धकाधकीच्या जीवनात आपण मग मार्ग भटकतो व समाजातील आपली प्रतिष्ठा गमावून बसतो व पराभवाची नीतीची वाटचाल करुन चुकांचा मार्ग अवलंब करतो. याचे मुख्य कारण म्हणजे "आपणास तसे वाटते हेच आहे." याला कोठलाही ठोस आधार नाही. बुध्दीमत्ता ही साधारणपणे मनाचे निर्णयाविरुध्द काम करण्यास प्रवृत्त करते. त्यामुळे भेदभावास वाव नसावा व मनाला वाटते किंवा काल्पनिक काही गोष्टी कराव्याशा वाटतात. हे अत्यंत धोकादायक आहे. त्यामुळे आपल्या भरभराटीला व स्थैर्याला खिंड बसण्याचा धोका पत्करावा लागेल.

यासाठी धर्म निश्चितच आपली मदत करु शकेल. त्यामुळे आपली बुध्दी तल्लख राहील व त्यातील उपदेशामुळे आपण त्यातील मार्गदर्शक तत्वे आपले रोजचे जीवनात उपयोगात आणू शकतो व योग्य मार्गाने वाटचाल होऊ शकते. त्यामुळे आपले समाजात एक प्रकारचे चैतन्य निर्माण होते व त्या कारणाने शांतताही प्रस्थापित होऊ शकते. कार्यालयात आवक विभागात काम करणाऱ्या एखाद्या कारकुनाप्रमाणे आपले मन हे कार्य करीत असते. तो कारकून सर्व प्रकारची डाक स्विकारत असतो पण त्यातील कुठल्याही कागदावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही मात्र करीत नसतो. परंतु ती सर्व कागदपत्रे तो आपले वरिष्ठ अधिकारी यांचे समोर पुढील योग्य कार्यवाहीस्तव सादर करीत असतो. त्याचेकडून प्राप्त होण्याऱ्या आदेशाप्रमाणे व सत्याप्रमाणे तो त्या कागदपत्रांचा निपटारा करीत असतो. याउलट पण जर त्या कारकूनाने त्यावर काही कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्याचा, वरिष्ठांचा कोणाचाही सल्ला किंवा आदेश न घेता प्रयत्न केला तर त्यामुळे सगळ्या कार्यालयात गोंधळ निर्माण होईल व संभ्रम निर्माण होईल. पण तो ही काही थोड्या वेळाकरिता आणि हीच माणसाची थोड्या काळासाठी होणारी शोकांतिक आहे. आधुनिक जीवनात आपली मने थोड्या वेळाकरिता अशा प्रकारच्या संवेदना निर्माण करतात, ज्या बाहेरील जगतातून आलेल्या असतात. आणि आपण निर्व्याजप्रमाणे चटकन त्याला बळी पडतो आणि त्यामुळे वैफल्य निर्माण होते ही नव्या जगताची आपणास देणगी आहे. जरी ती अप्रिय व लाभदायक असली तरी !

आपल्या मनाला यासाठी बाहेरच्या जगातून विविध प्रकारच्या सूचना, संदेश

प्राप्त होत असतात आणि आपण कुठलाही विचार न करता किवा कोणाचीही मदत न घेता सल्ला न घेता त्यावर हुकूम तत्परतेने त्यावर कार्यवाही करुन किंवा त्यावर हुकूम त्या संदेशाची अंमलबजावणी करीत असतो. त्यामुळे वैफल्य ग्रस्ततेची व सर्वत्र गोंधळ माजल्याची परिस्थिती निर्माण होते. या कार्यात खरे तर आपली बुध्दी ही संबंधित जबाबदार अधिकारी ही भूमिका बजावित असते. हे खरे तर आपले शरीरातील आंतरिक राजकारणच आहे. परिणामी आपण गुंतागुंत व गचाळपणा याला बळी पडतो. यामुळे आपल्या प्रवृत्ती या असमाधानी व अतृप्त राहतात व आपले जीवन नीरस वाटावयास लागते. ज्याप्रमाणे नदी ही वाहत्या पाण्याचे द्योतक आहे त्याचप्रमाणे आपले मन हे विचार प्रवाहित करण्याचे एक साधन आहे. जसे नदीचे काठ हे नदीची दिशा पाण्याचा मार्ग ठरवित असतात. तसेच बुध्दीमत्तेचे काठ हे आपले विचारचक्राला काबून ठेवत असतात. जर नदीचे काठ पक्के नसतील तर पाण्याच्या प्रवाहाने त्याचे बंध तुटू शकतात. पाणी सर्वत्र पसरुन नुकसान करु शकते. त्याचप्रमाणे माणसाची बुध्दी जर योग्य प्रकारे मार्गदर्शन करीत नसेल व घेतलेल्या निर्णयावर, मार्गदर्शनावर ठाम नसेल तर आपले मन वाटेल तसे वागण्यास सुरुवात करते. आणि मग मनुष्याची अवस्था इकडे तिकडे फेकल्यासारखी, चेंडू सारखी होते. ती परिस्थितीशी सामना करण्याऐवजी भरकटत असतो.

या बुध्दीला काबूत ठेवण्यासाठी व योग्य दिशेने तीची वाटचाल होण्यासाठी माणसाला त्याच्या आपल्या धर्माची शिकवण उपयुक्त ठरते. यशाचे खरे गमक हे माणूस आपली बुध्दी योग्य दिशेने कशी वापरतो व आपल्याला प्राप्त परिस्थितीशी कसे जुळवून घेतो यात आहे. त्यामध्ये कुठल्याही उफाळून येणाऱ्या उर्मीवर ताबा मिळविणे आवश्यक आहे. यासाठी कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता व आडमार्ग न पत्करता आपल्या धर्माच्या मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करणे फार आवश्यक आहे. आपल्या धर्मात यासाठी विविध युक्त्या प्रयुक्त्या सांगितल्या आहेत. त्याचे योग्य प्रकारे पालन केल्यास तुम्ही आयुष्यात विकासाची योग्य कास धरु शकता व प्रगती करु शकता किंवा मग अधोमार्गाला जाऊ शकता.

## संस्कृतीची व्याख्या :-

सुसंस्कृतपणा हे सुधारणेचा खरा मापदंड आहे. मागासलेली माणसे संस्कृतीत आहे. एका भौगोलिक प्रदेशातील लोक जेव्हा एका विशिष्ट ठिकाणी बराच काळपर्यंत वास्तव्य

करतात आणि एक विशिष्ट प्रकारच्या जीवन प्रणालीने रहावयास लागतात व यासाठी आखून घेतलेल्या नियम व अटी याचे आपले जीवनात पालन करतात त्यासच संस्कृती असे म्हणतात. अशा प्रकारच्या संस्कृतीतूनच जीवनमूल्यांचा आनंद बाहेर येत असतो. ज्याला त्या त्या समाजाची संस्कृती असे म्हणतात. या संस्कृतीचे मूल्य मापन हे ते लोक कोणत्या प्रकारची जीवनप्रणाली आपलीशी करतात आणि या सर्व गोष्टी प्रत्येक देशाच्या संस्कृतीला लागू होतात आणि हा नियम हा माणसाच्या धड, डोके व हातपायाप्रमाणे मग ते कोणत्याही वजनाचे आकाराचे, रंगाचे शरीर असो. सर्वांना सर्व संस्कृतींना लागू आहे.

संस्कृती - संस्कृतीमधील फरक हा त्याच्या त्यांच्या जीवनमूल्ये व तत्वप्रणाली यावर अवलंबून आहे. कारण या सर्वांचा वापर त्या त्या संस्कृतीचा आदर्श म्हणून जपणाऱ्या त्या त्या मनुष्य समुदायावर आहे. मानवाच्या अत्यावश्यक गरजापोटी सुरुवातीला काही जीवनमूल्ये ही त्या त्या संस्कृतीत ठरविली जातात. त्यामुळे अशा प्रकारच्या संस्कृतीचा सुरुवातीचा मूळ पाया हा बाह्य परिस्थितीवर मात करण्यासाठी ठरविला जातो. त्यात सद्‌गुण व नीती याला महत्व असते. त्यामुळे आपल्या जीवनाच्या मुळात किंवा सुरुवातीला आजूबाजूची भौगोलिक परिस्थिती, हवामान, वातावरण याचा परिणाम मानवी मनावर होणे साहजिकच आहे. आणि यानुसार त्या काळी जीवनमूल्ये ठरविणे सहाजिकच आहे. यातूनच संस्कृतीचा उगम आहे. आणि अशा प्रकारे एकदा ठरविली गेलेली आपली ही संस्कृती आपली जीवनरेखा, दिशा ठरविण्यास उपयुक्त होणार आहे. एकदा अशाप्रकारे मजबूत पाया असलेली संस्कृती तयार झाल्यामुळे तिच्यावर बाहेरच्या कोणत्याही जीवनावर परिणाम करणाऱ्या गोष्टीचा, घडामोडीचा काहीही परिणाम होत नाही. ही झाली पाश्चिमात्य देशांची गोष्ट. त्या काळी जमीन ही अत्यंत कठीण व खडकाळ होती. कारण त्यावेळेचे हवामान त्या प्रकारचे होते. उदा. सतत पडणारा वर्षाचा इत्यादी. त्यामुळे लोकही अगदी राकट झालेत. त्यांना विपरीत नैसर्गिक परिस्थितीशी ठोसपणे सामना करावा लागला. आणि अशा विपरीत परिस्थितीचा यशस्वीपणे सामना देऊन स्वत:चे अतित्व टिकविण्यासाठी अथक प्रयत्न करावे लागेल. विपरीत निसर्गाशी लढावे लागले व त्यावर मात करावी लागली आणि यातूनच त्यांना जीवनाला आवश्यक असलेल्या गोष्टी मिळवाव्या लागल्या. त्यामुळेच त्यांचे अस्तित्व टिकणार होते. या उलट म्हणजे पाश्चिमात्य देशांचे तुलनेत पूर्वेकडील भाग हा अतिशय सुपिक व भरपूर व हिरवागर होता. त्यामुळे भरपूर

पीक येत होते व समृध्दी होती. तसेच फळे, फुले, नद्या, नाले यांची रेलचेल होती. ही परिस्थिती वर्षाचे जवळजवळ ७ ते ८ महिने रहात होती. या कारणाने उत्पादन भरपूर येत असे व सुख समृध्दीचे भांडार असावयाचे. अशा प्रकारच्या या शांत वातावरणातील लोक अत्यंत सुखी होते व त्यामुळे निर्माण झालेली संस्कृती ही सेवा करा व भरपूर द्या. अशा प्रकारची निर्माण झाली तर पश्चिमेची संस्कृती निसर्गाशी झगडा व मिळवा अशा प्रकारची निर्माण झाली. अशा प्रकारच्या दोन वेगवेगळ्या नैसर्गिक परिस्थितीमुळे पौर्वात्य व पाश्चिमात्य देशात वेगवेगळ्या प्रकारच्या संस्कृती निर्माण झालेल्या आहेत.

पूर्वेकडील अशा आदर्श नैसर्गिक परिस्थितीमुळे याठिकाणी आदर्श वातावरणात शांतताप्रिय व सौहार्दपूर्ण स्थिती राहून बंधुभाव निर्माण झाला आहे. या उलट पाश्चिमात्य देशात आदि भौतिकता निर्माण झाली आहे. व तो पाया घट्ट रोवला गेला आहे. त्यामुळे त्या भागातील लोकांत जिंकण्याची भावना निर्माण झालेली आहे. आपल्या रोजच्या जीवनात आपण हा अनुभव घेतच आहोत बाहेरील वातावरणाचा आपले आंतरिक जीवनावर कसा परिणाम करीत आहे हे सुरुवातीला आपले संस्कृतीत योग्य अयोग्य असे बदल घडवून आणत असते.

एखाद्या झोपडपट्टीत राहणारा मुलगा जसे नेहमी कठीण वातावरणात सतत रहात असतो. त्यामुळे त्याच्या वृत्ती नेहमी झगडण्याच्या व विपरीत परिस्थितीचा सामना करण्याच्या झालेल्या असतात. या उलट एखादा मुलगा उच्चभ्रु वस्तीत जन्मल्यामुळे त्याचा स्वभाव हा थोडा सुसंस्कृत, सुसह्य व समृध्द न होतो. जसे आपण बसचे रांगेमध्ये पाहतो. त्यावेळी रांगेत असणारा हा संयमी तरुण पुढे पुढे सरकत आपला नंबर आल्यावर बसमध्ये चढतो. परंतु हा गरीब मुलगा सारखा कुरकुरत असतो व रांगेत उभे न राहता त्याला बसमध्ये चढावयाची घाई असते. त्याला संयम शीस्त या गोष्टी आवडत नाहीत.

संस्कृती समृध्दीमुळे माणसाचे जीवनमान उंचावते पण जर याच संस्कृतीबाबतची मूल्ये घसरणीला लागली. त्यांचा आदर करणे बंद केले किंवा ती मूल्ये ऱ्हास पावली, लुप्त झालीत तर समाज स्वास्थ्य त्वरित बिघडते. याचे उदाहरण आपण इजिप्तचे संस्कृतीचे ढासळणे पहात आहोत. तसेच ग्रीक व रोमन साम्राज्यांची हीच अवस्था झाली. संस्कृतीचा ऱ्हास झाल्याबरोबर या सर्व सुशिक्षितावस्थेत असलेल्या संस्कृती नष्ट झाल्या. या सर्व साम्राज्याचे

धर्म मार्तंडांनी आपल्या अंगी असलेल्या बुध्दी चातुर्याने वारंवार तत्वान्वेषणात्मक व धार्मिक भावना, विचार राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेतून जागृत ठेवले व देशाला या अधोपतनापासून वाचविण्याचा सातत्याने प्रयत्न केला.

संस्कृतीचाच जर ऱ्हास झाला तर रानटीपणाची भरभराट होते व दुर्व्यसन व अनिती याची वाढ होते व समाजाची दुर्गती होते व सगळीकडे अंदाधुंद माजून लोक हैराण होतात. अशा प्रकारची खरे म्हणजे सध्याचे जगाची दुरावस्था आहे आणि ह्यातून सुधारण्याची खरे म्हणजे हीच गरज आहे व योग्य वेळ आहे. याकरिता आपल्या संस्कृतीतील धार्मिक व तात्विक भावनांच्या गोष्टींचा त्वरित ऱ्हास थांबविला पाहिजे व त्यांचे पुनरुत्थान केले पाहिजे. यासाठी आवश्यक असणारी पुस्तके, साहित्य हे उत्तर कोणत्याही देशापेक्षा आपले देशात विपूल प्रमाणात आपल्या धार्मिक ग्रंथात व पुराणात जागोजागी उपलब्ध आहे. त्यामुळे हे आपणा सर्वांचे नैतिक कर्तव्य आहे की आपल्या या तात्विक, धार्मिक व वैदिक साहित्याचा शोध घेऊन तो सर्व लोकात प्रसारित होईल याची आपण तत्परतेने काळजी घ्यावी. हे आपले प्रथम कर्तव्य समजावे. ज्यामुळे आजच्या समाजाचे निश्चित पतन थांबेल व तो पुन्हा सुसंस्कृत म्हणून ताठ मानेने सर्व जगात वावरु शकेल यातच सर्वांचे भले आहे.

## धर्माची व्याख्या, कल्पना, विचार :-

धर्म हा असा शब्द आहे की ज्याला इंग्रजीमध्ये प्रतिशब्द नाही. म्हणजे धर्माची इंग्रजीमध्ये व्याख्या करता येत नाही. पारंपारिक धर्म म्हणजे मनुष्याचे समाजातील सदाचरण होय. परंतु हा अतिशय त्रोटक असा शब्दभेद आहे.

यातून धर्म म्हणजे काय ह मात्र प्रतिध्वनीत होत नाही. मानवी जीवनाच्या आधारभूत जीवनमूल्ये याबाबतीत हा अर्थ योग्य न्याय देवू शकत नाही. जो सर्व ठिकाणी, सर्वत्र व सर्वदा आनंददायी व मंगलमय असते व सर्व जगतातील मनुष्यमात्रास मान्य असतो. आणि पायाभूत राहण्याचे कार्य करतो तसेच मानवी नैतिकतेला जो आधारभूत असतो त्याला धर्म असे म्हणतात. जो सर्व धर्माच्या देवळे, मशिदी व चर्चमध्ये मुख्यत: शिकविला जातो. तो धर्म होय. तसेच तो पारशी अग्यारी व गुरुद्वारामध्येही पढविला जातो. याच ठिकाणी माणूस शेवटी

ईश्वरास शरण येण्यासाठी जात असतो. कारण त्याला या मनुष्य जगतात सन्मानाने व ताठ मानेने जगावयाचे असते व त्यासाठी मन:शांतीची अत्यंत जरुरत असते. आणि असेच त्याने देवाप्रती नेहमी आपले चित्त विलीन करावे त्याद्वारेच तो देवदूत या पदास पोहोचू शकतो. या सर्व गोष्टीवरुन आपल्या एक गोष्ट लक्षात येईल की आपण सोईकरिता नव्हे तर आपले स्वत:चे समाधानाकरिता हे सर्व करीत असतो आणि वास्तविक यालाच धर्म असे नाव आहे. आपला भारत देश अशाच प्रकारचे कार्यावर उभा आहे, हक्क म्हणून नव्हे.

## गुरुची कल्पना, व्याख्या :-

खरा गुरु तोच आहे की, जो आपल्या धर्माच्या सर्व वेद व उपनिषदात पारंगत तर आहेच परंतु सत्य वचनात देखील पारंगत आहे. वेदांतातील विद्यार्थ्यांसाठी आपला गुरु हा आपले लक्ष्याचे दुष्ट स्वरुपच आहे तसेच गुरु हा शुध्द जाणीवेचे मुर्तिमंत उदाहरण आहे. तसेच तो अत्यंत सुखद असा अनुभव आहे. खरा बुध्दीमान व शहाणा आहे. ज्या कोणाला धर्मावर खरी निष्ठा पहावयाची आहे किंवा त्यागमूर्ती पहावयाची आहे ती त्याला ती आपले गुरुत पहावयास मिळते. आपली उपनिषदे हे आपले गुरु बाबत सखोल प्रमाणिकपणे थोडक्यात वर्णन करतात. आणि ते म्हणजे जो आपल्या सर्व वेद वेदांतात पारंगत आहे व ज्याला सत्याची पूर्ण जाणीव आहे वउपनिषदे मुखोद्‌गत आहेत. कारण या पूर्ण व सखोल ज्ञानाशिवाय गुरु आपल्या शिष्यांना पूर्ण ज्ञानच देवू शकणार नाही. परंतु अशाप्रकारे दिलेले पुस्तकी ज्ञान हे शिष्यासाठी पुरेसे नाही. गुरुच्या अंत:करणातून बाहेर पडणारे हे पंखरुपी शब्द हे अत्यंत खरेपणाने व आपलेपणाने शीष्य मोठे उपकारक व त्याला तारक ठरतात. याच बरोबर गुरुने यशस्वी ठरण्याची गुरुकिल्ली म्हणजे तो अत्यंत प्रामाणिक व कठोर असला पाहिजे. सर्व शिष्य हे आपले गुरुला श्रध्दास्थानी मान देत असतांना आपल्या गुरुची हुबेहुब नक्कल करण्याचा प्रयत्न करीत असतो. गुरुच्या सर्व बाह्य रुपांचा, वागणुकीचा शिष्य हा जशाच्या तशा गुरुप्रमाणे प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न करीत असतो. आणि आपल्या गुरुचेच वागणे जर योग्य नसेल तर शक्यता आह की तो त्यांच्या वाईट व अनिष्ठ सवयी आत्मसात करेल व पुढील आयुष्यात सुखी व तल्लख बुध्दीचा होण्याची संधी सोडून देईल. याच गुरुंना मोठ्या मनाची देणगी असणे आवश्यक आहे. तसेच तो दयाळू अंत:करणाचा व संयमीही असणे आवश्यक आहे. हे सर्व

यासाठी आवश्यक आहे की असा विद्यार्थी हा सुरुवातीपासूनच नवनवीन व न पटणाऱ्या कल्पनांचे विरुध्द पेटून उठू शकतो. कारण त्याला त्यावेळी फक्त तेवढेच ज्ञान असते. तेव्हा अशा प्रकारच्या मनावर बिंबविलेल्या गोष्टीचा समूळ नाश करुन त्या जागी हे नवीन विचार रुजविण्यासाठी गुरुला अतिशय क्लेशदायक प्रयत्न करावे लागतात आणि हे शक्य होऊ शकते पण यासाठी सदर भुजबळ अखंड संयमाची व शिष्यावर पूर्णपणे प्रेम व आपुलकी असण्याची आवश्यकता असते. ह्या गोष्टीचा जेव्हा गुरु जवळ पुरेपुर साठा नसतो त्यावेळी तो खरा गुरु नाही, असे समजावे. शेवटच्या पहाणीत असे सिध्द झाले आहे की, खऱ्या गुरुची ओळख ही त्याचे शिष्यावरुन होते. ज्याप्रमाणे खऱ्या संगीतकाराची ओळख ही त्याच्या खरे संगीत जाणणाऱ्या शिष्याकडून होते. ज्या शिष्याला खरोखरी ओढ असेल व गुरुने सांगितलेल्या मार्गाप्रमाणे जो वाटचाल करतो तो आपले आंतरिक भावनेनेच आपल्या गुरुला ओळखतो. जो गुरु आदर्श जीवन जगविण्यास शिकवितो व ज्याच्या उपस्थितीत आपला बहुमान झालेला बघतो तोच खरा गुरु होय. आणि असा शिष्य जेव्हा अशा आदर्श गुरुचे जीवनाशी आपले स्वत:चे जीवनाशी तुलना करतो तेव्हा त्याला स्वत:चीच लाज वाटते आणि ही गोष्ट आतील आवेग आवरुन त्याला कबूल करावी लागते आणि सतत आपले गुरुचे ध्यान डोळ्यासमोर आठवावे लागते. आणि मगच त्याचे मनाला शांती मिळते. खरे पाहिले तर आपणा सर्वांचा खरा उत्तम मार्गदर्शक हा देव आहे. आणि हादेव आपल्या मनाशी सतत संवाद साधत असतो आणि याला माध्यम म्हणजे आपले गुरु. त्याचे मुखाने तो आपणाशी संवाद साधत असतो. त्यामुळे आपण देवाची प्रार्थना करतो व त्याची पूजा करतो. या जगात नांदणारी कोणतीही जगणारी व्यक्ती ही कधीही मार्गदर्शक नसते फक्त देवच सर्वत्र आहे, सर्वकाळी आहे आणि तोच अपला शिक्षक, गुरु व मार्गदर्शक आहे.

## शिष्याची व्याख्या :-

खरा शिष्य तोच की ज्याची बुध्दी तल्लख आहे. जो सर्वसाधारण ज्ञानात तरबेज आहे. तसेच जो तब्बेतीने उत्तम असून बुध्दीने सारासार विचार करण्याची क्षमता ठेवतो. जो आपल्या गुरुच्या सुचनांचे व आज्ञेचे तंतोतंत पालन करतो. या व्यतिरित त्याला उपजतच ज्ञान पाहिजे की या दुनियेत काही कधीही न बदलणाऱ्या गोष्टी आहेत व त्याला खऱ्या

खोट्या घटनांचे संपूर्ण ज्ञान अवगत हवे आणि एकदा का त्याने या गोष्टीचे ज्ञान प्राप्त केले की खंबीरपणे शिष्य गोष्टीचा मुकाबला करण्याचे धैर्य हवे व खऱ्या मार्गाने जाण्याची मनाची पूर्णत: तयारी हवी. त्याचप्रमाणे हुषारीने आपल्या बुध्दीचा वापर योग्य रितीने करण्याची कुवत ठेवणे आवश्यक आहे. यासाठी स्वत:वर नियंत्रण हवे मन एकाग्र ठेवून आलेल्या प्रसंगास तोंड देण्याची शक्ती आत्मसात करुन मन शांत ठेवण्याची क्षमता हवी.

आपल्या आत्मिक शक्तीचे जोरावर त्याने आपल्या भोवताली असलेल्या असत्य व वायफळ गोष्टींचा त्याग करण्याची सवय ठेवावी व कुणाचेही दास्यत्वातून, गुलामगिरीतून स्वत:ची सोडवणूक करावी. आपल्या शिक्षकांप्रती त्याची असलेली भक्ती ही उपजतच असावी तो वरवरची नसावी व पीपासू वृत्तीचा त्याग करणे आवश्यक आहे. तसेच त्याचेजवळ निरक्षीर विवेक बुध्दी असणे आवश्यक आहे. तसेच आपले गुरुच्या हातून होणाऱ्या चुकांकडे दुर्लक्ष करुन आपले मन त्यांच्या सद्‌गुणांकडे सतत असले पाहिजे. वेदांताचा अभ्यास करणारे विद्यार्थी/शीष्य या बाबत जास्त दक्ष राहतील व फक्त आपले शिक्षकांनी शिकविलेल्या भागाची नक्कल करणार नाहीत. पण ही गोष्ट वेदांत न शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे बाबतीत घडू शकते.

वेदांतामध्ये शिक्षक अगदी परिपूर्ण असेलच असे नाही. खरा शीष्य या गोष्टीकडे फार लक्ष देणार नाही. कारण त्याचे आपले शिक्षकांवर असलेले प्रेम. वास्तविक प्रेम हे आंधळे असते. या उलट वेदांताच्या अभ्यास न करणारे विद्यार्थी हे नेहमी आपले शिक्षकाचे वैगुण्याकडेच लक्ष देतात हे गंभीर विद्यार्थी नव्हेत. वेदांताचे शिक्षण घेणाऱ्या शिष्याशी आपले शिक्षकांप्रती पूर्णत: विश्वासाची भावना असावयास हवी. त्यामुळे त्यांची स्वभाव रचना निष्क्रीय बदलेल व ते स्वत:ला व मनाला योग्य मार्गाने बदलवू शकतील.

## गुरु शिष्याचे नाते :-

बागेतील माळ्याचे जे आपल्या बागेतील फुलाशी जे नाते असते तेच नाते गुरु आणि शिष्य यांच्यात असते. माळी हा ही फुले मातीपासून किंवा त्यांना घातलेल्या खतापासून निर्माण करीत नाही. फुलांना त्या त्या झुडपातूनच निर्माण व्हावे लागेल. माळी फक्त त्यांच्या मुळाचे रक्षण, देखभाल करतो, त्यांना पाणी देतो, त्यांचे रक्षण करतो. त्या झाडांना, रोपट्याला

योग्य उन्हाचा प्रकाश मिळतो की नाही हे पाहणे व सावलीचाही विचार करणे इ. गोष्टी करतो. या सर्व बाह्य गोष्टी ज्या रोपट्यास वाढण्यास आवश्यक आहेत तो माळी करत असतो. पण त्या रोपट्याला लागणाऱ्या फुलांची योग्य वाढ होणे फक्त माळ्यावरच अवलंबून नसते. त्यासाठी त्या फुलाच्या प्रत्यक्ष रोपट्याला प्रगल्भ करणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे शिक्षकांचे काम विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे व त्याचे मनात योग्य विचार रुजविणे ऐवढेच आहे. त्यानंतर त्या विद्यार्थ्यांने योग्य रितीने त्या शिक्षणाचा उपयोग करावा. काही गुरु असेही असतात की ते आपल्या विद्यार्थ्यांना आश्वासीत करतात की ते त्या विद्यार्थ्यांना त्याचे इच्छित ध्येयापर्यंत निश्चितच पोहोचवतील पण असे सांगणारे गुरु वास्तविकरित्या गाढव आहेत. तुम्ही त्यांच्यावर स्वार होऊ शकता म्हणजे आपले म्हणणे त्यांचेवर लादू शकता. परंतु जे सच्चे गुरु असतात ते तुम्हाला फक्त मार्ग दाखवितात व तेथपर्यंत पोहोचण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करतात.

जसजसे हे विद्यार्थी शिक्षणात पुढे पुढे जातात आणि त्याचे मन शांत व एकाग्र होण्यास सुरुवात होते तेव्हा त्यांना एक प्रकारची गूढ किंवा सूक्ष्म शक्ती प्राप्त होते यालाच सिध्दी असे म्हणतात. जर या मार्मिक शक्तींना बाहेरच्या जगताला दाखविण्याचा प्रयत्न केला तर तुम्हाला इच्छित असलेले लक्ष्य तुम्ही साध्य करु शकणार नाही आणि या ठिकाणी तुम्हाला आपले गुरुचे मार्गदर्शन पुन्हा उपयुक्त व गरजेचे ठरते. तो तुम्हाला या पासून पूर्णत: परावृत्त करतो आणि प्रश्न करतो की आपण याच ठिकाणी रेंगाळत का बसला आहात? अशा प्रकारची अनुभूती आपण उपभोगू शकता. परंतु त्या या ठिकाणी थांबू नका व या सिध्दीच्या खेळण्याशी खेळण्याचा खटाटोप करु नका. याचे कारण आपण फक्त आपल्या मनाशी खेळ चालविला आहे. याच्याही पुढे वाटचाल करा. आपण विचाराल गुरुची निवड कशी करावी? या ठिकाणी हे लक्षात ठेवले पाहिजे की शिष्याला गुरुची निवड करण्याची गरज नाही. तर तो आपोआपच आपले गुरुकडे खेचला जाईल आणि तो आपणास योग्य अशा गुरुची निवड आपोआप करेल व त्याचे मनाशी सद्यस्थितीचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न करील. त्यामुळे तुम्ही तुमचे कडे येणाऱ्या कोणत्याही गुरुला आत्मसात करा व त्याची निवड करा. पण इतके जरुर लक्षात ठेवा की फक्त देवच एकमेव गुरु आहे. हाच देव, जो निरनिराळ्या रुपामध्ये तुम्हाला दर्शन देत असतो.

## शिस्तबध्दता व स्वातंत्र्य याची व्याख्या :-

माणसाने या जगताला अत्यंत सुंदर असे, राहण्यास योग्य बनविले आहे. या जगातील अद्‌भूत शक्ती, ज्या माणसास सातत्याने भय घालीत आहेत व त्यांचा पिच्छा पुरवित आहेत, यांना माणसाने लगाम घालून आपणास जगण्यास उपयुक्त असे साधन केलेले आहे. जी जमीन ओसाड व जिच्यात जंगली जनावरे मुक्त होती तिचे रुपांतर उत्पादन देण्यात, पीकाद्वारे अन्न देण्यास केले आहे. पुर्वीच्या मागास व जंगली, रानटी राहणीतून मनुष्य बाहेर आलेला असून तो आता सुधारलेला व बुध्दीमान झाला आहे. त्याने स्वत:साठी निर्माण केलेल्या सुख, सवलती या अगदी स्वर्गाप्रमाणे आहेत आणि मानव त्याचा उपभोग कोणत्याही प्रकारचे बंधन न ठेवता घेत आहे. अर्थात अशा प्रकारच्या अवाढव्य संपत्तीवर बसून देखील मनुष्य हा काळजी, साशंकांनी व असमाधान यात बुडलेला आहे. खरे तर परस्परविरोधी गोष्टीचा सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे हे काम आध्यात्मिक गुरु ज्यांनी आपले आयुष्य मानवी कल्याणासाठी समर्पित केलेले आहे व सर्वसाधारण जनतेचे हितच जोपासले आहे त्यांनी करावयास पाहिजे या गुरुंनी असे निदर्शनास आणले आहे की मानव हा भौतिक बाबींवर, ज्या त्याला सुखकारक आहेत, त्यामध्ये फार स्वत:ला गुंतवून घेत आहे आणि आता सुख हेच त्याला दु:खाचे गर्तेत लोटत आहे. उदाहरणार्थ मिठाईचे दुकानातील कोणतीही वस्तू सुरुवातीस सुख व आनंद देते व चवदार लागते. पण जसजसे ती जास्त खाण्याचा प्रयत्न करतो तसतशी त्यातील गोडी कमी होत जाते व ती नकोशी होते आणि तीच ज्यादा खाल्ली तर दु:खदायक व प्रकृती अस्वास्थ्यास कारणीभूत ठरते. त्यामुळे त्याचे सुखी जीवन हे दु:खी व कष्टमय होते.

याकरिता आपल्या पूर्वजांनी यासाठी काही मुलभूत नियमावली घालून दिलेली आहे. ज्याद्वारे आपण आपल्यावर ताबा ठेवू शकतो. ज्याद्वारे आपण या बाहेरील वस्तूपासून सुख व समाधान घेवू शकू. परंतु मानवी वृत्ती ही संपूर्ण सुख उपभोगण्यास सतत आसूसलेली असल्याने तो अशा प्रकारच्या बंधनात राहण्याचा राग करतो त्याला हे नियम आवडत नाहीत. त्याला कोणी सांगितले की असे करु नको तसे करु नको तर त्याचा त्याला फार राग येतो व ते सांगणे अप्रिय वाटते. अशा प्रकारची बंधने व नियम तो एखाद्या बैलाला लाल कापड दाखवून डिचवण्यासारखे समजतो. त्यामुळे तो बंड करुन या विरोधात उठाव करतो आणि कोणतीही

आध्यात्मिक, धार्मिक, पवित्र गोष्ट करण्यास त्याच विरोध असतो. ज्यापमाणे रस्त्यावरील नियमन करण्यासाठी पोलीसांनी दिवे लावलेले आहेत व त्याद्वारे रहदारीचे नियंत्रण केले जाते. त्याचप्रमाणे या जीवनातील नियमावलीद्वारे माणसाचे मन आपल्या धार्मिक वृत्तीकडे वळविले जाते. या धार्मिक पुस्तकातून आपणास स्वत:वर ताबा मिळविण्याचे ज्ञान तर मिळतेच पण त्याबरोबरच कोणत्या गोष्टी टाळल्या पाहिजेत याचीही माहिती मिळून आपले जीवन योग्य दिशेने प्रवाहित करण्याची वृत्तीही निर्माण करते. फक्त याचा उपयोग चतुरपणाने करावयास हवा. हा स्वैराचार व स्वतंत्रता आणि धार्मिक भावना निर्माण करणे हे मानवी दु:खाचे मूळ आहे. म्हणूनच तो धर्मकांडापासून दूर रहातो त्यात खरे म्हणजे आपणास सर्वकाही प्रापत होते जसे एखादे यंत्रातील कामकाजाबाबत असलेली मार्गदर्शक पुस्तिका! कारण शेवटी मानवी शरीर हे एक यंत्रच आहे. जे अतिशय गुंतागुंतीचे आहे. त्यामुळे धर्माने घालून दिलेले आचार, विचार व नियमावलीचे तंतोतंत पालन आवश्यक आहे. यासाठी त्याला आपले जीवनात विविध फेरबदल करावे लागतील व स्वभावाला मुरड घालावी लागेल.

याबाबत खरे तर माणसाला पूर्णपणे स्वातंत्र आहे की त्याने याप्रमाणे वागणूक करुन आपले जीवनमान सुधारावे किंवा व मग कायम दु:खाचे गर्तेत राहून जास्त सहन करीत रहावा. तो स्वत:च स्वत:ला वाचवू शकतो किंवा मारु शकतो.

यामुळे आपली वेद, पुराणे व उपनिषदे ही सुखाची गुरुकिल्ली आहेत. त्यामध्ये स्वत:चा विकास व साधता येतोच पण आपले राष्ट्रीय कार्यासही हातभार लावण्याचे समाधान लाभू शकते. मग आपण या अत्यंत अशा पध्दतीचा जी पूर्णपणे परिक्षेत उतरली आहे, तिचा आपले जीवनमान सुधारण्यासाठी व उंचावण्यासाठी अंमलात आणण्यात दिरंगाई करण्यात काय अर्थ आहे? रजनीशच्या म्हणण्या प्रमाणे मिळालेले स्वातंत्र्य हे खरे स्वातंत्र्य नव्हेच पण ते आपणास परम दु:खाचे गर्तेत ढकलत असते पण हेच स्वातंत्र्य जर निसर्ग नियमांचे पालन करुन व दुसऱ्याचे हक्काबाबत जागरुक राहून, त्याचे भान ठेवून मिळविले असेल तर आपण भरभराटीचे, विपुलतेचे जगतात प्रवेश करतो. आपले देशाची राज्यघटना ही व्यक्तिस्वातंत्र्याची चाहती व पुरस्कर्ती आहे. पण त्याच बरोबर त्यासाठी काही आवश्यक नियमावली व अटी याचे आपणास पालन करावे लागते आणि मगच आपणास इच्छित गोष्टी घडून येतात. हे नियम व

अटीच स्वातंत्र्याला खरा अर्थ प्रदान करतात.

तसेच आपली धार्मिक पुस्तके व ग्रंथ आपणास जीवन जगण्यासाठी असलेले मार्ग नियम हे शिकवितात व त्यामुळे जगात कसे जगावे, वावरावे याचे आपणास ज्ञान प्राप्त होते. यामुळे आपले जीवन हे पूर्णत: सुखमय व बिना अडथळ्याचे होते नव्हे सुखमय होते. ज्यावेळी यासर्वांसाठी कुशल बुध्दीमत्ता जाणीव व नियमांचे व्यवस्थित रितीने पालन होते त्यावेळी आपण जगाशी यथायोग्य संवाद साधू शकतो. आणि समृध्द जीवनाची अनुभूती घेऊ शकतो. ज्याप्रमाणे विद्युत प्रवाहाचा आपण निरनिराळ्या उपकरणाद्वारे पाहिजे तेव्हा व पाहिजे जितका उपभोग घेवू शकतो फक्त त्याचे बाबत जी काळजी घेणे आवश्यक आहे ती घेणे आवश्यक आहे.

या विद्युततेपणाने आपणही धार्मिकतेचे नियमाचे काटेकोरपणे पालन केले तर आपले जीवनही उज्वल होईल. अन्यथा हीच शक्ती आपले सर्वनाशास कारणीभूत होऊ शकते.

## ४.५) स्वामी चिन्मयानंद ह्यांच्या तत्वांची सामाजिक उपयोगीता सिध्द करणे :-

प्रस्तुत संशोधनाच्या प्रमुख उद्दिष्टापैकी एक महत्वाचे उद्देश म्हणजे, ''स्वामी चिन्मयानंद ह्यांच्या तत्वांची सामाजिक उपयोगीता सिध्द करणे.'' ह्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी व गुरुदेवांच्या शिक्षण विषयक विचारांपैकी काही विचारांचे ह्या ठिकाणी विश्लेषण आधुनिक काळाच्या संदर्भात करण्यात येत आहे. शिवाय दुय्यम उद्देशात नमूद केल्याप्रमाणे आधुनिक युगात स्वामी चिन्मयानंद ह्यांच्या विचारांचे महत्व सिध्द करणे ह्या क्रमाच्या दुय्यम उद्देशास अनुसरुन खालीलप्रमाणे विवेचन देण्यात येत आहे. हे विवेचन त्यांच्या विशेषत्वाचे शैक्षणिक विचारांना अनुसरुन देण्यात येत आहे. कारण संशोधनाचा विषय हा शैक्षणिक आहे.

सर्वप्रथम गुरुदेवांनी आपल्या बऱ्याच लिखाणातून सद्य स्थितीवर प्रकाश टाकला आहे. समाजाच्या सद्य स्थितीबाबत त्यांना कमालीचे अस्पष्टता होती. तैतरीय उपनिषदाच्या विवेचनात ते म्हणतात, ''अपरिपक्व बुध्दीच्या व असंस्कृत अंत:करणाच्या लोकांच्या हातात संपत्ती येणे केवळ त्यांचाच घात करणारे असते असे नाही तर समाजाच्या खऱ्या स्थैर्यालाच ते धोकादायक असते. किंबहूना आपल्या आजच्या जगात आपल्या सर्व राजकीय व आर्थिक समस्यांचे मूळ हे श्रीमंताच्या चारित्र्याच्या अभावाताच आढळते. आपल्या ह्या शास्त्रीय जगातील भौतिक वादाने असे आकर्षण निर्माण केले आहे की, ज्यात अंतकरणाने सज्जन, बुध्दीने निर्मळ असणाऱ्या लोकांना संपत्ती प्राप्त करण्यात अगदी मर्यादित वाव असतो. तर खऱ्या खोट्याची चाड नसणाऱ्या अप्रामाणिक लोकांजवळ संपत्ती आनायास जमते. असा निर्दय माणूस जेव्हा धनवान बनतो तेव्हा तो आपल्या स्वैराचारी स्वातंत्र्याचा उपभोग घेण्याकरिता समाजाला आग लावीत सुटतो. अशा स्फोटक सत्ताधाऱ्यांना आपला बाजार जास्त काळ मंदीत चालणे शक्य होत नाही आणि म्हणून ते युध्द घडवून आणण्याचा व्यूह रचतात.'' वरील विधानावरुन लक्षात येते की, आधुनिक भौतिकवादात, भोगलालसावृत्ती, सत्ता पिपासुवृत्ती, चारित्र्याचा अभाव, मन व बुध्दीच्या विकासाचा अभाव ह्या आजच्या महत्वाच्या समस्या आहेत व ह्यावर अनेक उपाय सुध्दा त्यांनी सांगितले. त्यातीलच एक उपाय म्हणजे त्यांच्या शिक्षण विषयक विचार आणि म्हणूनच आजच्या काळात त्यांच्या शैक्षणिक विचारांचे महत्व हे विषद

करण्यात येत आहे हे विचार पुढीलप्रमाणे ह्याकरिता मतावलीतील मुद्यांच्या आधार घेण्यात आला आहे.

## आज शिक्षणामुळे योग्यतेत वाढ झाली पण आपल्या कर्माच्या क्षेत्रात ज्ञानाचा उपयोग करण्याची क्षमता विकसित झाली नाही :-

गुरुदेवांनी ह्या विधानाच्या माध्यमातून आजच्या शिक्षण प्रणालीची भीषण वास्तवता प्रगट केली आहे. आज शिक्षणात माहितीवर भर असतो. भरमसाट माहितीच्या आधारे व भरपूर गुणप्राप्ती नंतर आज सर्वसामान्यपणे व्यक्तिमध्ये योग्यता निर्माण झाली आहे असे समजले जाते पण ह्या ज्ञानाचे उपयोजन करण्याची क्षमता त्यांच्या अंगी येते आहे. वाणिज्य शिकणारा मुलगा हा हिशोबाबत पक्का असतो का? प्रत्येक बी.एड. झालेला छात्रशिक्षक हा आदर्श शिक्षक होऊ शकतो का? गृह विज्ञान शिकलेली प्रत्येक मुलगी ही आदर्श गृहिणी होऊ शकेल का? Child Development चा अभ्यास करणारी माता ही उत्कृष्ट माता होऊ शकेल का? ही आमच्या शिक्षण प्रणालीची भीषण वास्तवता आहे.

## व्यक्तिमत्व विकासाकरिता हृदयाचे शिक्षण आवश्यक आहे :-

आज प्रामुख्याने शिक्षण हे Brain Oriental आहे. आजचे शिक्षणातून मेंदूला भरपूर खाद्य पुरविले जाते पण त्यातून हृदयाचा विकास हे शिक्षणाचे ध्येय दुर्लक्षित राहते आणि त्यामुळे आज आपणास जागतिक स्तरावर जी परिस्थिती आढळते ती म्हणजे दहशतवाद. आज दहशतवादाचा प्रश्न अत्यंत पेटला आहे. त्याचे महत्वाचे कारण म्हणजे मानवाच्या हृदयाचा विकास झाला नाही आणि परिणामी हृदयाची संकुचितता निर्माण झाली व ह्यातून अनेक प्रश्न आज पेटले आहेत. मग हा प्रश्न जातीयतेचा असो, धर्मिकतेचा असो, सांप्रदायिकतेचा असो. हृदयाचा विकास न झाल्याने ह्या समस्या आज भेडसावत आहे. परिणामी दिवसेंदिवस दहशतवाद ही समस्या वाढतेच आहे. हिंसाचार वाढतोच आहे. ह्या पार्श्वभूमीवर गुरुदेवांचे हे विचार अत्यंत उपयुक्त असे आहेत.

## व्यक्तिमत्व पुननिर्माणासाठी सम्यक जीवनात बौध्दिक शिक्षण व मनाची पुनर्व्यवस्था आवश्यक आहे :-

व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास हे शिक्षणाचे अंतर्भूत व अनिवार्य ध्येय आहे. पण आज आपण पाहतो की समाजात विघटीत व्यक्तिमत्वाची माणसे घडत आहेत. त्यामुळे समाजाचेही व्यक्तिमत्व विघटीत झाले आहे. त्यामुळे त्याचा राष्ट्रावर विपरीत परिणाम होतो. परिणामी व्यक्तिमत्वाचे पुननिर्माण करण्याची आवश्यकता आज निर्माण झाली आहे व ह्या पुननिर्माणामध्ये सर्वात महत्वाचा घटक जो आहे तो म्हणजे मन आणि बुध्दीचा विकास आज शिक्षण प्रक्रियेच्या माध्यमातून सर्वप्रथम मानवी मनाचा विकास व विस्तार व्हायला हवा व असे झाल्यास तो बौध्दिक विकासाच्या स्तरावर येतो व बौध्दिक विकास हा क्रम विकासाच्या तत्वानुसार घडून येतो. पण आज मानवी व्यक्तिमत्वाचे हे सूक्ष्म घटक विकासाच्या संकल्पनेत दुर्लक्षित राहत आहेत. परिणामी आज आवश्यकता आहे ती व्यक्तिमत्वाच्या पुननिर्माणाची व त्याकरिता मन व बुध्दीचा विचार शिक्षणाला करावाच लागेल.

## ज्ञान आवश्यक आहेच पण त्याच सोबत त्याचे उपयोजनही :-

आज शिक्षणाची वास्तविक परिस्थिती अशी आहे शाळा म्हणजे माहिती प्रदान करणारी Information shop झाली आहे. शिक्षक हे माहितीचे विक्रेते तर विद्यार्थी हे माहितीचे ग्राहक बनले आहेत. परिणामी संपूर्ण शिक्षक हे information oriented झाले आहेत पण ह्या शिक्षणात उपयोजन सामर्थ्य व शिक्षणाचा उपयोग प्रत्यक्ष जीवनात होत नाही.

## जेव्हा शास्त्र ज्ञानाला मनाच्या माध्यमातून आत्मसात केले जाते व त्याचा अभ्यास केला जातो तेव्हा ते आपल्या कृतीला नवीन निर्माण करते :-

आज शास्त्रज्ञानात प्रचंड वाढ झाली आहे नव्हे ज्ञानाचा विस्फोट झाला आहे. शास्त्रज्ञानाचा व्यक्ती अभ्यास करतो. पण तो अभ्यास इतका वरवरचा असतो की तो जीवनातून उतरत नाही. कोणतेही शास्त्र हे मानवाच्या विध्वंसाकरिता नाही तर ते त्याच्या कल्याणासाठी आहे. मानवाचे कल्याण हे शास्त्राचे अधिष्ठान असते. पण मानवी मनाच्या स्तरावर ते तसेच्या तसे स्विकारल्या जात नाही. ह्याचे महत्वाचे कारण मानवी मनाला तशी

सवय झाली नसते आणि म्हणून त्या ज्ञानाचा मनाच्या स्तरावर अभ्यास झाला तसा त्याचा बौध्दिक स्तर पक्का निर्माण होत नाही. बौध्दिक स्तर त्याचा वापराबाबत विवेक निर्माण होत नाही आणि म्हणूनच त्याचा वापरही हा योग्य पध्दतीने होत नाही व परिणामी हे ज्ञान जेव्हा मानवाच्या कृतीत उतरते तेव्हा ती विकृती निर्माण करते. हे तत्व लक्षात घेता मानवाचे व्यवहार मनाच्या स्तरावर चालतात व मनाच्या स्तरावर त्याचा अभ्यास झाला की हे ज्ञान बौध्दिक स्तरावर येते त्याच्या विवेकी वापराबबातची निर्णयक्षमता व्यक्तीत येते व परिणामी त्याच्या कृतीला एक वेगळा आयाम निर्माण होतो.

## केवळ निर्देशन म्हणजे शिक्षण नाही :-

## निर्देश बाहेरुन दिले जातात पण शिक्षण शिष्याच्या हृदयातील प्रज्वलीत व गुरुद्वारा संरक्षित आंतरिक वस्तु आहे :-

आज Instructional Technology अर्थात अनुदेशन तंत्रज्ञान हे अत्यंत विकसित अशी ज्ञान शाखा झाली आहे. ह्याच्या माध्यमातून अनुदेशनपध्दतीही बऱ्याच विकसित झाल्या आहेत. अगदी भविष्यात आता शिक्षकाचीही गरज भासेल किंवा नाही इतका संभ्रम निर्माण व्हावा इतपत संगणकीकरण शिक्षणाचे झाले व शिक्षकांची जागा संगणकाने घेतली आहे. परिणामी आज शिक्षकांची भूमिका ही Facilitator म्हणून आहे. अर्थात शिक्षकाला पर्याय संगणक असू शकत नाही. परंतु त्यामुळे बालकाच्या सुप्त शक्तीची पाहिजे त्या प्रमाणात अभिव्यक्ती होत नाही. लहान मुले आपले ज्ञान अनुभव घेऊन ह्या प्रणालीत प्रवेश होतो पण त्याच्यातील सुप्त कार्य क्षमतेचे पाहिजे तसे प्रगटीकरण होऊ शकत नाही कारण आपण खूप सारी माहिती त्याच्या डोक्यात कोंबत असतो. शिक्षकांना अभ्यासक्रम पूर्ण करण्याची घाई असते. त्यामुळे त्याच्यातील सुप्त शक्ती ही शालेय काळात अभिव्यक्तच होत नाही. ती मारली जाते. त्यामुळे दुबळ्या व्यक्तिमत्वाचा विद्यार्थी आज शिक्षणप्रणालीतून घडतो आहे आणि म्हणूनच निर्देशनापेक्षा शिक्षण महत्वाचे आहे हा विचार महत्वपूर्ण ठरतो.

## Self Cleansing ही प्रक्रिया शिक्षणाच्या माध्यमातून व्हायला हवी :-

"आज प्रत्येक ठिकाणी कुरुपता आपणास आढळते. बाह्य भौतिकवादी जगतात

सर्वत्र कुरुपता आहे'', असे विधान आपणास नेहमी ऐकावयास मिळते. पण ही कुरुपता घालविण्यासाठी प्रत्येकाने स्वत:ची कुरुपता सर्वप्रथम घालवायला हवी. अर्थात आपल्या आंतरदृष्टिकोनाच्या प्रक्षेपणातून आपल्याला बाह्य जगाची अनुभूती येते. आपले अंतर्मन जसे असेल तसे आपणास जग दिसते. आपल्या व्यक्तिमत्वाच्या गुणवत्तेचा पोत हा आपल्या मनावर अवतरला असतो. अर्थात मानसिक विकास झाला असेल तर विचारांचा व कृतीचाही पोत चांगला राहतो पण हे सर्व करण्यासाठी स्वत:च्या मनाचे शुध्दीकरण आवश्यक ठरते. ह्यासाठी मूल्याचे प्रत्यक्ष आचरण महत्वाचे ठरते ह्याबाबत गुरुदेवांनी परिपूर्ण योजनाच दिली आहे. अंतर्गत सौंदर्य विकसित करणे आवश्यक आहे. ह्या दृष्टीने हा विचार महत्वाचा ठरतो.

## शालेय व व्यावसायिक शिक्षण पूर्ण केल्यावर बाह्य जगात पाऊल टाकतांना विश्वाच्या रचनेत आपले नेमके स्थान काय आहे हे कळायला हवे :-

आज मानवी जीवन अतिशय संकुचित झाले आहे. प्रत्येक व्यक्तिचा अहंकार वाढतो आहे. ही संकुचितता व अहंकार हा मानवतेचा गळा दाबतो आहे. मानवता धर्माचा मानवाला दिवसेंदिवस विसर पडत चालला आहे. आपले कुटुंबात स्थान काय, समाजात, राष्ट्रात स्थान काय व ह्या विश्वास अर्थात विश्वाच्या रचनेत आपले स्थान काय ह्याबाबत तो अजिबात विचार करीत नाही. ह्या विश्व रचने मध्ये मानव ही निर्माण कर्त्याची सर्वश्रेष्ठ अभिव्यक्ती आहे. पण ह्याचा विसर मानवाला पडला आहे. हे आपणास पावलोपावली आढळते. अध्यात्मशास्त्रानुसार मानवाचा स्व पासून विस्तार होत स्व कुटुंब, समाज, राष्ट्र, विश्व असा होत असतो. विश्व रचनेत अखिल विश्व ही आपलीच अभिव्यक्ती आहे. ही अनुभूती महत्वाची आहे. ह्या दृष्टीने त्याचे संस्करण होणे महत्वाचे आहे. ह्या विश्वातील माझे स्थान अगदी अणुभाग आहे पण तरीही मी व्यापक आहे. हे स्थान प्रत्येक व्यक्तिने ओळखायला हवे. अर्थात असे घडले तर केवळ मानव जातच नाही तर सर्व प्राणीमात्र देखील अत्यंत आनंदाने ह्या पृथ्वीवर निर्भयपणे राहू लागतील व विश्वबंधुत्वाचे वेगळे संस्कार मानवावर करावे लागणार नाहीत. कारण सह अस्तित्वातून ते आपोआपच साधले जाईल. पण हा विकास बाह्य विश्वात पाऊल टाकण्यापूर्वी व्हायला हवा. याचे कारण म्हणजे संपूर्ण विश्वाच्या संपर्कात येण्यापूर्वीच जर त्याचा वैश्विक दृष्टिकोन विकसित झाला तर त्याचा सर्वांगीण विकास व्हायला तो फायदेशीर ठरतो.

## आज विद्यार्थी शिक्षित होतो पण तो ज्ञानी होत नाही :-

आज आपण समाजात शिक्षणाबाबत विविध गैरसमज पाहतो. शाळेत जाणे, पदव्या संपादन करणे, पांडीत्य प्राप्त करणे, ह्याला सहसा शिक्षण म्हटले जाते. पण वास्तविक ही शिक्षणाची संकल्पना नाही. कारण प्रश्न असा उद्‌भवतो की बालक शाळेत जाण्यापूर्वी त्याचे शिक्षण होत नव्हते का? शाळा सोडल्यावर शिक्षण होणार नाही का? शाळा हे औपचारिक शिक्षणाचे माध्यम आहे पण अनौपचारिक शिक्षण हे जेव्हा बालकाचा अनुवंश पक्का होतो तेव्हाच त्याचे सुरु होते हे शिक्षण मृत्युपर्यंत सुरु असते. ह्यात त्याचे आपल्या परिसरातून त्याने घेतलेले विविध अनुभव हे त्याचे शिक्षक असतात. शिक्षण ही संकल्पना संकुचित नाही ती पदव्यापुरते मर्यादित नाही पदव्या संपादनातून फार तर ह्या विद्यार्थ्याला नोकरीचे किमान ज्ञान प्राप्त होईल पण त्याच्या सुप्त शक्तीचे जागरण होणार नाही व ज्या पासून आपल्यातील सुप्त शक्तीबाबत व्यक्तिला भान येत नाही त्याला शिक्षण म्हणता येणार नाही. शिक्षणातून मानवाच्या अंतर्गत शक्तीचे जागरण व्हायला हवे.

## नैतिक सौंदर्य, सांस्कृतिक महानता, राष्ट्रीय संघटन, रचनात्मक उत्पादन क्षमता, अनुशासीत उन्नती हे गुण शिक्षणातून विकसीत व्हायला हवे :-

आज समाजाची नितीमत्ता ढासळते आहे. समाजात अनाचार निर्माण झाला आहे. सर्वत्र खून दरोडे, बलात्कार ह्यांच्या माध्यमातून समाजाचे भयावह रुप डोळ्यासमोर येत आहे. अतिशय लहान वयापासून मुलेमुली ह्या व्यसनाधीन होत आहेत. शाळकरी मुले हे खून, दरोडे ह्याच्या मागे लागले आहेत. अशा प्रकारच्या अनेक समस्या आज निर्माण झाल्या आहेत व समाजात एक प्रकारची नैतिक कुरुपता निर्माण झाली आहे. भारतीय संस्कृती परंपरा ह्याची चाड आज राहिलेली नाही. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात पाश्चात्यांचे अनुकरण करण्याची वृत्ती आज वाढते आहे. हे अक्षरश: अंधानुकरण आहे. भारतीय संस्कृती महान आहे पण तीचे संस्कार आधुनिक पिढीवर होत नाही. परिणामी राष्ट्राची उन्नती ह्यावर परिणाम होतो आज राष्ट्राची भौतिक उन्नती आपल्याला होतांना आढळते. पण ही प्रगतीचे मोजमाप नाही. नैतिक दृष्टिकोनातून तो पोखरला जात आहे. त्यामुळे राष्ट्राची उत्पादन क्षमतेवर त्याचा परिणाम होतो. उत्पादन क्षमता वाढविणे हे महासत्ता होण्याच्या वाटेवरही आहे पण ही उत्पादन क्षमता रचनात्मक

नाही. त्यातून भारताचा सुव्यवस्थित विकास होत नाही व सामाजिक, अध्यात्मिक विकास त्यामुळे खुंटला आहे.

## अहंकाररहित कर्म करण्याची भावना म्हणजे यज्ञ भावना विकसित व्हायला हवी. आज प्रत्येक व्यक्ती ही अहंकाराने लडबडली आहे :-

व्यक्तिची ही अहंकार वृत्ती इतकी वाढते आहे की त्याच्यातील ह्या अहंकाराने आज आसुरी रुप धारण केले आहे. स्वत:चा स्वार्थसाधु व्यक्ती आज समाजात उजळमाथ्याने वावरत आहे. ''उध्दवा अजब तुझे सरकार'' ह्या कवीतेची आठवण व्हावी इतपत समाजामध्ये स्वार्थीभाव व अहंकार वाढतो आहे. पण कोणतेही कार्य हे अहंकार विरहीत करण्याचे संस्कार आज होण्याची आवश्यकता आहे. संपूर्ण विश्व हे कर्मकुंड असून ह्यात आपल्या कर्माची आहुती टाकण्याची संस्कार आज होण्याची आवश्यकता आहे. प्राचीन काळी कर्म हे यज्ञ भावनेने होत असे. अर्थात ज्याप्रमाणे यज्ञात आहुती ज्याची टाकली जाते त्या वस्तुबाबत मनात आसक्ती ठेवता कामा नये. अशाने आहुतीच्या माध्यमातून यज्ञात आपले वाईट विचार, वासना, कर्म हे समर्पित करण्यात येत असे. कर्माबाबतचा हाच दृष्टिकोन महत्वाचा आहे. पण आज अगदी आपल्या वृध्द आई वडिलांना न सांभाळण्याची वृत्ती, पैशासाठी नात्याचा गळा शोधणारी वृत्ती जेव्हा समाजात आपणास पहायला मिळते तेव्हा गुरुदेवांच्या ह्या विचारांचे महत्व पटल्याशिवाय राहत नाही. शिवाय यज्ञ भावनेने कर्म केल्याने त्यापासून अहंकार निर्माण होत नाही. आज जगात ज्या सर्व समस्या निर्माण होत आहेत, त्या केवळ अहंकारातून निर्माण होत आहेत. ह्या अहंकारापायी मान, अपमान ह्या भावना जागृत होतात व व्यक्तिची आंतरिक शांती ढळते व ह्याचा परिणाम त्याच्या बाह्य वर्तनावर होतो. परिणामी अंतर्मनाने अशांत असणारी ही व्यक्ती बाह्य वातावरणात अर्थात बाहेरच्या जगातही तो अशांतता निर्माण करतो. आज सर्व सुखे मानवासमोर हात जोडून उभी आहेत. मानवाला शांतता नाही. ज्याचे जीवन सातत्यपूर्ण अशांत आहे पण ही शांतता कोणत्याही बाह्य उपचारांनी निर्माण होत नाही. तर आपले विचारांचे तरंग आपण थांबविले तर त्यानुसार त्याच्या कर्मावर परिणाम होतोव त्याची परिणीती शांतता निर्मितीत होते. म्हणून ह्यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून विचार शुध्दीकरण व विचार सौंदर्यीकरण ही प्रक्रिया

महत्वाची ठरते. असे घडल्यास विचार सुसंस्कारीत होतील. परिणामी मानवाची कर्मेही सुसंस्कारीत होतील. नवीन कर्मात यज्ञ भावना असल्यामुळे त्या कर्माचे वेगळे संस्कार मनावर उठणार नाही व परिणामी मनाची शांतता ह्यातून साधेल ही क्षमता मानवाच्या अंगी शिक्षणाच्या माध्यमातून यायला हवी. आज नेमके ह्याच्या उलट घडते आहे. मानव जे कर्म करतो ते अहंकार युक्त आहे. त्याच त्याच्या स्वार्थी भावना आहेत. परिणामी ह्य कर्मामुळे नवनवीन वासना त्याच्यात निर्माण होतात. ह्या वासनांची पूर्तता करण्याच्या त्याच्या कामना तीव्र होतात. अनेक मार्ग त्याच्या समोर निर्माण होतात. त्यातून तो केवळ आपल्या स्वार्थ पूर्तीच्याच मार्गाची निवड करतो व पाहिजे त्या पध्दतीने तो आपल्या इच्छा पूर्ण करतो. ह्यात त्याच्या विचारावर कोणतेही चांगले संस्कार होणे ही बाब अत्यंत दुरापास्त ठरते. अर्थात वासना अनेक वाईट, विचार अनेक तर कर्मही तशीच घडतात. प्रत्येक स्वार्थी कर्मातून पुन्हा वासना डोहात विचार तरंग निर्माण होतात व तो अधिकाधिक अशा वासनापूर्तीच्या मागे धावतो व अशांत बनतो. अशा अनेक अशांत व्यक्तिचा समाज निर्माण झाला की, राष्ट्रही अशांत होते. सर्वत्र अनाचार मग राष्ट्रात बोकाळतो.

## सर्व साक्षर झाले पण सुशिक्षित झाले असे म्हणता येणार नाही. बाह्य उपचारांनी नवीन विचारांचे रोपण होऊ शकते पण शिक्षकाचे अंतिम लक्ष आत्मपरिवर्तन आहे. Transfusion of Idea नको तर Transformation आवश्यक आहे :-

प.पू. गुरुदेव हे अध्यात्मवादी तत्वज्ञ आहेत. शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही त्यांचा आध्यात्मिक आहे. ज्ञानप्राप्ती ह्या संकल्पनेशी त्याचा दृष्टिकोन निगडीत आहे. ज्ञानप्राप्ती ह्याला त्यांनी पवित्र कर्म मानले आहे. शिवाय शिक्षणाला ते गुरुच्या माध्यमातून, शिष्यामधील संरक्षित वस्तू आहे, असे मानतात. शिक्षणातून एकात्म व्यक्तिमत्व विकसनावर त्यांनी भर दिला आहे. अर्थात केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण हे त्यांना मान्य नाही. प्राचीन संकल्पना जी आहे ती म्हणजे शिक्ष् ह्या धातूपासून शिक्षण ह्या शब्दाची निर्मिती झाली आहे व ह्याचा अर्थ म्हणजे बदल होणे. पण आज मात्र शिक्षणाचा अर्थच वेगळा घेतला जातो. आज शाळेत जाणे किमान लिहता वाचता येणे म्हणजे शिक्षण असा शिक्षणाचा अर्थ घेतला जातो. पण

केवळ साक्षर झाल्याने माणूस सुसंस्कृत होईलच असे म्हणता येणार नाही. कारण साक्षरता हे शिक्षणाचे साधन आहे ते शिक्षणाचे साध्य नाही. पण आज जगात साध्यापेक्षा साधनांनाच अधिक महत्व प्राप्त झाले आहे व साध्याकडे दुर्लक्ष होत आहे. माणूस साक्षर झाला म्हणजे तो सुसंस्कृत होईलच असे नाही. कोणताही नवीन विचार मानव मानसिक स्तरावर स्विकारतो पण बुध्दीच्या स्तरावर त्या बाबतचा अंतिम निर्णय मात्र होऊ शकत नाही. कारण आजच्या शिक्षणाने मानवाच्या विवेक शक्तीचा विकास होत नाही. परिणामी आपल्या कल्याणाचा मार्ग कोणता त्याची निवड ता करु शकत नाही. त्यामुळे आजच्या शिक्षणातून संकल्पनांचे वहन होते. पण त्यातून आत्मपरिवर्तन मात्र होऊ शकत नाही आणि म्हणूनच आज आपण अनेक व्यक्ती अशा बघतो की, ज्याचे शिक्षण भरपूर आहे तो अत्यंत उद्दामपणे वागतो. वास्तविक आपण निसर्गतही बघतो की, झाड जेव्हा फळाफुलांनी बहरते तेवढे ते वाकलेले असते पण माणूस जेव्हा डिग्र्यांनी अलंकृत होतो तेवढा तो ताठर बनतो आणि मग त्याचे वर्तन हे त्याला न शोभणारे असते आणि म्हणूनच मानव शिकला म्हणजे सुसंस्कृत झाला असे आपणास म्हणता येणार नाही. पण मानवातील अहंकारी व्यक्ती बुध्दीच्या निर्देशाप्रमाणे वागायचे नाकारते तेव्हा त्याच्या वर्तनात ताठरपणा निर्माण होतो पण कोणतीही संकल्पना जी बुध्दीच्या स्तरावर पक्की झाली त्याच्या निर्देशानुसार मानवी अहंकार कार्य करतो तेव्हा त्याचे वर्तन हे समाजाकरिता व राष्ट्राकरिता सुध्दा अत्यंत कल्याणकारी ठरते. मानवाच्या आंतरिक व्यक्तिमत्वाचे विघटन झाल्याने मानवात आत्मपरिवर्तन आज होतांना आपणास आढळत नाही आणि म्हणून गुरुदेवांच्या ह्या विचाराचे महत्व आजच्या काळात आत्याधिक वाटते.

## विद्यार्थ्याला उच्च आदर्शाप्रत न्यायचे असेल तर गुरुला शिष्याच्या बौध्दिक स्तरापर्यंत येऊन त्याचा बौदिक स्तर वाढवावा लागेल :-

शिक्षणाचे मानसशास्त्र अतिशय सुंदर रितीने ह्या ठिकाणी उलगडून दाखविले आहे. शिक्षणातून आज विद्यार्थ्याची हुशारी वाढते. आजची पिढी ही अत्यंत हुशार आहे, असे विधान आपण नेहमी करतो. पण ही हुशारी म्हणजे त्याचा बौध्दिक स्तर नव्हे फार तर ती आकलन क्षमता आपणास म्हणता येईल. आज आपण पाहतो शिक्षकांची भूमिका ही नवीन शिक्षण प्रणालीने Philosopher, Friend, Guide, Facilitator ह्या स्वरुपात मानली आहे.

पण खऱ्या अर्थाने शिक्षक हा विद्यार्थ्यांचा मित्र झाला का? त्याच्या अनुभव विश्वात जाण्याचे सामर्थ्य किती शिक्षकांच्या अंगी आहे? आज शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्याला उच्च आदर्शाप्रत न्यायचे आहे. पण ह्या मार्गाकडे केवळ दिशादर्शन करुन ही बाब साध्य होणार नाही तर शिक्षकाला त्याचे बोट धरुन त्याला ह्या मार्गावर न्यावे लागेल. अर्थात शिक्षकाला विद्यार्थ्यांच्या बौध्दिक स्तरापर्यंत यावे लागेल व त्यांचा बौध्दिक स्तर वाढवावा लागेल. अर्थात आज शिक्षक आणि विद्यार्थी ह्यांच्यात जे अंतर निर्माण झाले आहे हे अंतर मिटणे ही बाब महत्वाची ठरते.

## पुस्तकातून मिळालेले ज्ञान मनन, चिंतनाने आत्मसात करावे लागते. त्यानंतर काही काळ त्यावर सराव करावा लागतो :-

आज शिक्षण पध्दतीमध्ये एक अत्यंत मोठा दोष आहे की आजचे शिक्षण हे पुस्तककेंद्री व गुणकेंद्री आहे. पुस्तकांचा माहितीचा भडीमार आपण विद्यार्थ्यांवर करतो. विद्यार्थी ह्या माहितीचे पाठांतर करतो किंवा ही माहिती आपल्या डोक्यात कोंबतो व परीक्षेच्या वेळी हीच माहिती जशीच्या तशी उत्तरपत्रिकेत उतरवितो व गुणांच्या टक्केवारी नुसार मग त्याची बुध्दीमत्ता पडताळली जाते. ह्या सर्व प्रक्रियेमध्ये हे ज्ञानाचे त्याने आत्मीकरण केले आहे अथवा नाही ही बाब विशेष पाहिली जात नाही. त्यची पध्दती त्यांना शिकविली जात नाही. कोणत्याही माहितीवर प्रक्रिया केल्याशिवाय त्या माहितीचे आत्मिकरण होत नाही. ही प्रक्रिया मनन, चितन ह्या प्रक्रियेतून जाते. अर्थात कोणत्याही माहितीचे मानसिक स्तरावर मनन, बौध्दिक स्तरावर चिंतन होऊन त्याबाबतची दृढता व्हावी लागते व ह्या दृढतेसाठी त्यावर सराव होणे आवश्यक असते. पण आज ही बाब अत्यंत दुर्लक्षित होत आहे. शिवाय ह्या सरावानंतर त्या बाबत त्याचा Attitude बनायला हवा. ह्या ठिकाणी ज्ञान स्विकृतीची प्रक्रिया पूर्ण होते. आज ज्ञान कौशल्य अभिवृत्ती ह्यावर शिक्षण प्रक्रियेत केवळ भर दिला जातो. पण नेमके प्रत्येक स्तरावर ह्या तीनही बाबीचे तंतोतंत पालन होत नाही. ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे शिक्षणव्यवस्थेची पहिल्या पायरीवर आपण ज्ञान नाही तर माहिती देत आहोत. त्यामुळे अगदी प्राथमिक स्तरापासून अभिवृत्ती ही दुर्लक्षित राहते आहे. कौशल्य निर्माण होते आहे पण जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात कौशल्य निर्माण होत नाही. हा सगळा विचार केला तर गुरुदेवांनी

जो ज्ञान सात्मीकरणाचा मार्ग सांगितला त्याचे आचरण त्याचे पालन शिक्षणक्षेत्रात व्हायला हवे व ह्यातून बालकाचा Mental Attitude घडायला हवा.

## शिक्षण ही शिष्याची आत्मज्योती आहे जी शिक्षक जोपासतात :-

बाहेरुन लादले जाते ते शिक्षण असत नाही. ती केवळ माहिती व पोपटपंची असते. शिक्षण ही विद्यार्थ्यांची आत्मभिन्नता आहे व ती अशी ज्योत आहे जी गुरु स्वत: संरक्षित करतात. अर्थात ह्याचाच अर्थ ह्या आत्मज्योतीचे बाह्य षडरिपूपासून बाह्य वाईट प्रवृत्तीपासून ते संरक्षण करतात. आज आशय अतिशय दुर्लक्षित होत आहे. कारण आज शिक्षणातून सर्व प्रकारचे विकार बळावतात आहेत. परिणामी शिक्षित माणूस हा आपले संस्कार विसरत चालला आहे. शिक्षकाची भूमिकाही बदलत आहे.

## ईश्वराच्या न्यायाशी मानवाने गैरवर्तन करु नये ही पर्यावरण शिक्षणाबाबत दृष्टी असावी Stop dirting and posioning the river, the river will purify हा पर्यावरण शिक्षणाबाबत दृष्टिकोन हवा :-

आज शाळाशाळांमधून पर्यावरण शिक्षण अनिवार्य करण्यात आले आहे. अगदी उच्च शिक्षणात सुध्दा पर्यावरण शिक्षण हा अनिवार्य विषय म्हणून घेण्यात आला आहे. आज जागतिक तापमानवाढ, पर्यावरण ऱ्हास ह्या समस्या आपल्यासमोर भेडसावत आहेत. पर्यावरण ऱ्हासाचे चटके आज अखिल विश्वाला भेडसावत आहेत आणि ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे मानवाने निसर्गाचा नियम तोडला. तो निसर्गावर मात करु पहात आहे. वृक्षतोड, जंगलतोड इ. निसर्ग चक्रामध्ये तो ढवळाढवळ करतो आहे आणि त्याचा परिणाम म्हणून पर्यावरणाचा असमतोल. पण आज पर्यावरण शिक्षणातून मुलांमध्ये पर्यावरणाबाबत जी अभिवृत्ती निर्माण व्हायला हवी ती होत नाही. निसर्ग देवता ही नेहमीच पवित्र असते. आपण आपल्या वागण्याने तिला अपवित्र करतो. निसर्गाला अशुध्द करण्यापासून आपण वाचविले पाहिजे. पर्यावरणाचा झालेला ऱ्हास हा भरुन निघणारा नाही. पण ह्यापुढे त्याचा ऱ्हास होणार नाही ह्याबाबत आपण सतर्क रहायला हवे. केवळ पर्यावरण शिक्षण हे तात्विक स्तरावर देऊन चालणार नाही तर त्याचा प्रत्यक्ष जीवनात कसे उपयोजन करावे हा भाग अत्यंत महत्वाचा

ठरतो. आज गंगा शुध्दीकरणाचे अनेक प्रयत्न होत आहेत. पण ह्या प्रयत्नांनी गंगा शुध्द होणार नाही तर ह्यानंतर ती आणखी दुषित होणार नाही. ह्यासाठी मात्र काही प्रतिबंधात्मक उपाय व मानसिक स्तरावर उद्‌बोधन बौध्दिक स्तरावरील प्रबोधन महत्वाचे ठरते. आज पर्यावरणाचा ऱ्हास झाला आहे तो जास्तीत जास्त औद्योगिकरणामुळे. श्रीमंत राष्ट्रे अधिक श्रीमंत होण्यासाठी तर अविकसित राष्ट्र विकसित होण्यासाठी ही औद्योगिकरणाची प्रक्रिया वाढवितच आहेत. परिणामी ह्या स्पर्धात्मक परिस्थितीत पर्यावरणाचा भयंकर ऱ्हास होत आहे आणि त्याचे भीषण परिणाम Global Warming च्या रुपात आपणास पहावयास मिळत आहेत. मानवाची ही अनिर्बंध स्वार्थीवृत्ती, ही त्याच्याच ऱ्हासाला कारणीभूत ठरते आहे आणि म्हणूनच पर्यावरण शिक्षणातून निसर्गाच्या कार्यात ढवळाढवळ करु नका, असा संदेश मिळणे आवश्यक आहे.

**वर्तमान काळात मुलांच्या सुंदर स्वभावाची निर्मिती करण्यात यावी.**

**बालकांना खरा विचार करायला शिकवायला हवे.**

**आज मुलांना असे शिक्षण मिळावे की त्यांनी विनाशकारी निषेधात्मक भावनांचा अंगीकार करु नये त्यांचे जीवन रचनात्मक असावे.**

**शिक्षणातून सांस्कृतिक नुतनीकरण आवश्यक आहे.**

भारतीय संस्कृती ही प्राचीन व नित्यनूतन संस्कृती आहे. आजवर अनेक संस्कृती आल्या त्यातील काही संस्कृती ही काळाच्या ओघात नष्ट झाल्या पण भारतीय संस्कृती आजही आपले स्थान टिकवून आहे. ह्याचे कारण म्हणजे संपूर्ण विश्वाला आलींगन देण्याची क्षमता भारतीय संस्कृतीत आहे. पण आज आपल्या संस्कृतीचा आशय कोठेतरी लुप्त होतो आहे. ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे भारतीय संस्कृती ही अधिकार ह्या संकल्पनेवर आधारीत नाही. ती कर्तव्य ह्या संकल्पनेवर आधारीत आहे. पण आज मात्र समाजात अधिकार आणि कर्तव्य ह्याबाबतचा विवेक लयाला चालला आहे, असे आपल्या लक्षात येते. कर्तव्ये ही इतरांच्या प्रति करावी लागतात. कर्तव्यामध्ये ऋण फेडण्याची भावना असते. कर्तव्य करीत असतांना मानवाची मानसिकता ही अतिशय पवित्र असतो. व्यक्तीची कर्तव्य ही इतर व्यक्तिचा अधिकार

असतो व इतरांचा अधिकार जेव्हा व्यक्ती जपण्यासाठी धडपडते तेव्हाच समाजामध्ये व्यक्ती व्यक्तीत समन्वय निर्माण होतो. पण आज आपण समाजात जे दृष्य बघतो ते अत्यंत विदारक आह. आज स्वत: अधिकार मागण्यासाठी समाज अक्षरश: हिंसाचाराचा मार्ग स्विकारतो आणि आज तर देशामध्ये असे दृष्य आहे की प्रत्येक व्यक्ती हा स्वत:च्या अधिकारासाठी हिंसेचा मार्ग स्विकारतो. स्वत:चे अधिकार प्राप्त करतांना आपण आपल्याच व्यक्तिमत्वाचा बळी देत आहोत. ही बाब त्यांच्या जरा सुध्दा लक्षात येत नाही आणि परिणामी आपल्या समोर आहे तो म्हणजे भारत अक्षरश: धुमसतोय. रोज नवनवीन हिंसाचार, जातीच्या धर्माच्या, संप्रदायाच्या नावाखाली सुरुच आहे. भारतीय संस्कृतीशी ही बाब जुळणारी नाही. भारतीय संस्कृतीत आपले कर्तव्य करण्याचा अधिकार हा श्रेष्ठ अधिकार आहे. आज मानवाधिकाराची संकल्पना आपण मान्य केली. पण मानवाधिकाराचा आशय मात्र व्यक्ती पर्यंत पोहोचला नाही. ह्या मानवाधिकाराच्या ऐवजी मानव कर्तव्याधिकार हा शब्दप्रयोग आपणास वापरायला पाहिजे. बालकांचा अधिकार कोणता? आईचे कर्तव्य हा बालकाचा अधिकार आहे. स्त्रीचा अधिकार कोणता, पुरुषांनी स्त्रीयांच्या प्रति, इतर घटकांनी स्त्रीयांच्या प्रति केलेली कर्तव्य म्हणजे Rights of Woman आणि म्हणून केवळ मानवाधिकार ही संकल्पना ठेवण्यापेक्षा मानवाला कर्तव्याधिकार हा शब्दप्रयोग आता रुढ किंवा मानवाचा उत्तरदायित्व अधिकार (Right to accountibility) हा शब्द प्रयोग रुढ होऊन त्यानुसार योजना बनविणे ही आता काळाची गरज आहे. हे भारतीय संस्कृतीचे नुतनीकरण असेल.

भारतीय संस्कृतीने अनेक मूल्य प्रदान केली. अनेक तत्व प्रदान केली ह्या सर्वांचा युगानुकुल आशय हा पुन्हा शोधावा लागेल. युगानुकुल संस्कृतीचा आशय शोधावा लागेल. आजही जागतिक स्तरावर भारतीय संस्कृतीचा आदर करण्यात येतो. प्रत्येक पिढी आपल्या संस्कृतीची मशाल आपल्या पुढच्या पिढीला आपल्या मुलाबाळांना देत असते. ह्या मशालीचे जतन करुन रक्षण करुन संवर्धन करुन तिला आणखी तेजस्वी करुन काळजीपूर्वक आपल्या पुढच्या पिढीला सूपूर्द करायला हवे.

**उदात्त ध्येय जर व्यक्तीसमोर असेल तर व्यक्तिला त्याच्या क्षमतांचा शोध लागतो.**

## मनाला उच्च आदर्शाचे ध्येय देणे आवश्यक आहे.

प्रस्तुत विचार मांडत असतांना गुरुदेवासमोर व्यक्तिमत्वाच्या विकासाचा सिध्दांत होतो. अर्थात व्यक्तिमत्व विकासाच्या ह्या कल्पनेत प्रत्येक व्यक्तिशी आपण कसे असावे ह्याबाबत एक धारण असते ती धारणा केवळ विचारांच्या स्तरावर असते. बौध्दिक पातळीवर जरी ह्याचे आकलन झाले तरी शारीरिक व मानसिक पातळीवर व्यक्तीचे वर्तन हे परस्पर विरोधी ठरते व त्याच्या व्यक्तिमत्वास एक प्रकारचा आंतर विरोध निर्माण होतो व जे ध्येय व्यक्तिंनी आपल्या डोळ्यासमोर ठेवले आहे हे ध्येय पूर्ण करण्याकरिता भोगुणसमुचय आवश्यक आहे. त्याचा शोधही त्याला लागायला लागतो. पण मुळातच हे ध्येय काय आहे ही बाब महत्वाची ठरते. आज परिस्थिती नेमकी ह्याच्या उलट आहे. आज बालकांसमोर नेमके आदर्श नाही व जे आदर्श आहे ते व्यावसायिक अर्थात डॉक्टर व्हायचे आहे, इंजिनियर व्हायचे आहे इ. हे ही ध्येय क्वचितच त्याचे स्वत:चे असते हे ध्येय पालक किंवा इतरांनी त्याच्यासमोर ठेवलेली असतात. ध्येय पूर्ण करण्याकरिता केवळ त्याची शारीरिक स्तरावर व मेंदूच्या स्तरावर आयुष्य भर कसरत चालते. चांगले गुण मिळवून इंजिनिअर किंवा डॉक्टर होणे एवढेच ध्येय त्याच्या समोर राहते पण हे डॉक्टर व इंजिनिअरला कोणत्या गुणांची आवश्यकता आहे हा गुण निर्णय मूल्यनिर्णय तो करु शकत नाही व ह्याचा परिणाम म्हणजे त्याला त्यांचा गुणाचा मग शोधच लागत नाही. त्याच्या नेमक्या क्षमता कोणत्या ह्याचा शोधच लागत नाही. शिवाय या क्षमतांचा मग विकास होणे शिक्षणातून अपेक्षित असते. त्या मानवीय गुणांचा व क्षमतांचा विकास होत नाही. परिणामी आज माणूस शिक्षित होतो पण सुसंस्कृत होत नाही शिवाय त्याच्या सुप्त शक्तीची अभिव्यक्ती होत नाही ह्या सर्व बाबी एकमेकांशी संबंधित आहेत आणि म्हणून उदात्त ध्येय हे व्यक्तिकडे असायला हवे.

## राष्ट्राची प्रगती, राष्ट्राची उन्नती हे मानवाचे ध्येय हवे.

आत्मोन्नतीतून राष्ट्रोन्नती हा क्रम त्यांना मान्य होता. प.पू. गुरुदेव हे प्रखर राष्ट्रभक्त होते. त्यांनी आध्यात्मवाद मांडला पण रानावनात रमणारे अध्यात्म त्यांना मान्य नव्हते. त्यांची आध्यात्माची संकल्पना ही समाजाभिमुख राष्ट्राभिमुख होती आणि त्याकरिताच त्यांनी वेदांत तत्वज्ञानाची ज्ञानगंगा सर्वसामान्यांपर्यंत पोहचविली. राष्ट्र म्हणजे केवळ लोकांचा

समूह होत नाही फार तर त्याला देश म्हणता येईल पण एकाच समान व उदात्त ध्येयाकरिता जेव्हा व्यक्तिचा समूह एकत्र येतो तेव्हा त्याला राष्ट्र म्हणतात व हा एकत्रित आलेला व्यक्तिचा समूह आपल्या ध्येयपूर्तीकरिता अतिशय निष्ठेने काम करतो व अशाच वेळी राष्ट्राची जडण घडण होते. आज आपल्याला समाजात जे दृष्य आढळते ते म्हणजे सर्वजण कार्य करतात आहेत पण ते केवळ स्वत:च्या भौतिक विकासाकरिता ह्या इतरासंबंधीचा विचार फारच क्वचित असतो. आज माणूस आत्मकेंद्री वृत्तीने विघटीत जीवन जगतो आहे. अशा परिस्थितीत आपण राष्ट्राच्या जडणघडणीचा विचार करुच शकत नाही. कोणतीही विशिष्ट योजना ही राष्ट्राची निर्मिती करु शकत नाही. आज अनेक योजना येतात जातात पण त्यातून राष्ट्र निर्मिती होत नाही. कारण ह्या सर्व योजना सापेक्ष असतात. पण राष्ट्राची जडण घडण तेव्हाच होते जेव्हा मानवी व्यक्तिमत्वाची जडणघडण होते. आज मानवी व्यक्तिमत्वाची जडणघडण शिक्षणाच्या माध्यमातून समग्र होत नाही. त्यातील काही घटक हे दुर्लक्षितच राहतात. ह्यामुळे भांडणे, कलह ह्या बाबी समाजात नित्यनेमाने सुरु राहतात. आज भारतात भौतिक समृध्दता निर्माण झाली आहे, असे वर वर आपणास वाटते पण वास्तविक ही भौतिक समृध्दी विवेकाने उपभोगण्यासाठी ज्या चारित्र्याची गरज आहे तसे चारित्र्य व्यक्तिचे होतांना आपणास आढळत नाही. परिणामी मानवाने प्राप्त केलेले ज्ञान ह्याचा वापर तो विघातक कार्यासाठी जास्त करतो सेवा त्याग आणि चारित्र्य ह्याने राष्ट्राची घडण होते पण हे मूल्य आज दुर्मिळ होत चालले आहे आणि म्हणून व्यक्तिगत उन्नती ही खऱ्या अर्थाने राष्ट्रीय उन्नती आहे. ही भावना प्रत्येकाच्या मनात दृढ होणे आज गरजेचे आहे. अन्यथा १५० वर्ष परकीयांनी आपल्यावर राज्य केले ही बाह्य गुलामगीरी असेल पण आजही जर आपल्याला जाग आली नाही तर राष्ट्र पुन्हा मानसिक गुलामगीरीच्या गर्तेत जाईल पण ही गुलामगीरी अत्यंत भयावह असेल व ही गुलामगीरी मानवाने स्वत: स्विकारल्यामुळे त्यातून त्याला सुटकाही मिळणार नाही आणि म्हणूनच राष्ट्राची प्रगती, उन्नती हेच मानवाचे ध्येय असावे हा विचार अत्यंत महत्वाचा ठरतो.

## शिक्षणाचे ध्येय Man of Achievement निर्माण करणे हा असावा.

शिक्षणाच्या जीवनाच्या ध्येयाबाबत गुरुदेवांनी आलपे सवतंत्र विवेचन दिले आहे. ह्यात कार्यकर्ता कसा असावा ही बाब त्यांनी अतिशय उत्कृष्टपणे सांगितली आहे. आज

आपण समाजात कार्य करणारे तीन प्रकारचे लोक पाहतो.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | स्वत:करिता | - | पैसे कमविण्यासाठी | - श्रमिक |
| २) | समाजाकरिता | - | समाधानासाठी | - कार्यकर्ता |
| ३) | विश्वाकरिता | - | कल्याणाचा दृष्टिकोन ठेऊन | |

स्वत: करिता काम करणारी व्यक्ती केवळ स्वत:च्या सुखाकरिता व पैसा कमविण्याकरिता कार्य करते. ह्या कामात कोणत्याही प्रकारची समाजकल्याणाची भावना नसते. केवळ भौतिक सुखाकरिता व्यक्ती कार्य करतो. मग ह्यात इतरांना दु:ख प्राप्त झाले तरी तो आपल्या केवळ सुखासाठी कार्य करतो. आज समाजात अशीच वृत्ती जास्त आढळते. पण फार थोडे लोक असतात जे आपली मानसिक उत्क्रांती करुन घेतात व आपल्या कार्याची दिशा ही समाज कल्याणाकडे वळवितात. अशा लोकांची संख्या जेव्हा समाजात वाढते तेव्हा राष्ट्राचे कल्याण तर होतेच पण त्याच सोबत विश्व कल्याणाची भावनाही वाढते आणि म्हणूनच शिक्षणातून Man of Achievement निर्माण व्हायला हवा.

- **मानवात शारीरिक, मानसिक, बौद्धिक व अध्यात्मिक असे चार प्रकारचे व्यक्तित्व असतात.**
- **चारही व्यक्तीत्वाचा एकात्मिक विकासानंतर मानवाचा व्यक्तिमत्व विकास घडून येतो.**
- **व्यक्तिमत्व हे कर्मप्रधान, बुद्धिप्रधान व भावनाप्रधान असते.**
- **व्यक्तीच्या मन आणि बुद्धीमध्ये ताळमेळ नसल्यामुळे व्यक्तिमत्त्व लंगडे पडते.**
- **व्यक्तीमत्त्व पांगळे बनल्याने जीवनातील आव्हाने माणूस पेलू शकत नाही.**
- **ज्याने आपल्या मन बुद्धिला योग्य शिक्षण देऊन त्यांच्यात सुसंवाद निर्माण केला आहे तोच परिपूर्ण मानव होय.**
- **शिक्षणातून मन व बुद्धी असा समतोल विकास अपेक्षित आहे पण तो आज होतांना आढळत नाही.**

- आयुष्यातील द्वंद्व पेलण्याची क्षमता शिक्षणातून व्यक्तिमध्ये निर्माण व्हायला हवी.
- मन आणि बुद्धीचा समतोल विकास झाल्यास मानवी जीवनात सुसंवाद निर्माण होतो.
- आज मन आणि बुद्धी दुर्लक्षित राहिल्यामुळे मानवाचा आंतरिक विकास दुर्लक्षित आहे.
- मन-बुद्धीची गुणवत्ता आणि पोत ह्यावरच व्यक्तीमत्त्वाची गुणवत्ता निध ार्रित होते.
- मनाचे संस्करण आणि बुद्धीचे प्रबोधन करूनच व्यक्तीचा व्यक्तीमत्वात उन्नती घडवून आणता येते.
- आज मन आणि बुद्धी केवळ दुर्लक्षित नाही तर त्याची फारकत झालेली आपणास आढळते.
- बाह्य अव्हानांना स्वीकारून व त्याच्याशी सामाना करून व्यक्तीमत्त्वात समतोल राखता येईल.
- शारीरिक दृष्टया आरोग्य संपन्न, मनाने आनंदी, बुद्धीने तिक्ष्ण, आत्मिक दृष्टया स्थीर असा समाज शिक्षणातून निर्माण व्हायला हवा.
- अंतर्बाह्य मनावर स्वामित्व मिळविणे हे मानवाचे ध्येय आहे.

## जीवनात अनेक प्रकारची द्वंद्व असतात.

सुखदु:ख चांगले वाईट इ. पण ह्या प्रत्येक स्थितीमध्ये स्वत:च्या मनाच्या संयम राखण्याची कला त्या व्यक्तिला जमायला हवी. पण आज मानवाला ही बाब साधत नाही असे प्रशिक्षणच ह्याला मिळतांना आढळत नाही. त्याचा परिणाम म्हणून ताणतणावाचे प्रमाण वाढत आहे. प्रत्येक व्यक्ती हा मानसिक स्तरावर अत्यंत अस्वस्थ आहे. वास्तविक जीवनाच्या ह्या अनिश्चिततेचे भान विद्यार्थ्याला असायला हवे. मुळातच मानवी जीवन हे अनिश्चित आहे. कोणताच प्रसंग हा आयुष्यात केव्हाही उद्‌भवू शकतो पण आज सहनशीलता व संयम ह्या

बाबीचे प्रशिक्षण विद्यार्थ्याला खऱ्या अर्थाते मिळत नाही आणि परिणामी जीवनातील द्वंद्व पेलतांना तो कमी पडतो. अतिशय आनंदाच्या क्षणी त्याला आनंदवेग आवरत नाही तर दु:खाच्या क्षणी दु:खावेग आवरत नाही. परिणामी दोन्हीही परिस्थितीत त्याची मानसिकता बदलते व त्याचा परिणाम त्याच्या वर्तनावर होतो. त्याच्या विचारावर होतो आणि म्हणूनच जीवनातील कोणत्याही परिस्थितीत मनाचा समतोल हा राखता आला पाहिजे व ह्यासाठी मानसिक उन्नयन महत्वाचे ठरते. जेव्हा आयुष्यात काही प्रसंग घडतो तो प्रसंग माझ्या जीवनाशी प्रत्यक्ष संबंधित असेल तर माझे मन ह्या प्रसंगाशी तादात्म्य पावते व त्यात आपल्या अहंकाराचे प्रतिबिंब पडते. पण इतरांच्या जीवनात तीच घटना घडली तर त्याचा विशेष प्रभाव माझ्या जीवनावर होत नाही. ह्याचे कारण इतरांच्या जीवनातील प्रसंग मी माझ्या तटस्थतेने पाहू शकते. तेवढ्या तटस्थतेने मी माझ्या जीवनातील घटनांकडे पाहू शकत नाही. कारण त्याच्याशी माझ्या मनाचे तादात्म्य असते आणि माझ्या अहंकाराचेही आणि नेमके आजची शिक्षण प्रणाली येथेच कमी पडते. आजच्या शिक्षणातून बालकाचे मन समर्थ बनत नाही. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी त्याचा अहंकार जोपासला जातो. हा अहंकार त्याच्या स्तरावर तो तर जोपासतोच पण कौटुंबिक स्तरावरही तो जोपासला जातो. लहानपणापासून बालकाला नकार ऐकण्याची आजकाल सवयच राहिली नाही. परिणामी ते नंतरही आपल्या आयुष्यात नकार पचवू शकत नाही. अर्थात आपला अहंकार ते विसरु शकत नाही. आपल्या अहंकाराचे उदात्तीकरणही तो करु शकत नाही. परिणामी त्याच्या मनाचा विकास तर होत नाहीच पण त्याचसोबत त्याच्या बुध्दीचाही विकास होत नाही. ही बाब म्हणजे आजच्या शिक्षणातील दोष आहे. आज मानवाचे व्यक्तिमत्व म्हणूनच लंगडे पडते आहे. कारण त्याचे मन आणि बुध्दी हे दोन्ही पाय पांगळे आहे. कारण आजचे शिक्षण Brain Oriented आहे.

## सतत व प्रामाणिक आत्मप्रयत्नाशिवाय आत्मोन्नती व आंतरिक विकास शक्य नाही.

आजचे युग हे जलद युग आहे. आजच्या ह्या जलद युगात माणसाला प्रत्येक गोष्ट अगदी तातडीने हवी असते. कमी प्रयत्नात जास्त यश माणूस अपेक्षित करतो. पण त्याने माणसाचा आत्मिक विकास होत नाही. त्याचा विकास हा अत्यंत वरवरचा होतो. आत्मिक

विकास हा क्रमबध्द विकास आहे नव्हे ती विकासाची परिसिमा आहे व प्रत्येक स्तरातून अधिकाधिक सूक्ष्म जेव्हा व्यक्ती होतो तेव्हाच त्याचा आत्मिक विकास होतो. हा आत्मिक विकास, शारीरिक, मानसिक व बौध्दिक विकास अशा मर्गाने जातो आणि ही प्रक्रिया जलद होणारी नाही. केवळ बाह्य शिक्षणातून किंवा बाह्य संस्कारातून ही बाब घडत नाही तर ह्यासाठी ते अंतर्मनावर शिक्षण संस्कार व्हायला हवे व त्याचे बौध्दिक स्तरावर स्थिरीकरण व्हायला हवे व त्यानंतरच याचे रुपांतर आत्मपरिवर्तनात होते. पण ही प्रक्रिया दीर्घकालीन आहे. शिवाय ह्यात सातत्य हवे जो विकास मानवाचा होतो आहे त्याच्या पलीकडे जाण्याचे सामर्थ्य व्यक्तित हवे. अर्थात जर हे सातत्य असेल तरच हा आत्मविकास शक्य आहे. पण ह्या बाबीस आज विशेष प्राधान्य नाही. ह्याचे कारण आज आत्मिक प्रगतीला महत्व मानवाला वाटेनासे झाले. त्याला जीवनात शांतता प्रेम सर्व आहे पण त्यासाठी प्रयत्न करण्याची त्याची तयारी नाही. इच्छाही नाही केवळ खा प्या मजा करा, अशी आजची संस्कृती बनली आहे आणि परिणामी आंतरिक विकासाचे महत्व आपणास वाटायला लागते. आज माणूस खूप खुजा झाला आहे. त्याचा बाह्य विकास खूप झाला पण आंतरिक विकासाच्या बाबतीत मात्र तो खुजाच आहे. ह्यासाठी त्याचा आत्मविकास महत्वाचा ठरतो व ह्यासाठी प्रामाणिक व सातत्यपूर्ण प्रयत्नही महत्वाचे ठरतात. प्रामाणिक प्रयत्न अर्थात ह्या विकासाच्या प्रयत्नात कोणतीही तडजोड नको.

- वर्तमान, भूत व भविष्य ह्या तिनही काळाबाबत विचार हे व्यक्तीमत्त्वाचे नाशाचे तीन स्त्रोत आहेत.
- व्यक्तिमत्वाचा नाश रोखण्यासाठी पुढील तीन उपाय आहेत.
  अ) इंद्रियाची द्वारे संयमीत करणे.
  ब) मनाला हृदयाच्या ठिकाणी स्थिर करणे.
  क) निरंतर मनाच्या एकाग्रतेचा अभ्यास करणे.
  ड) ओम् ह्या अक्षराचे उच्चारण करणे.
- व्यक्तीमत्त्वाचे आंतरिक घटक हे प्रत्येक व्यक्तीमध्ये समान असतात.
- व्यक्तीमत्त्व संकल्पनेत सत्व, रजो व तम गुणांचा विचार हा प्राधान्याने करण्यात येतो.
- मानवांचे आंतरिक व्यक्तीमत्त्व महत्त्वाचे आहे.

- मानव आपल्या आंतरिक जगतानुसार आपले बाह्य जग जगतो.
- मानवाचे चारित्र्य व त्यांचे व्यक्तीमत्त्व हे त्यांच्या बाह्य जगताचे अनुभव निश्चित करित असतात.
- आंतर व्यक्तीमत्त्वाच्या पुनर्समायोजना शिवाय बाह्य जगाचा विकास होऊ शकत नाही.

आजच्या ह्या जलद युगात व्यक्ती वर्तमान काळात तर जगतो आहे पण तो विचार करतो आहे भविष्याचा व भविष्याच्या अति विचार करण्याच्या नादात तो आपला वर्तमान काळ खराब करतो आहे. वास्तविक भूतकाळाबाबतचा पश्चाताप, वर्तमानाबाबत axiety व भविष्याची चिंता ह्या तीनही बाबीमध्ये मानवाच्या मनाची शक्ती वाया जात असते. आज प्रत्येक व्यक्ती अशाच प्रकारे शक्तीहीन होतो आहे. शिक्षणातून किमान ह्या शक्तीचा संचय करण्याची पात्रता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हायला हवी. ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे जेवढा मानवी शक्तीचा संचय होईल तेवढा तो विधायक कार्याकडे आपणास लावता येईल. अन्यथा ह्या तीनही काळाच्या विचारात मानव आपली शक्ती वाया घालविते आहे. शिवाय आज आपण पाहतो की मानव हा अति भोगासक्त झाला आहे. त्याची इंद्रिये अक्षरश: स्वैर सुटली आहेत. त्यामुळे आज समाजात अनाचार बोकाळला आहे. व्यसनाधिनता बलात्कारासारखे गुन्हे आज अगदी सरसकट घडतांना आपणास आढळतात. त्यामुळे इंद्रियाच्या द्वारे मन जे स्वैरपणे बाहेर भटकते आहे त्याला संयम करण्याचा प्रयत्न करायला हवे. शिवाय आज व्यक्तिवर भावनांचा पगडा जास्त आहे. प्रत्येक निर्णय तो भावनेच्या आधीन जाऊन घेतो. त्यामुळे तो जास्तीत जास्त विकारी होतो आहे. भावनावेग वाढतो आहे. त्यामुळे ब्लड प्रेशर, डिप्रेशन ह्यासारखे ताणतणावाशी निगडीत असणारे विकार त्याला होत आहेत. ह्यासाठी मनाला हृदयाच्या ठिकाणी स्थीर करण्याचे प्रशिक्षण शिक्षणातून मिळायला हवे मनाची चंचलता त्याची वाढते आहे. उच्च ध्येयावर त्याचे लक्ष स्थिर राहू शकत नाही. वास्तविक पाहता प्रत्येक व्यक्तिमध्ये व्यक्तिमत्वाचे सर्व घटक असतात. पण त्यांची अभिव्यक्ती वेगवेगळी असते. ह्यातील सर्वात बदलणारा घटक म्हणजे मन होय. ह्या मनाचे संस्करण योग्य व्हायला हवे. शिवाय व्यक्तिमत्वात जो घटक प्रबळ आहे त्यानुसार त्याला शिक्षण मिळत नाही कारण काय शिकावे हे विद्यार्थी त्याच्या व्यक्तिमत्वाला साजेशे ठरेल. ह्याबाबत तो निर्णय घेत नाही

तर त्याच्यावर शिक्षणातील विषय लादले जातात. पण त्यातून त्याच्या आंतरिक व्यक्तिमत्वाचा विकास दुर्लक्षित राहतो. ह्याचा विचार आजच्या शिक्षण प्रणालीत होतांना आढळत नाही. शिवाय व्यक्तिमत्व संकल्पनेत तीन गुणांचा विचार होणे व त्यानुसार व्यक्तिमत्व विकसन योजनेचा आराखडा तयार असायला हवा. प्रत्येक व्यक्तित सत्व, रज आणि तम गुणांचे वास्तव्य असते. ज्या गुणांचे आधिक्य असते त्यानुसार त्याच्या स्वभावाची रचना होत असते व व्यक्तिमत्व विकसनासाठी गुणसंवर्धनासाठीची योजना आजच्या शिक्षण प्रणालीत नाही त्यामुळे तमोगुणी माणूस आज अधिक तमोगुणी होत आहे. उन्नतीचा मार्ग व्यक्तिमत्वाच्या ह्या आंतरिक घटकानुसार आजच्या शिक्षण प्रणालीत नाही. ही योजना असण्याची गरज आज आहे. ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे मानवाचे गुण हे त्याचे आंतरिक व्यक्तिमत्व आहे. मानवाचे मन बुध्दी हे मानवाचे आंतरिक व्यक्तिमत्व आहे व हे आंतरिक व्यक्तिमत्व जसे आहे तसे त्याचे बाह्य प्रगटीकरण असते. मानवाचे मन हा त्याचा महत्वाचा आंतरिक घटक आहे. मन म्हणजेच विचाराचा प्रवाह अशी जर मनाची व्याख्या केली तर निश्चितपणे ह्या विचारानुसार मानवाच्या मनाची गुणवत्ता निर्धारीत होते व ह्या विचारांची शुध्दता ही शिक्षणातून व्हायला हवी. Beautification of thought ही बाब महत्वाची आहे पण आज अशा सुंदर मनाची निर्मिती होतांना आपल्याला आढळत नाही. ह्याचा शिक्षणाने गांभीर्याने विचार करायला हवा. कारण मानवाच्या विचारानुसार त्याचे आचरण ठरते, त्याचे व्यक्तिमत्व ठरते व चारित्र्यही ठरते. शिवाय बऱ्याचदा आपणास व्यक्ती अशा तक्रारी करतांना दिसतात की ह्या जगात सर्वत्र कुरुपता आहे पण ही बाब त्याच्या चारित्र्यावर अवलंबून असते. मानवाचे मन हे बाह्य दाखविणारे निर्मळ आरसा आहे व आरसा जेवढा निर्मळ असेल तेवढे बाह्य जगताचे प्रतिबिंब त्यात अतिशय स्वच्छ व निर्मळ पडते आणि म्हणूनच अंतर्गत व्यक्तिमत्वाचे पुनर्समायोजन महत्वाचे ठरते. व्यक्तिमत्वाचे पुनर्वसन आवश्यक ठरते. ह्यासाठी व्यक्तीला मनबुध्दी ह्याचे व्यक्तिमत्व विकासात नेमके काय स्थान आहे हे त्याला कळायला हवे.

## अंतर्गत सौंदर्य वाढविल्याशिवाय Quality of Life सुधारणार नाही.

आज सर्वत्र Quality वर भर आहे. त्यामानाने Quality चा विचार होतांना आपल्याला आढळत नाही आणि त्यामुळे आपण Standard of Living चा विचार सर्वत्र

होतांना आढळतो पण Standard of Life मात्र दुर्लक्षित होते आहे. Quantity जपतांना व्यक्ती Quality चा विचार करीत नाही. परिणामी जीवनाचा दर्जा ढासळतो आहे.

## सकारात्मक सद्‌गुणांचे हृदय व सृजनशील बौध्दिक मूल्य असल्याशिवय मानव समाज समृध्द बनणार नाही.

सद्‌गुणांची अभिव्यक्ती हा मानसिक आनंद नसतो तर सृजनशीलता हा बौध्दिक आनंद असतो व हे सद्‌गुण सकारात्मक हवे. आज दिवसेंदिवस नकारात्मक विचार जास्त करण्यात येतो व Lifting Shifting ह्या वृत्तीमुळे कोठेतरी बौध्दिक सृजनशीलतेला कोठेतरी आळा बसतो आहे. आजचा काळ हा Remix चा काळ आहे. पण मानवी समाज हा समृध्द व्हायचा असेल तर त्या समाजात सकारात्मक विचार करणाऱ्या व्यक्ती असाव्या व सृजनताही त्यांची नैसर्गिक उर्मी बनावी.

## केवळ भौतिक समृध्दी हे जीवनाचे ध्येय नाही.

भौतिक समृध्दी हे यशाचे मोजमाप नाही. आज व्यक्तिच्या यशाचे मोजमाप हे भौतिकतेत मोजले जाते. ज्याच्या जवळ अधिक संपत्ती तो यश्स्वी समजला जातो. पण अशा प्रकारे यशस्वी व सफल असणारे जीवन हे सार्थक असेलच असे नाही. ह्याच कारण हे सखोल आयुष्य असेलच असे नाही. भौतिक समृध्दीने आयुष्य सुखी झाले असते तर आज प्रत्येक लखोपती अथवा करोडपती माणूस सर्वात सुखी झाला असता पण आज आपणास तसे आढळत नाही. उलट जेवढी संपत्ती जास्त तेवढा माणूस आज दुखाच्या गर्तेत गेलेला आपणास आढळतो. ह्यासाठी समृध्दीची परिभाषा आपणास पुनश्च तपासून पहावी लागेल. आमच्या संतांच्या परंपरेत आध्यात्मिक समृध्दी महत्वाची मानली आहे आणि म्हणूनच तुकडोजी महाराजांनी सुध्दा -

''पहारे आणि तिजोऱ्या, त्यातून होती चोऱ्या
दारास नाही दोऱ्या, ह्या झोपडीत माझ्या ।

असे विधान केले आहे. पण आज ही भौतिक समृध्दी प्राप्त करण्यासाठी मानव अक्षरश: कोणत्याही मार्गाचा अवलंब करतो आहे. त्यामुळे भ्रष्टाचारासारख्या समस्या आज

प्रकर्षाने डोळे वर काढत आहे. पण हा विवेक आवश्यक आहे की, भौतिक समृध्दी हे आपल्या ध्येयापर्यंत जाण्याचे साधन आहे ते साध्य नाही. साधन साध्य विवेक हा महत्वाचा आहे.

## स्वत:ला जाणून घेणे हे जीवनाचे ध्येय आहे.

आज आपण सर्व बाह्य जगाचा परिचय करुन घेतो. सर्वाशी वर्तन करण्याची आपली एक पध्दती ठरली असते. पण आपण आपल्या स्वत:च्या परिचयाशी कधीच उत्सुक नसतो. आपले खरे स्वरुप काय आहे हे जाणूस घेण्यास आपण उत्सुक नसतो. परिणामी बाहेरील जगात अत्यंत भेदाभेद वाढतो आहे. कारण आपण आपला विचार केवळ शारीरिक पातळीवर करतो आणि ह्या शारीरिक स्वरुपाशी आपल्या अस्तित्वाच्या सर्व संकल्पना निगडीत असतात व त्या आनुषंगिक येणारी द्वंद्व ही असतात. पण आपले स्वरुप हे केवळ बाह्य स्वरुपाशी निगडीत नाही ह्याची अनुभूती मानवाला आली तर आपल्यात व बाह्य सृष्टीत त्याला चैतन्याच्या स्तरावर भेद आढळणार नाही व सहअस्तित्वाची भावना निर्माण होईल. पण आज शिक्षणाचा एवढा सखोल विचार आपणास आढळत नाही. स्वत:चा परिचय करुन घेण्याची योजना आजच्या शिक्षण प्रणालीत नाहीत.

- **जीवनाचे ध्येय हे परिपूर्ण सुख असलेच पाहिजे की जेथे सर्व संघर्ष संपुष्टात येऊन शांतता प्रस्थापित होते.**
- **जीवनात आनंद प्राप्त करण्यासाठी स्वसमायोजन आवश्यक आहे.**
- **बाह्य विषयवस्तुवर अवलंबून न राहता पूर्ण समाधान व आनंदाची प्राप्ती करून घेणे हे जीवनाचे ध्येय आहे.**

कोणत्याही व्यक्तिचे जीवन ध्येय दु:ख प्राप्ती असूच शकत नाही. प्रत्येक जण जीवन जगतो आहे तो सुखाच्या प्राप्तीसाठी आज माणूस अक्षरश: सुखाच्या मागे धावतो आहे ह्या धावण्यात तो अनेक बाबी आपल्या पायदळी तुडवतो आहे व अनेक बाबी मागेही टाकतो आहे. पण ह्यचे त्याला भान नाही. आज सर्व सुखे मानवाने प्राप्त केली पण त्यापासून त्याला शांतता प्राप्त झाली का ? ही सर्व सुखे त्यांनी प्रयत्नाने मिळविली की संघर्षातून हा पुन्हा विचाराचा मुद्दा बनतो. शांततामय जीवन जगणे हा मानवाचा अधिकार आहे. शांतता, आनंद

ही मनाची अवस्था आहे. मानवाला प्रत्येक स्तरावर प्राप्त होणारे समाधान त्याला शांतीची अवस्था प्राप्त करुन देतो. दु:खरहित मानसिक स्थिती विक्षेप रहित मानसिक स्थिती म्हणजे शांती. अशा शांतीची परिभाषा गुरुदेवांनी केली पण आज आपण पाहतो वैषेयिक मूल्यांना कवटाळणे हेच मानवाने आज आपले जीवन ध्येय ठरविले आहे. परिणामी वैषेयिक वस्तुची वासना त्याच्या मनात खळबळ निर्माण करते व त्याच्या मनातील शांती भंग करतो व व्यक्तीचे अंतर्मन अशांत बनल्यामुळे निश्चितपणे त्याचे बाह्य वर्तन हे असंबध्द व हिंसक बनते आणि म्हणूनच आज आपण पाहतो की, अतिरेकी हव्यासापायी आज जागतिक स्तरावर सर्वत्र अशांती माजली आहे आणि म्हणूनच शांतता प्राप्त करणे व संघर्ष मिटविणे ह्या जीवन ध्येयाला महत्व प्राप्त झाले आहे. पण ह्यासाठी प्रत्येक व्यक्तिचे व्यक्तिमत्वाचे पुनर्समायोजन व्हायला हवे. आज आपणास असमायाजीत व्यक्तिमत्वाची असंख्य व्यक्ती समाजात आढळतात. परिणामी समाजस्वाथ्य आज धोक्यात आले. आत्मघातकी वृत्ती समाजात डोके वर काढत आहेत. पण ह्यावर आज कुणालाही उपाय सापडत नाही. केवळ प्रतिबंधक कायदे करुन समाजातील कोणतीही समस्या सुटणार नाही तर त्यासाठी मुळावरच आघात करावा लागेल व तो म्हणजे व्यक्तिमत्वाचे पुनर्वसन, पुनर्सयामोजन. व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीवरच आज प्राधान्य देणे हे आवश्यक आहे. आज प्रत्येक जण अशांत आहे. दु:खी आहे. ही अशांती व दु:ख मानसिकतेत आहे आणि म्हणून मनावर संस्कार होणे हे अत्यंत आवश्यक आहे. पण ही अत्यंत व्यक्तिगत बाब ठरते. स्वत:ला आनंद व शांती प्राप्त करुन घेणे हा अत्यंत महत्वाचा प्रश्न ठरतो. व्यक्ती ही आनंद आणि शांती करताच जीवन जगते. आनंद व शांती ही वास्तविक पाहता मानवाचे मूळ स्वरुप आहे व मूळ स्वरुपाकडेच जाण्याची त्यची मूळ वृत्ती असते. पण ह्या मूळ वृत्तीपासून तो ढळतो व मग त्याच्या जीवनात दु:ख व अशांती निर्माण होते. ही अशांती व दु:ख दूर करण्यासाठी त्याला आपल्या मूळ स्वरुपाचा शोध घ्यावा लागेल. मुळ स्वरुपाची प्राप्ती हेच जीवन ध्येय हवे पण आज मानव आपल्या जीवन ध्येयापासून ढळला आहे व इतर बाह्य गोष्टी प्राप्त करणे हे त्याचे जीवन ध्येय ठरते. हे जीवन ध्येय प्राप्त करतांना त्याला अनेक अशा मार्गाचा अवलंब करावा लागतो जे मार्ग त्याच्या मनात विक्षेप निर्माण करतात. भौतिक सुखाचा उच्चांक प्राप्त करणे ह्या ध्येयप्राप्तीसाठी मग तो अनेक वाममार्गाचा अवलंब करतो ह्याची बऱ्याचदा सुरुवात ही कुटुंबापासूनच होते. ह्याचा परिणाम म्हणजे त्याचे आयुष्य

सातत्याने संघर्षमय होते व तो शांती व आनंद गमावून बसतो. आज सर्वत्र हीच परिस्थिती आहे. सुखप्राप्ती ही संकल्पना आज केवळ शरीरसुखापुरतीच मर्यादित झाली आहे. पब मधील एखाद्या रेव्ह पार्टीमध्ये १८ ते २५ वर्ष वयाचे तरुण अंमली पदार्थाचे सेवन करतांना आपल्याला आढळतात. त्या सेवनातून आनंद प्राप्त करतात. मद्यधुंद अवस्थेत मुले व मद्यधुंद अवस्थेत कमी व तोकड्या कपड्यातील मुली आपआपले चेहरे लपवीत मग आपल्या पालकांसमोर येतात. ही जीवनाची सार्थकता नाही. ह्या मार्गाने आज संपूर्ण पिढी वाया जाते आहे आणि ह्याचसाठी प.पू. गुरुदेवांचा हा विचार अत्यंत महत्वाचा ठरतो. कारण मानवाचे सुखही अंतरंगाची स्थिती आहे ती बाह्य वस्तुत सापडणार नाही.

- शिक्षण ही शिष्यांची आत्मज्योत आहे. जी शिक्षक जोपासतात.
- पुढील जीवन ध्येय ही मानवाच्या उन्नतीसाठी आवश्यक आहेत.

1) To realised pure awareness
2) To rediscovery of self
3) To gain peace and Joy
4) Detachment from body mind and intellect.
5) Detachment from low values
6) Detachment from ownership.
7) Self control
8) Self critisim
9) Self development
10) Self less work
11) Self realigetion
12) Self Education
13) Self effort
14) Self Improvement

15) Self perfection

16) Self recognition

17) Rehabilitation of personality

19) Re-management of personality.

ज्या जीवनमूल्यांचा उच्चार गुरुदेवांनी ह्या मुद्यात मांडला आहे त्या जीवनमूल्यांची पायमल्ली आपणास आज होतांना जाणवते. सर्वात महत्वाचे म्हणजे मानवाशी स्वची संकल्पना बदलत्या आहे. मानवाचा "स्व" हा अत्यंत संकुचित झाला आहे. शिवाय ह्या भौतिक संस्कृतीत "स्व" म्हणजे मी माझे कुटुंब एवढीच संकल्पना बाकी आहे. त्या पलीकडे मानवाच्या 'स्व' चा विस्तार होत नाही. परिणामी त्याचे इतर घटकाशी अर्थात समाज राष्ट्र विश्व ह्यांच्याशी तादात्म्य होत नाही. पण ह्या स्वचा विस्तार जसजसा वाढतो तसतसे त्याचे बाह्य विश्वाशी तादात्म्य वाढते व त्याचा दृष्टिकोन विस्तारतो ह्या सर्व दृष्टिकोनातून प्रस्तुत शिक्षण ध्येय उपयुक्त ठरतात. पण ह्या शिक्षण ध्येयांचा विचार मात्र शिक्षणात होतांना आपल्याला आढळत नाही तर केवळ संपादन करणे व खर्च करणे ह्याकरिता आज संपूर्ण वेळ मानवाचा खर्च होतो आहे नव्हे हेच मानवाचे जीवन ध्येय झाले आहे.

## आध्यात्मिक सामर्थ्य वृध्दी हे भौतिक आव्हानांना एकमेव उत्तर आहे.

आज २१ व्या शतकात मानवाला जीवनात बऱ्याच आव्हानांना तोंड द्यावे लागते. नव्हे आव्हाने व संघर्ष ह्याचेच नाव जीवन आहे. ही परिभाषा करण्या इतपत भौतिक आव्हानाचे आक्रमण आज झाले आहे. आपला भौतिक विकास व्हावा म्हणून प्रत्येक जण ही आव्हाने पेलतो आहे. त्याला स्विकृती देतो आहे आणि आपल्या जीवनाचा नाश स्वत:च्याच डोळ्याने बघतो आहे. प्राचीन काळी वाल्याचा वाल्मिकी झाला ही वाल्मिकी ऋषिंची आपल्याला कथा विदीत आहे पण आज नेमके ह्याच्या उलट घडते आहे. आज अनेक चांगले गुण हे दुर्गुणापुढे नमतात आहे. ह्यावर महत्वाचे उपाय म्हणजे मानवातील गुणांचे संवर्धन सद्गुणाचे संवर्धन हाच दुर्गुणावर मात करण्याचा उपाय आहे.

## मानवाने मी पणाच्या जोखडातून मुक्तता करुन घ्यायला हवी.

आज संपूर्ण मानव समाज हा संकुचित विचारात जखडला गेला आहे. त्याचे विचार स्वतच्या पलीकडे जात नाही आणि परिणामी त्याने स्वत:ला अगदी जखडून घेतले आहे. त्याच्यापलीकडे त्याला पाहण्याची इच्छा नाही. पण क्रमविकासाच्या सिध्दांतानुसार मानव स्व पासून उत्क्रांत व्हायला हवा व त्याचे समाज, राष्ट्र, विश्व ह्यांच्याशी अनुबंध निर्माण व्हायला हवा आहे. स्वचा परिघ हा वाढायला हवा. तरच खऱ्या अर्थाने सामाजिक राष्ट्रीय व वैश्विक स्तरावर ऐक्यभावना निर्माण होईल.

## जीवनाचा शोध घेतल्यानेच मानवी दु:खे नष्ट होतील.

आज प्रत्येक मानव हा अशांत आहे, दु:खी आहे. पण मानव दु:खी आहे. ह्याचे कारण त्याचे जीवन बाबतचे चुकीचे आकलन. स्व आणि जगताबाबतचे चुकीचे आकलन. प.पू. गुरुदेवांनी आपल्या संपूर्ण लेखनातून जीवनाचा खरा अर्थ मानव समाजा पर्यंत पोहोचलेला आहे. हा अर्थ प्रत्येक व्यक्तिने आपल्या जीवनात शोधायला हवा. अखिल जीवनाशी त्यांचा सहसंबंध जोडायला हवा. तरच त्याला जीवनातील द्वंद्वाचे स्वरुप कळेल व ह्या द्वंद्वातील होण्याचे सामर्थ्यही प्रदान करेल. जीवनाचे योग्य आकलन हेच मानवी जीवन सुखी बनविण्याचा मार्ग आहे.

## प्रत्येक व्यक्तिमध्ये सुप्त क्षमता असतात.

प्रत्येक व्यक्ती ही दिव्यत्वाची अभिव्यक्ती असते. तिच्यात अनेक क्षमता असतात. पण ह्या क्षमतांचा तिला संपूर्ण आयुष्यभर शोध लागत नाही. पण ह्या दिव्यत्वाचा शोध घेणे हे मानवी जीवनाचे खरे ध्येय आहे. ह्या ध्येयासाठी प.पू. गुरुदेवांनी आपले उभे आयुष्य ह्या मानवजातीला समर्पित केले आहे. आपल्या लिखाणाच्या माध्यमातून कार्याच्या माध्यमातून त्यांनी अखिल मानव समाजाला स्वत:च्या दिव्यत्वाची जाणीव करुन दिली व ह्या दिव्यत्वाचा शोध घेण्याचे सामर्थ्य त्यांच्या अंगी यावे म्हणून मार्गदर्शन केले एवढेच नव्हे तर दिव्यत्वाची प्राप्ती करुन घेण्याचा मार्गही दाखविला आहे. परंतु आज बाह्य बाबींना अर्थात बहिरंगाला एवढे महत्व प्राप्त झाले आहे की, मानव आपले अंतरंग अक्षरश: दुर्लक्षित करतो आहे.

आज मानव बहिरंग पूजक बनला आहे आणि म्हणून अखिल मानव जातीचा आध्यात्मिक विकास हा खुंटला आहे. संपूर्ण विश्वाला कवेत घेण्याचे सामर्थ्य मानवाच्या अंगी आहे. पण ह्याची त्याला जाणीव नाही आणि म्हणूनच त्याचा विकासही खुंटला आहे, असे आपल्या लक्षात येते आणि म्हणूनच मानवाला आपल्या सुप्त शक्तीचा शोध लागायला हवा. तरच मानव जातीचे कल्याण होईल.

## मानव म्हणजे चारित्र्य

प.पू. गुरुदेवांनी मानवाची केलेली ही परिभाषा आहे. मानवाचे खरे स्वरुप हे आनंद युक्त आहे. आणि परिणामी ते शांतही आहे. किंबहूना शांत आहे, म्हणूनच ते आनंदी आहे, असेही आपण म्हणू शकतो. चारित्र्य म्हणजे सद्‌गुणांचा समुच्चय. चारित्र्य म्हणजे चांगल्या सवयी पण ह्या चांगल्या सवयी निर्माण होण्याकरिता मानवाचे विचार हे चांगले असावे लागतात व विचार चांगले करण्यासाठी मानवाच्या मनाला प्रशिक्षित करावे लागते. कारण विचार चांगले असतील तर माणसाचे कर्म हे योग्य ठरते. योग्य कर्माची वारंवारिता यामुळे संबंधित परिवर्तन होते व ह्यातून मानवाच्या चारित्र्याची योग्य जडण घडण होते. हा क्रम जर आपण लक्षात घेतला तर मानव म्हणजेच चारित्र्य ही परिभाषेची सत्यता आपणास कळायला लागते आणि म्हणूनच प.पू. गुरुदेवांच्या ह्या विचाराचे महत्व आपणास आधुनिक काळात पडल्याशिवाय रहात नाही. आज आपण पाहतो की, समाजाचे चारित्र्य हे हळूहळू नाश पावत आहेत. प्रत्येकाच्या जीवन जगण्याच्या सवयीवर पाश्चात्यांचे आक्रमण झाले आहे. वास्तविक पाहता पाश्चात्यांच्य जीवन संकल्पना ह्या आपल्याला प्रमाणभूत ठरु शकत नाही. परंतु आज मानव केवळ शारीरिक स्तरावर आपले जीवन जगतो आहे आणि म्हणूनच तो अनेक वाईट सवयींच्या आहारी जातो आहे आणि म्हणूनच मग आपण विधान करतो की, मानवाचे चारित्र्य हे ढासळले आहे. अशावेळी प.पू. गुरुदेवांचे विचार हे अत्यंत मार्गदर्शक ठरतात.

## भविष्यकालीन सुखाची तयारी हे व्यक्तीचे जीवन ध्येय आहे.

प्रस्तुत जीवन ध्येयाचा विचारात भविष्यकालीन सुखाच्या संकल्पनेबाबत आज जे गैरसमज आहेत ते आपल्या लक्षात येतात आंत भविष्याकालीन सुख ह्याचा आज जो अर्थ

घेतला जातो तो म्हणजे भविष्यात आपल्याला आपले Standard of Living जपता येईल एवढी तरतूद आज व्यक्तीने करुन ठेवली की, भविष्यात तो निश्चिततेने जगायला मोकळा होतो. त्यासाठी आज अनेक मार्गही उपलब्ध आहे. ही गुंतवणूक करीत असतांना सर्वसामान्यपणे दोन दृष्टिकोन व्यक्तीचे असतात ते म्हणजे भविष्यात आपण निश्चिततेने जगावे व सर्वात महत्वाचे म्हणजे आज माझ्याजवळ जेवढा पैसा आहे त्यापेक्षा तो दुप्पट कसा होईल ह्या दोन्ही विचारप्रवाहातून तो वर्तमान सुखी बनविण्याचाप्रयत्न करेल. पण भविष्याबाबतची उत्सुकता ही त्याला वर्तमानात सुख लाभू देत नाही आणि मग शेअर बाजार गडगडला की मानवी आयुष्यही गडगडते पण ही भविष्यकालीन सुखाची संकल्पना नाही. जसे आज आपण बॅंकेत जेवढी रक्कम गुंतवितो तेवढीच रक्कम काढण्याचा अर्थात तेवढीच रक्कम उपभोगण्याचा अधिकार आपणास असतो पण एकदा कां ती रक्कम संपली की व्यक्तीची आर्थिक दिवाळखोरीस प्रारंभ होतो. त्याचप्रमाणे मानवाच्या कर्माचे असते. मानव आपल्या वर्तमानकालीन सत्कर्माचे जेवढे शिल्लक ठेवतो त्याला त्याच प्रमाणात भविष्यात त्याचा परतावा प्राप्त होतो. पण ह्याबाबत व्यक्ती तेवढीशी जागृत असत नाही. वर्तमान कर्मचिकित्सा कुणीही करीत नाही आणि त्याचा परिणाम मग त्याला दु:ख, संकटे प्राप्त होतात व तो नैराश्याच्या गर्तेत जाण्याची शक्यता अधिक असते अशा वेळी गुरुदेवांचे हे विचार अत्यंत प्रेरक असे ठरतात.

## अंतर्बाह्य मनावर स्वामित्व मिळविणे हे मानवाचे ध्येय आहे.

सध्य स्थितीत आपणास सर्वत्र असे जाणवते की माणसाची अधिकार गाजविण्याची वृत्ती ही वाढली आहे. अधिकार प्रस्थापित करण्याच्या ह्या विजीगीषु वृत्तीमुळे स्पर्धा संघर्ष ह्या गोष्टीला जागतिक स्तरावर आज महत्व प्राप्त झाले आहे. प्रत्येक जण इतरांवर अधिकार गाजवितांना आपल्याला आढळतो पण तेवढाच मानव मानसिक दृष्ट्या कमकुवतही झाला आहे आणि म्हणूनच अनेक मानसिक समस्यांना त्यांना तोंड द्यावे लागत आहे. ह्या वेळी स्वत:वर सर्वप्रथम स्वामित्व मिळविणे ही बाब महत्वाची ठरते. स्वत:च्या मनावर स्वामित्व गाजविणारी व्यक्तीच जगावरही स्वामित्व गाजवू शकते. संत साहित्यातून ही बाब आपणास प्रकर्षाने जाावते. तो सर्व बाह्य वाईट प्रवृत्तींच्या लाटेत अक्षरश: वहावत जात आहे. पण ज्याने आत्मप्रभुत्व प्राप्त केले आहे तो मात्र ह्या भोगांचे दास्यत्व झुगारतो व एकप्रकारची आत्मिक

शांती अनुभवतो ही मानवाची एकप्रकारची empowerment असते. अशा ह्या आत्मप्रभुत्वाची पध्दतीचे वर्णन गुरुदेवांच्या विचारात आपणास आढळते.

## उच्च आदर्श समोर ठेवून समर्पण भावनेने कर्म केल्यास मन शुध्द होते व अशा मनात ज्ञान रुजते.

व्यक्तिसमोर योग्य आदर्श असेल व ह्या आदर्शाच्या प्रति समर्पण भावना असेल तर मानवाच्या कर्माला योग्य दिशाप्राप्त होते हे आदर्श योग्य असण्याची आवश्यकता आहे. हे आदर्श म्हणजे आपण स्वत: प्रत्यक्षात कसे असावे ह्याचे एक आदर्शचित्र त्याच्यासमोर असेल व त्याच्या प्राप्तीसाठी तो स्वत: जर समर्पित असेल तर त्याचे कर्म शुध्द होते कारण त्याच्या प्रयत्नात प्रामाणिकपणा येतो आणि अशा प्रामाणिक प्रयत्नाने त्याचे मन शुध्द होते व अशा शुध्द व शांत मनातच ज्ञानाचे प्रतिबिंब हे शुध्द पडते. पण ह्या साठी मानवाने स्वत: कोण असावे कसे असावे ह्याबाबत त्याचे चित्र स्पष्ट असणे आवश्यक आहे. ह्यासाठी गुरुदेवांचे विचार अतिशय मार्गदर्शक ठरतात. आज नेमके व्यक्तीला ह्याबाबत मार्गदर्शन उपलब्ध नाही. बाह्य घटकांचे संपूर्ण ज्ञान आज उपलब्ध आहे व सर्वत्र ते प्राप्तही केले जाते पण आंतरिक घटकांचे ज्ञान मात्र त्याला नाही आणि परिणामी आपण कसे असावे ह्या बाबत त्याला निर्णय घेता येत नाही आणि मग स्वत:च्या स्वभावाला अनुकुल मग तो आदर्शाची निवड करु शकत नाही आणि मग ही निवड चुकल्यामुळे अगदी प्राथमिक स्तरावरच त्याचा मार्ग चुकतो. योग्य दिशेला टाकलेले पहिले पाऊल मानवाला आपल्या ध्येयाप्रत निश्चित पोहोचविते पण अयोग्य दिशेला जर पाऊल पडले तर मात्र आयुष्य भर भटकंती सुरुच राहते. हीच अवस्था आज व्यक्तीची झाली आहे आणि म्हणूनच त्याची अखंड भटकंती सुरु आहे. ह्या सर्वांचा परिणाम म्हणून मग लादलेल्या आदर्शाच्या प्रति त्याची समर्पण भावना नसते आणि म्हणून त्याच्या कर्माची दिशाही योग्य रहात नाही. परिणामी मनाची अंत:करणाची शुध्दता त्याची होऊ शकत नाही व त्यामुळेच ज्ञान त्याच्या मनात रुजू शकत नाही. ह्या सर्व बाबींसाठी आज योग्य आदर्श काय आहेत त्याची निवड कशी करायची ह्याचे व्यक्तीला संस्कार रुजविणे ही बाब अतिशय महत्वपूर्ण ठरते आणि ह्यासाठीच प.पू. गुरुदेवांच्या ह्या विचाराचे आजच्या काळात अनन्यसाधारण महत्व आहे.

- प्रभावी अध्ययनासाठी भावना व विचारांच्या उपकरणांना शुद्ध करण्याची व त्याची जुळणी करण्याची आवश्यकता आहे.
- विज्ञान प्रयोगशाळेत ज्याप्रमाणे साधनांची जुळवाजुळव केल्याशिवाय प्रयोग करता येत नाही त्याचप्रमाणे अध्ययनासाठी विविध मानसिक उपकरणांची जुळवाजुळव आवश्यक ठरते.
- कोणत्याही शास्त्राचे अध्ययन करण्यासाठी त्या शास्त्राबाबत आदर श्रद्धा व पूज्यभाव असावा लागतो.
- प्रभावी अध्यापनासाठी गुरुच्या सान्नीध्याची आवश्यकता आहे.

कोणताही प्रयोग जेव्हा प्रयोगशाळेत करायचा असतो तेव्हा सर्वप्रथम प्रयोगशाळेतील सर्व उपकरणांची जुळणी महत्वाची ठरते. त्याचप्रमाणे कोणत्याही विषयाचे अध्ययन करण्यासाठी मानवाचे मन आणि बुध्दी तयार असायला हवी. बऱ्याचदा ह्या दोन्ही उपकरणात आंतरविरोध निर्माण होतो. हे ह्या उपकरणाच्या अविकसिततेचे लक्षण आहे. कारण आज मन आणि बुध्दी हे एखाद्या विषयाचे प्रभावी अध्ययन होत नाही. आजच्या स्पर्धात्मक युगातील जीवघेण्या स्पर्धेमुळे मानव विमनस्क होतो आणि मग त्याचे मन अध्ययनाकरिता तयार नसते. शुध्द आणि शांत चित्तातच शुध्द विचारांचे प्रतिबिंब पडत असते आणि हे जर विक्षेपित असेल तर त्यात उत्तम विचारांचे प्रतिबिंब पडत नाही हा सर्व विचार करता ज्या प्रकारचे अध्ययन व्यक्तीला करावयाचे आहे त्यासाठी त्याच्या अंतकरणाची जुळणी अत्यंत महत्वाची ठरते. शिवाय आता ही जुळणी जर झाली असेल तर त्या शास्त्राबाबत त्याला नितांत आदर श्रध्दा असायला हवी. आज होमिओपॅथीचा, आयुर्वेदाचा अभ्यास करणारे किती विद्यार्थी आपल्या व्यावसायिक जीवनात १०० टक्के आपल्या शास्त्राला न्याय देतात. शिवाय आज शास्त्र अभ्यासाकरिता निवडण्यापूर्वी त्या शात्राचा आदर आहे म्हणून माझ्या जीवनाकरिता मी त्याची निवड केली आहे, असे क्वचित घडते. तर हा विषय गुण मिळविण्याच्या दृष्टीने भविष्यात फायद्याचा ठरु शकतो किंवा चांगल्य पगाराची नोकरी मिळविण्यासाठी त्या विषयाची निवड करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक असते. परिणामी त्याला त्या विषयाबाबत श्रध्दा असेलच

असे नाही आणि म्हणूनच शास्त्राबाबत आदर असेल पण श्रध्दा असेलच असे नाही प्रत्येकच बी.एड. झालेला प्रशिक्षणार्थी शिक्षक होत नाही किंवा प्रत्येक शिक्षक शास्त्रावर श्रध्दा अहे म्हणून शिक्षणशास्त्राचे सखोल अध्ययन करेल असेही नाही. ह्या सर्व परिस्थितीत शास्त्राबाबतचा श्रध्दायुक्त दृष्टिकोन नाही पण पोटभरु दृष्टिकोन मात्र निर्माण झालेला आपणास आढळतो आणि म्हणूनच गुरुदेवांचे हे विचार अत्यंत अनिवार्य ठरतात. प्राचीन काळी विद्यार्थी अर्थात शिष्य गुरुकुलात शिक्षण घेण्याकरिता जात असत. प्रभावी व्यक्तिमत्वाच्या सान्निध्यात ही शिष्य आयुष्याची २४ वर्ष घालवित असत आणि ह्याचा प्रभाव म्हणजे त्यांचेही व्यक्तिमत्व हे प्रभावी ठरत असे, बनत असे. पण आज मात्र एका वर्गात १०० ते १५० विद्यार्थी असतांना शिक्षकाकडून व्यक्तिगत मार्गदर्शनाची आपण अपेक्षा करु शकत नाही. महाविद्यालयात तर आपल्या वर्गात कोणकोणते विद्यार्थी आहे हे सुध्दा विद्यार्थीसंख्येमुळे शिक्षकाला कळू शकत नाही. त्याचा परिणाम असा होतो की विद्यार्थी प्रभावी व्यक्तिमत्वाच्या प्रभावाखाली येत नाही. गुरुशिष्यांचे व्यक्तिगत सहसंबंध निर्माणच होत नाहीत. आंतरिक सहसंबंध निर्माण होत नाही. ही बाब गुरुदेवांनी अतिशय अचूकतेने हेरली आहे आणि त्यावर मार्गदर्शन केले आहे.

- प्रभावी अध्यापनासाठी गुरुच्या सान्नीध्याची आवश्यकता आहे.
- तुलना करणे हा आकलनाचा एक मार्ग आहे.
- काही उच्च आदर्श प्राप्त करण्यासाठी चुका आणि शिका ह्या पद्धतीचा आपण उपयोग करावयास हवा.
- जेव्हा कार्य दिसून येते तेव्हा बुद्धीला ते समजून घेण्याचा प्रयत्न म्हणून त्याच्या कारणांचा शोध घ्यावयास पाहिजे.
- कार्यकारण भाव शोधन हा बुद्धीचा कधीही न संपणारा खेळ असतो म्हणून अध्ययनासाठी कार्यकारण भाव शोधन पद्धती महत्त्वाची आहे.
- प्रभावी अध्ययनासाठी चिंतन पद्धत महत्त्वाची आहे.
- व्यक्तीमत्त्व विकसित करण्यासाठी आत्मनिरीक्षण पद्धत महत्त्वाची आहे.
- अध्यापनासाठी चर्चा पद्धत व प्रश्नोत्तर पद्धत स्वयंशोधन पद्धत महत्त्वाची आहे.

- स्वतःचे मूल्यांकन करणे स्वतः बद्दलचे निदान करणे, आणि आपण प्रत्यक्षात कोण आणि कसे आहोत हे समजणे ही भावनिक बुद्धीमत्ता वाढविण्यासाठी आवश्यक आहे.
- आत्मनिरीक्षण व आत्मविश्लेषण ही स्वयंअध्ययनाची प्रभावी पद्धती आहे.
- आत्मपरीक्षण अध्ययन पद्धतीत आत्मनिरीक्षण, शोधन, निषेध व बदली योजना हे टप्पे महत्त्वाचे ठरतात.
- अध्ययनासाठी श्रवण, मनन निदीध्यासन आवश्यक आहे.
- Self cleansing ह्या प्रक्रियेसाठी Moral Living, Ethical standards, virtues, cultural values ह्यांचा अंतर्भाव करण्यात आला आहे.
- श्रवण पद्धतीने अध्ययन दृढ होते.
- श्रवण पद्धतीत पुढील क्षमता विकसित होतात.

  1) Ability of understanding 2) Self awareness 3) Self application
- अध्ययनासाठी Learning Mind ची आवश्यकता आहे.
- बाह्य जगाचे अध्ययन करण्यासाठी बौद्धिक विश्लेषण पद्धती योग्य आहे.

वरील सर्व विधानांवरुन लक्षात येते की, आधुनिक समजण्यात येणाऱ्या तुलनापध्दतीत चुका शिका पध्दत, कार्यकारण पध्दत, कार्यकारण भाव शोधन पध्दती, चर्चा प्रश्नोत्तर पध्दत इ. पध्दती गुरुदेवांनी मांडल्या व त्याचे शास्त्रशुध्द विवेचन केले. पण सर्व विचारात Learning to learn ह्या संकल्पनेत बसणाऱ्या काही स्वयंअध्ययन पध्दतीची आज नितांत आवश्यकता आहे त्या पध्दती म्हणजे चिंतन पध्दती, आत्मनिरिक्षण पध्दत, श्रवण पध्दती इ. ह्या पध्दती म्हणजे वेदांत अभ्यासकाने अभ्यासावयाच्या आहेत, असा एक गैरसमज आहे पण आत्मनिरिक्षणाची पध्दत आज प्रत्येक व्यक्तीने अभ्यास आवश्यक आहे. आत्म निरिक्षणाची एक विशिष्ट पध्दत प.पू. गुरुदेवांनी विकसित केली आहे. ह्या पध्दतीचा आजच्या शिक्षणपध्दतीने आवर्जुन विचार करायला हवा आणि प्रत्येक व्यक्तिनेही ही पध्दती आचरणात आणायला हवी.

**व्यक्तीचे जन्मपूर्व शिक्षण अध्ययन हे व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने आवश्यक आहे.**

आज जन्मपूर्व शिक्षणाच्या बाबतीत शिक्षण प्रणालीने अद्यापतरी विचार केलेला नाही. वास्तविक पाहता माता जे अन्न खाते त्यापासून बालकाचे शरीर बनते व माता जे अनुभव घेते जो विचार करते त्यापासून बालकाचे मन आणि बुध्दी घडते. पण आज माता ह्याबाबत जागृत आहे का? आपण सकस अन्नाबाबत माता जागृत असते पण त्या मानाने ती स्वत:च्या अनुभवाबाबत मानसिकतेबाबत एवढी जागृत रहात नाही. हॉटेलिंग, सिनेमे पाहणाऱ्या मातेच्या बालकावर जन्मपूर्व स्थितीत चांगल्या संस्काराची मग आपण अपेक्षा करु शकत नाही आणि त्यानंतर आपला मुलगा हा बिघडला ही तक्रार बालक मोठा झाला की माता पिता करतात. पण हे आपणच केलेल्या बीजारोपणाचा परिणाम आहे ही बाब किती पालकांना कळते. पालकत्व हे अनावधानाने प्राप्त झालेले आणि सहज स्विकारलेले नसते. त्यात जबाबदारी उत्तदायीत्व ह्या दोन्हीही बाबी येतात आणि म्हणूनच बालकांमध्ये संस्काराचे बीजारोपण हे जन्मपूर्व अवस्थेतच होते. आधुनिक मानसशास्त्रज्ञ तर ह्याला मान्यता आज देतात आहेत पण भारतात हा विचार प्राचीन काळापासून स्थीत आहे. प.पू. गुरुदेवांनी ह्यासाठी पौराणिक दाखले दिले आहेत. आज शिक्षण तज्ज्ञही ह्याचा विचार करीत आहेत.

- **आंतरराष्ट्रीय शांततामय जीवनासाठी, मानवाला त्यांच्या जीवनात जास्तीत जास्त शांतता मिळविण्यासाठी शांतीपाठाची आवश्यकता आहे.**

- **जगाला शांततेकडे जायचे असेल व सांस्कृतिक परिपूर्णतेच्या अधिक विशाल मंदिराकडे जायचे असेल तर नित्य शांतीपाठाची आवश्यकता आहे.**

आज आंतरराष्ट्रीय स्तरावर अशांतता आहे. मानवी जीवन अक्षरश: ढवळून निघाले आहे. व्यक्तिमत्वाच्या सर्व स्तरावर अशांतता आपणास आढळते प्राचीन काळी गुरुशिष्य जेव्हा एकत्र येत तेव्हा अध्यापन, अध्ययन प्रक्रिया ही शांतीपाठाने सुरु होत असे. ह्या शांतीपाठात त्रिवार शांतीची प्रार्थना करीत असत. गुरुशिष्याच्या, जगाच्या कल्याणाची अपेक्षा त्यात असे, प्रार्थना असे. ह्या शांतीपाठाचा आशय समजून विद्यार्थी हा शांतीपाठ म्हणत,

आपल्या आचरणात आणत.  पण शांतीपाठ शाळेत म्हटल्या जातो तो केवळ एक औपचारिकता म्हणून पण ह्यातून मनाचे प्रशिक्षण मात्र साध्य होत नाही आणि म्हणूनच NCF २००५ मध्ये शांतता शिक्षणाची वेगळी योजनाच दिली आहे.  ज्याचे भाष्य गुरुदेवांनी युनोमध्ये केले होते.

- विविध शास्त्रातील ज्ञान हे औपाधिक ज्ञान आहे परिणामी त्या शास्त्राला मर्यादा आहेत.
- ज्ञान आणि विज्ञान ह्यातील फरक व्यक्तीला समजायला हवा.
- तत्वज्ञ आणि शास्त्रज्ञ ह्यांच्यातील फरक इतकाच की त्यांच्या अन्वेषणाचे क्षेत्र भिन्न आहे.
- विज्ञान हे प्रायः आपल्या सभोवतालच्या जगातील वस्तुभाव आणि त्यांचे आकृतीबंध ह्याचे पुर्नसमायोजन आणि पुर्नआखणी करून सुख मिळवून देण्याची आशा बाळगते.
- विज्ञानाने मानवाला चिकित्सक दृष्टिकोन दिला पण स्वयंअध्ययनाचा चिकित्सक  दृष्टिकोन दिला नाही.

वरील विधानामध्ये विज्ञानाकडे पाहण्याचा दृष्टिकोन देण्यात आला आहे. आज विज्ञानाच्या सर्व आधीन झाले आहे अखिल मानवी जीवन विज्ञानाच्या आधीन झाले आहे. विज्ञानाने मानवाचे आयुष्य सुखासीन बनविले पण शाश्वत सुख मात्र ते मानवाला द्यायला असमर्थ ठरले आहे.  कारण विज्ञानला मर्यादा आहेत.  एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच विज्ञान हे मानवी जीवनाचा विचार करु शकते पण मानवी कल्याणाचा विचार करु शकत नाही. विज्ञानाने मानवाची प्रगती करुन आणली पण मानवतेची हिंसाही केली आहे. जगातील अणुस्फोट, महायुध्द विविध हे विनाशाचे द्योतक आहे.  पण हा विज्ञानाची सत्यत ही गुरुदेवांनी स्पष्ट केली.  आज जगात खऱ्या अर्थाने गरज आहे ती तत्वज्ञांची आज शास्त्रज्ञ अनेक आहे पण तत्वज्ञ कमी आहेत.  त्यामुळे बाह्य ज्ञानाच्या सीमा अफाट वाढल्या पण अंतर्जगताबाबत मानव अनभिज्ञ झाला त्यामुळे जीवनाच्या त्याच्या सर्व संकल्पनाच बदलल्या.  बाह्य ज्ञान हे मानवाला

शाश्वत सुख आनंद प्रदान करु तर शकत नाहीच पण त्याच्यात विक्षेप मात्र निर्माण करते. कारण विज्ञान मानवाला सर्व बाह्य घटकांची चिकित्सा करायला शिकविते पण स्वत:ची चिकित्सा करायला शिकवित नाही आणि म्हणूनच संपूर्ण जगावर अधिपत्य गाजविण्याची विजीगीषु वृत्ती बाळगणारी मनोवृत्ती मात्र अत्यंत कमकुवत असते. ह्याचे कारण प्रत्येक शास्त्राला काही मर्यादा असतात. विज्ञानालाही मर्यादा असतात. विज्ञानाची काही गृहितकृत्ये असतात. प्रत्येक शास्त्राची गृहितकृत्ये असतात. त्यावर त्या शास्त्राची उभारणी झाली असते. पण तत्वज्ञानाला गृहितकृत्यांची मर्यादा नसते व इतर शास्त्राची मर्यादा संपते तेथे तत्वज्ञानाच्या मर्यादेस प्रारंभ होतो, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. तसेच इतर शास्त्राच्या अनुभवाच्या स्वत:च्या काही कक्षा असतात. तेवढ्या कक्षा पुरतेच त्यांचे कार्य मर्यादित असते. पण तत्वज्ञानाच्या कक्षा ह्या अमर्यादित असतात. त्यामुळे ते अखिल जीवनालाच स्पर्श करते. आईनस्टाईन म्हणते, ''मी Matter बरेच शोधून काढले पण त्यामानाने Mind शोधण्यास मात्र मी असमर्थ ठरलो''. ह्या विधानामागील त्याची भावनाहेच दर्शविते की इतर सर्व शास्त्रांना एक विशिष्ट मर्यादा असते. पण जी वास्तविकता एका महान शास्त्रज्ञाने मान्य केली ती वास्तविकता व्यक्ती सहजासहजी स्विकारत नाही. आज सर्वत्र तत्वज्ञानाला विरोध होतांना आपल्याला लक्षात येते. एक काळ होता जेव्हा तत्वज्ञानाच्या पगड्यामुळे विज्ञान अत्यंत दुर्लक्षित झाले होते. पण आज नेमके ह्याच्या उलट घडते आहे. ते म्हणजे विज्ञानामुळे तत्वज्ञान दुर्लक्षित होत आहे. वास्तविक व्यक्तीजीवनात ह्या दोही बाबींची आवश्यकता आहे. मानवी जीवनाच्या समतोलाकरिता विज्ञान आणि तत्वज्ञान दोन्ही घटक तेवढेच महत्वाचे आहे. ह्या सर्व दृष्टिकोनातून विचार करता गुरुदेवांचे वरील विचार अत्यंत उद्‌बोधक ठरतात.

- एखाद्याला शिष्य म्हणून स्वीकारल्यानंतर त्याला ममतेने प्रेमाने मार्गदर्शन करणे हे गुरुचे कर्तव्य आहे.
- गुरुला शिष्याबद्दल अपत्यप्रेम असावे.
- शिष्याने आपल्या आज्ञेचे पालन करावे असे जर वाटत असेल तर गुरुने शिष्याच्या शंकाचे निरसन करावे.

u गुरुशिष्यात प्रेमाचे संबंध निर्माण झाल्यावर गुरुला शिकविण्याची उर्मी येते.

u तु पैसे दे मी शिकवतो अशी व्यापारी वृत्ती गुरुच्या ठिकाणी नको.

u ज्या ठिकाणी प्रेम, मित्रत्व, स्वातंत्र्य, परस्पर समज ह्याचे सहानुभूतीचे वातावरण असते अशाच ठिकाणी बुद्धीचा मनाचा चांगला विकास होतो.

u गुरुबद्दल श्रद्धा आदर पुज्यबुद्धी, गौरवाची नम्रवृत्ती ह्या चौकटीत राहून शिष्याने चर्चा करावी.

u शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये स्वतंत्र्यरित्या प्रत्येक गोष्टीचा अनुभव घेण्याचे सामार्थ्य निर्माण करावयाची प्रेरणा निर्माण करावयास हवी.

u जेव्हा गुरु शिष्यासोबत परिपूर्ण ताळमेळ साधतो तेव्हाच गुरु त्याला ज्ञान प्रदान करतो.

u विषयाचे अध्ययन करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये किमान ग्रहणशिलता असावयला हवी.

u प्रभावी अध्ययनासाठी विद्यार्थ्यामध्ये अध्ययनाबाबत रूची असावी त्या विषयाबाबत आदर असावा.

u शिक्षकाने आपल्या उच्चारात आणि विचारात समन्वय साधावा.

u ग्रहण केलेले ज्ञान स्वतःजवळ सुरक्षित ठेवण्याची क्षमता विद्यार्थ्यांत असावी.

u आचार्य व छात्र ह्यांचा  एकमेकांशी सुसंवाद होतो तेव्हाच ज्ञानदानाची प्रक्रिया सुरू होते.

u ज्याला लोभ व अहंकार माहित नाही व जो सदा सद्चरित असतो तोच खरा आचार्य होय.

u गुरु हा केवळ ध्वनिमुद्रीका नको तर तो ज्ञानाने आचारणाने परिपूर्ण हवा.

- चांगले गुरु हे आपल्या शिष्याची स्वतंत्रपणे चर्चा करण्याची शक्ती गुदमरून टाकून देणारे नसतात.
- विद्यार्थी तेव्हाच शिस्तप्रिय होईल, जेव्हा शिक्षक सदाचारी होतील.
- मानव संस्कृतीची दखल, नैतिक दर्जा, किंवा सदाचाराची झळाळी विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्वाला प्रदान करायची असेल तर विद्यार्थ्याने आपल्या मनात प्रेम पूज्यभाव व सख्यत्व ह्या भावना बाळगून शिक्षकाजवळ जाणे आवश्यक आहे.
- गुरुचे आचरण हे शुद्ध असायला हवे कारण शिष्य त्याच्या बाह्य सवयीचे अनुकरण करतात.
- गुरु हा उदार अंतकरणाचा उदार दयाळू व सहिष्णु असावा.
- विद्यार्थ्याला गुरुच्या उपदेशाच्या प्रति अरूची असेल तर तो काहीही ग्रहण करू शकणार नाही त्याच्या अंतःकरणात काहीही झीरपु शकणार नाही. नविन संकल्पना मूळ धरू शकणार नाही.
- शिक्षकाने निर्देष देऊन मुलांना ज्ञान आत्मसात करण्यास प्रवृत्त करावयास हवे.
- शिक्षकांमध्ये खालील गुण असायला हवेत.

1) Living the Ideals that have been intellectually comprehended during the studies (Satyam)
2) The practice of what is right and proper as indicate in the scripture
3) A spirit of self sacrifice and self denial
4) Control of the senses.
5) Tranquility of mind
6) Doing ones duty towards humanity

u विद्यार्थ्याला आपल्या शिक्षकाला केवळ प्रश्न करण्याचे स्वातंत्र्यच नाही तर उत्तर प्राप्त करण्याचा अधिकार आहे.

वरील सर्व विचार हे गुरुशिष्य संबंधावर आधारीत आहेत. शिक्षकांच्या अंगी कोणते गुण असावे. विद्यार्थ्यांच्या अंगी कोणते गुण असावे व गुरुशिष्यामध्ये काय नाते असावे ह्या महत्वाच्या बाबी ते प्रकाशित करतात. आज प्रत्येक नात्याच्या मर्यादा व्यक्ती ओलांडते आहे. नात्याला कुंपण राहिल. नाते, कुटुंबसंस्था ह्या विखुरल्या आहे. समाजात मानवाशी मानवाचे नाते संकुचित झाले आहे. ह्याला जबाबदार कोण. हा खरोखरच संशोधनाचाच विषय आहे. पण तरीही आज समाजात प्रत्येकाला पुनश्च आपआपल्या भूमिकानुसार आचरण करण्याची प्रशिक्षण देण्याची वेळ आली आहे. त्याला शिक्षणक्षेत्रही अपवाद नाही. अशा ह्या परिस्थितीत गुरु म्हणून शिष्य म्हणून भूमिका काय आहे. हे अत्यंत समर्पक शब्दात गुरुदेवांनी सांगितले आहे.

u राष्ट्र हे नागरिकांनी बनते जर नागरिक बलवान कुशल पराक्रमी आणि त्यागी असतील तर राष्ट्रही बलवान होते.

u केवळ भुखंडावर वास्तव्या करणाऱ्या लोकांचा समूह म्हणजे राष्ट्र नव्हे तर हा लोकसमूह जेव्हा सुसंघटीत कार्यक्रमासाठी एकत्रित येतो आणि समान ध्येय गाठण्यासाठी निष्ठेने झटत असतो. तेव्हाच राष्ट्राची घडण होते.

u राष्ट्राचे सामर्थ्य व गुणात्मकता ही व्यक्तीचे सामर्थ्य व गुणात्मकता यावर अवलंबून आहे.

u एकात्मतेची भावना निर्माण करण्यासाठी धार्मिक तत्त्वाचे संस्कार करावे लागतील.

u जेव्हा एखादा जनसमूह प्रदीर्घ काळपर्यंत विशिष्ट भौगोलिक क्षेत्रात जीवनाच्या काही तात्त्विक मूल्यांचा आणि सद्गुणांचा आदर करित जीवन जागत असतो व त्यातून जो जीवन सुगंध पसरतो त्यास संस्कृती म्हणतात.

- **Adaptation to new environment** हे जीवन ध्येय आहे.
- **“Material and spiritual welfare of all” is a great goal brining about integration.**
- राष्ट्रीय व भावनिक एकात्मता घडवून आणायची असेल तर उत्कृष्ट व्यक्तीमत्त्वाच्या आदर्शाचे उदा. विद्यार्थ्यांसमोर ठेवावे लागतील.

वरील सर्व विधाने ही राष्ट्र, राष्ट्र संकल्पना, राष्ट्रांची जडणघडण, राष्ट्राची गुणात्मकता, एकात्मतेची भावना, संस्कृती, भावनिक एकात्मता ह्याच्याशी निगडीत आहे. प.पू. गुरुदेव हे प्रखर राष्ट्रभक्त होते आणि म्हणूनच त्यांचा हा प्रत्येक विचार हा राष्ट्रोन्नतीकडे होता आणि म्हणूनच त्यांनी जी राष्ट्रसंकल्पना मांडली ती अत्यंत महत्वपूर्ण ठरते. आज ह्या दृष्टीने राष्ट्रभक्ती ही लोकांच्या मनात आढळत नाही. सर्वत्र स्वार्थ अत्यंत बोकाळला आहे. स्वत:च्या भौतिक विकासापर्यंतच व्यक्तिच्या विकासाच्या संकल्पना पोहोचतात. पण राष्ट्राचा विकासावर माझ्या विशिष्ट कृतीचा काय परिणाम होईल ह्याचा विचार मात्र प्रकर्षाने होतांना आपल्याला आढळत नाही आणि म्हणूनच गुरुदेवांचे हे विचार महत्वाचे ठरतातत्र.

## इतरांच्या हक्काची जाणीव ठेवली तर ते शांती व समृध्दीच्या मार्गाला देशाला नेतात ही जाणीव मानवाची विकसित व्हायला हवी.

भारतीय संस्कृती ही अधिकार भावनेवर नाही तर कर्तव्य भावनेवर आधारीत आहे. ह्या संदर्भातील विवेचन ह्यापूर्वी आलेलेच आहे. आज समाजात स्वत:च्या हक्काची जाणीव प्रत्येक व्यक्तिला आहे. त्या संदर्भात आज अनेक कायदेही झाले पण कायद्याने मन परिवर्तन झाले का? ते मात्र झालेले आपणास आढळत नाही. पण ही भावना जर दृढ करता आली की इतरांचे अधिकार जपणे हे माझे कर्तव्य आहे ही भावना जर व्यक्तिच्या मनात दृढ झाली तर कायद्याचा बडगा दाखविण्याची आवश्यकता पडणार नाही. ह्या सर्व दृष्टिकोनातून प.पू. गुरुदेवांची ही मते अतिशय महत्वपूर्ण वाटतात. स्वत:चे अधिकार जपण्यापेक्षा इतरांचे अधिकार जपण्यासाठी स्वत:चे कर्तव्य भावना जोपासणे ही बाब महत्वाची ठरते आणि म्हणून ह्याबाबतचा सकारात्मक दृष्टिकोन निर्माण व्हायला हवा. कारण स्वत:च्या अधिकाराची

जाणीव मानवाला अशांत बनविते तर इतरांच्या अधिकाराची जाणीव आपल्या मनात शांतता निर्माण करते.

**भारतीय राज्य घटनेने मानवीय स्वातंत्र्यास मान्यता दिली पण त्याचसोबत अनेक आदेश व नियमसुध्दा त्यात दिले आहे.**

ह्याबाबत व्यक्तीला भान हवे. हे विधान करतांना आज स्वातंत्र्य संकल्पनेचा जो विपर्यास होतो आहे हा गुरुदेवांच्या डोळ्यासमोर होता. स्वातंत्र्य हे काही बंधनाशिवाय उपभोगताच येत नाही, असे त्यांचे मत होते. डाव्या बाजूने चालण्याच्या नियमाशिवाय रस्त्यावरील चालण्याचे स्वातंत्र्य व्यक्ती उपभोगू शकत नाही. भारतीय राज्य घटनेने दिलेले स्वातंत्र्य हे घटनेने दिलेल्या अधिकारामुळे तसेच कायद्यामुळेच उपभोगता येते. पण आज स्वातंत्र्य संकल्पनेचा अत्यंत विपर्यास झाला आहे आणि स्वातंत्र्य ही संकल्पना व्यक्तिगत स्तरावर स्वैराचाराकडे जात आहे. ही सगळी बाब अत्यंत गंभीर आहे आणि म्हणूनच स्वातंत्र्याची संकल्पना अशाच विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे अनिवार्य ठरते.

- आत्मसंयमन व आत्मशिस्त हीच खरी शिस्त आहे.
- जगताशी योग्य संबंध राखण्याची कला आपणास माहित असेल तरच आपण आपल्या व्यक्तीमत्त्वाला शिस्त लावू शकतो.
- केवळ शारीरिक शिस्त पुरेशी नाही त्याचबरोबर विद्यार्थ्यामध्ये मानसिक शिस्तही आवश्यक आहे.
- आंतरिक व बाह्य मनाच्या कार्यात सुंसंवाद निर्माण करणे हेच मानवाचे ध्येय आहे.
- बहिर्मुख मन व अंतर्मुख मन दोन्ही बाजू समन्वयाचे काम करतील तरच मानवाच्या व्यक्तिमत्वात समन्वय निर्माण होतो.
- जीवनातील विविध समस्यांना सामोरे जाण्याची क्षमता मानवामध्ये निर्माण व्हायला हवी.
- जीवनध्येय व जीवनमार्ग ह्यात समन्वय असावा.

प.पू. स्वामीजी हे शिस्तीचे अतिशय भोक्ते होते पण बाहेरुन लादलेली शिस्त ही त्यांना मान्य नव्हती. आज बऱ्याच शाळांमध्ये आपण पाहतो की शिस्तीच्या नावाखाली ज्या बाबी घडतात त्या विद्यार्थ्यांच्या मनात हिंसेची भावना जागृत करतात ही बाब NCF २००५ ने प्रकर्षाने मांडली आहे आणि म्हणून बाहेरुन लादलेली शिस्त ही बऱ्याचदा मानवी मनाला हिंसेकडे नेऊ शकते ही भिती शिक्षण तज्ज्ञांच्या मनात आहे. ह्यावर उपायही त्यांनी सुचविला आहे आणि हा उपाय म्हणजे शिस्त ह्या प्रक्रियेतच विद्यार्थ्यांना सहभागी करु घेतले तर ही स्वयंशिस्त रुजायला मदत होते. बऱ्याचदा असेही घडते की शिस्तीच्या नावे विद्यार्थ्यांना शिस्त बाहेरुन लावण्याचा जबरी प्रयोग केला तर त्याचा विपरीत परिणाम होऊन मूल कोडगे बनते व अधिकाधिक बेशिस्त बनते. हा सगळा विचार केला तर गुरुदेवांचे शिस्तीबाबतचे विचार पटल्याशिवाय रहात नाही. स्वयंशिस्त ही आत्मसंयमातून लागते आणि नेमके आज हीच बाब दुर्लक्षित होत आहे. आज मानवामध्ये संयमच आपणास दिसत नाही आणि त्यामुळे मानवी वर्तनाला मर्यादाच राहिल्या नाहीत. लहान वयात मूल दारु प्यायला लागते, सिगरेट ओढायला लागतात अशावेळी उच्चभ्रू सोसायटीत ही बाब प्रतिष्ठेची मानली जाते. लहान वयात मुली सुध्दा अंग प्रदर्शन करणारे कपडे घालतात पण ह्या बाबतीत पालक तर त्यांना बोलत नाहीच पण आपल्या मुलीला तसे कपडे घालण्यावरुन प्रोत्साहित करतात. ह्या सर्व घटनावळीत बालकांवर आत्म संयमनाचे संस्कार अपेक्षित करणे ही बाब अशक्य आहे. शिवाय प्रत्येकाचा बाह्य जगातील प्रत्येक घटकाशी संबंध असतो, काही नाते असते व ह्या संबंधानुसार नात्यानुसार त्याला ह्या जगात वावरावे लागते व हा संबंध जर निकोप असेल तर आपोआपच व्यक्तीचे वर्तन सुधारते पण हा संबंध निकोप नसेल तर संघर्ष अधिक वाढेल व ह्या संघर्षात शिस्तीची अपेक्षा करणे अयोग्य ठरते.

- धर्म म्हणजे **Low of Being**
- खऱ्या धर्माचा आशयलोकांपर्यत पोहाचायला हवा.
- वर्णव्यवस्थेचा खरा आशय आजही समाजापर्यत पोहोचलेला नाही.

आज धर्माचा खरा आशय हा दुर्लक्षित होतो आहे. धर्मांधता ही दिवसेंदिवस

वाढते आहे. वर्णव्यवस्थेचा आशय हा समाजापर्यंत पोहोचला आहे, असे वाटत नाही. आज धर्म संकल्पना ही हिंदू, मुस्लिम, शीख ह्या संकल्पनेत बघितली जाते व कोणता धर्म श्रेष्ठ ह्यावर मग मतभेद वाढतात. प्राचीन काळी जी वर्णव्यवस्था भारतात होती त्या व्यवस्थेचा खरा आशय लोकांपर्यंत पोहोचत नाही. पण त्यातून निघालेली जातीव्यवस्था मात्र लोकांनी स्विकारली व आज सर्व समाजात जात व धर्मांच्या बाबत भांडणे सुरु आहे. ही परिस्थिती आज विकोपाला गेली आहे. ह्यावळी धर्माचा जातीचा वर्णाचा खरा अर्थ समाजाला सांगणे अनिवार्य आहे हा अर्थ गुरुदेवांनी आपल्या लिखाणात प्रकर्षाने मांडले आहे. धर्म संकल्पनेच्या प्रकरणात ह्याचा उल्लेख केलेला आहे.

- **संस्कृती संवर्धन व सांस्कृतिक जतन महत्त्वाचे आहे.**
- **संस्कृतीचे, आध्यात्मिक संस्कृतीचे शिक्षण घ्यायला हवे.**
- **संस्कृतीचे रक्षण करणाऱ्या महानुभवांच्या जीवनाचे व कार्याचे ज्ञान व्यक्तीला करून द्यावे.**
- **बहुजन समाजाच्या मनातून संस्कृतिबाबत निरर्थक भिती काढून टाकल्याशिवाय पुनरूत्थान होऊ शकत नाही.**

संस्कृती संक्रमण व संवर्धन ही शिक्षणाची अनिवार्य कार्य आहेत. भारतीय संस्कृती ही आध्यात्मिक संस्कृती आहे, प्राचीन आहे. पण ह्याचा विसर आजच्या समाजाला पडलेला आहे. ह्याचे महत्वाचे कारण भारतीय विचारांचे झालेले पाश्चिमात्यीकरण हे महत्वाचे आहे. भारतीय विचारोच आज पाश्चात्यीकरण झाले आहे. संस्कृतीचाही आशय आज विसरल्या जात आहे आणि म्हणून आज समाजात अनेकदा आपणास असंस्कृत वर्तन करतांना लोक आढळतात. एक काळ होता जेव्हा भारतात सुवर्ण युग होते. पण आज मात्र सर्व उदात्त विचारधार लुप्त झाल्या आहेत किंवा कसे इतपत संभ्रम पडावा अशी अवस्था समाजाची झालेली आहे. भारतीय जीवनात एक कालखंड असा आहे की, ज्यावेळी बहुजन समाज हा शिक्षणापासून वंचित होता, ज्ञानापासून वंचित होता, ज्ञानाच्या क्षेत्रात भारतातही एक प्रकारची अधिकारशाही होती. पण ह्याचा परिणाम म्हणून बहुजनांच्या मनात ज्ञानाची एक प्रकारची भिती होती. पण

आता परिस्थिती बदलली आहे ह्या बदलत्या परिस्थितीत आज न्यायासमोर कायद्यासमोर सर्वांना समान हक्क प्राप्त आहेत आणि म्हणूनच ज्ञानाबाबतची भिती बहुजन समाजाच्या मनातून काढून टाकण्याबाबतचा आग्रह गुरुदेवांनी धरला आहे.

u अध्यात्मिक अधिकार हा मानवाचा सर्वश्रेष्ठ मानवाधिकार आहे.

u स्वतःवर प्रभुत्व मिळविणे हा मानवाचा विशेष अधिकार आहे.

u शिक्षणातून **Standard fo living and standard of life** दोन्हीचा विकास व्हायला हवा.

u स्वतःचे सत्य स्वरूप जाणुन घेणे हा मानवाचा जन्मसिद्ध अधिकार आहे.

u नैतिक मूल्य हे जीवनाचे अभिन्न अंग कसे बनेल ह्याची प्रक्रिया महत्त्वाची आहे.

u पूर्ण विश्व हे घर असून सर्व प्राणी हे त्याचे निवासी आहे ही सहअस्तीत्वाची भावना व्यक्तीमध्ये निर्माण होणे महत्त्वाचे आहे.

u शांतता पूर्ण व आनंदात सहजीवन जगणे हा मानवाचा विशेषाधिकार आहे.

१९४८ साली युनोने मानवाधिकाराची सनद मंजूर केली. वास्तविक पाहता भारतीय तत्वज्ञानाने हा विचार ह्यापूर्वी अनेक वर्ष आधी केलेला आहे. ''सर्वे भवन्तु सुखिन:'' हा विचार ''सहनाववतु सहनौभुनक्तु' पूर्णमदः पूर्णमिदं'' ह्या सर्व श्लोकातून मानवाचा कर्तव्याचा अधिकार आपणास पहावयास मिळतो. भारतीय संस्कृतीने कर्तव्याधिकारावर भर दिला आहे. उत्तरदायित्वाच्या अधिकारावर भर दिला आहे. ह्याचे विवेचन ह्यापूर्वी देण्यात आले आहे आणि म्हणूनच इतर सर्व अधिकाराप्रमाणे मानवाचा आध्यात्मिक अधिकार हा सर्वश्रेष्ठ अधिकार आहे.

u देशातील उर्ध्वयु स्वतः ठामपणे जगत असतात. तेव्हाच जीवनाची मूल्य पुनरूजीवीत होतात.

- देशाचा पुढारी जर चांगला असेल तर देशाचे नागरिक आपोआप त्याचे अनुकरण करतील.
- देशाचे नेते जेव्हा उच्च जीवनाचा विचार करतात त्याचवेळी तात्विक व्यावहारिक मूल्यांचे व अध्यात्मिकतेचे पुनरूज्जीवन देशात मूळ धरू शकते.


समाजाला पुढे नेण्यात नेतृत्वाची भूमिका फार महत्वाची आहे. नेतृत्व मग ते कोणत्याही क्षेत्रातील असो हे नेतृत्व अत्यंत सक्षम हवे. देशातील मूल्य संस्कृती ह्याचे जतन तेव्हाच होते जेव्हा स्वत: नेतृत्व ह्याचे आचरण करतील निश्चित देशातील नेता जेव्हा ह्या मूल्यांचे आचरण करतो तेव्हा वेगळ्या मूल्यशिक्षणाची गरज रहात नाही. कारण मानव हा अनुकरणप्रिय असतो आणि म्हणूनच देशाची संस्कृती परंपरा, मूल्य जपण्याची धुरा ही प्रकर्षाने नेतृत्वाच्या खांद्यावर असते. ह्या अनुषंगाने हे विचार महत्वाचे वाटतात. आज शासन बदलले की शिक्षण प्रणाली बदलते ही बाब अत्यंत चुकीची आहे. नेत्यांचे संसदेमधील बऱ्याचदा वर्तनही अशोभनीय असते. ह्या सर्व बाबी संस्कृतीला, मूल्यांना गंभीर इजा पोहोचवितात आणि अशावेळी मग गुरुदेवांचे मताचे महत्व आपणास पटल्याशिवाय रहात नाही.

## व्यक्तीची संकल्पशक्ती वृद्धींगत व्हायला हवी.

आज व्यक्ती कार्य करतो पण त्यामागे त्याची संकल्पशक्ती नसते ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे त्याला नेमके काय करायचे आहे हा विचारच त्याचा पक्का नसतो. ही संकल्प शक्ती मानवाला कार्य करण्याची योग्य दिशा तर प्रदानच करते पण त्याच सोबत कार्य करण्याची उर्जाही प्रदान करते. पण आज ही युवकांमधील संकल्पशक्ती ही संपली की काय इतपत युवक हा चांगल्या कार्याच्या बाबतीत निष्क्रिय झाला आहे. अशोवळी संकल्पशक्ती बाबतचे विवेचन प.पू. गुरुदेवांनी जे self unfoldment किंवा 'जीवनज्योत' ह्या पुस्तकात दिले ते अत्यंत महत्वपूर्ण ठरते.

## 'हे विश्वची माझे घर' ही भावना दृढ व्हायला हवी.

आजचे युग हे जागतिकीकरणाचे युग आहे. आदी मानवापासून तर ज्ञानी मानवापर्यंतचा मानवाचा विकास हा थक्क करणारा आहे. पण मानवाचा विकास झाला, हा विकास केवळ भौतिक स्तरावरच राहिला त्याचा आध्यात्मिक विकास मात्र दुर्लक्षित राहिला व तो अधिकाधिक संकुचित झाला आहे. त्याची वैश्विक भावना लयाला जात आहे. संकुचिततेच्या भिंती त्याने आपल्या भोवती घातल्या आहे. ह्या दृष्टीने गुरुदेवांचे हे विचार अत्यंत उपयुक्त



ठरतात. आज त्याच्यात सहअस्तित्वाची भावना निर्माण झाली तरच खऱ्या अर्थाने त्याची जागतिकीकरण ही संकल्पना सार्थ ठरते पण त्यासाठी मानवाचा 'स्व'चा परिघ वाढायला हवा.

व ह्या परिघा पलीकडे पाहण्याची क्षमता मानवात निर्माण होणे अनिवार्य आहे आणि मगच त्याच्यात सहअस्तित्वाची भावना निर्माण होऊ शकेल. आज मानवाने व्यापक होण्याची आवश्यकता आहे. ह्या दृष्टीने हे विचार महत्वपूर्ण आहे.

- ज्ञानग्रहण हे ज्ञाताकडून अज्ञाताकडे होते.
- स्थानिकतेकडून वैश्विकतेपर्यंत नेणारे ज्ञान असावे.
- जे ज्ञान पाठयपुस्तकात मिळत नाही ते ज्ञान बाहेरून प्राप्त करण्याची क्षमता व्यक्तीत निर्माण करायला हवी.
- संस्कृत भाषेचे अध्ययन हे आवश्यक आहे.
- व्यक्ती हा पर्यावरणाचाच एक भाग आहे.

ज्ञान ग्रहणाची ही प्रक्रिया म्हणजे अध्यापनाचे एक फार महत्वाचे सूत्र आहे. तसेच ज्ञान हे स्थानिक पासून ते वैश्विकते पर्यंत नेणारे असावे. हा विचार NCF २००५ ने ही व्यक्त केला आहे. ज्ञान हे स्थानिक स्तरावरुनच विकसित व्हावे पण आज आपण सर्वांना एकसारखे शिक्षण देत आहोत. स्थानिक गरजांचा विचार ह्यात होतांना आपल्याला आढळत नाही. परिणामी स्थानिक ज्ञान विद्यार्थ्यांना मिळत नाही. स्थानिक ज्ञान स्थानिक भाषेमध्ये मिळाल्यास त्या बालकाची प्रगती ही शक्य होते पण तसे होतांना दिसत नाही. आज जास्तीत जास्त बालके खेड्यात राहतात. काही दुर्गम भागात राहतात. त्यांच्या स्थानिक गरजा भिन्न असतात. ह्याची दखल आता शिक्षणाने घेतली आहे व त्या बाबतीत सकारात्मक पावले उचलल्या गेलेली आहेत. ह्या परिस्थितीत प.पू. गुरुदेवांची ही विचारधारा अत्यंत मार्गदर्शक ठरते. शिक्षण हे बऱ्याचशा प्रमाणात पाठ्यपुस्तक केंद्री झाले आहे. ह्याची खंत ही आधुनिक शिक्षणानेही व्यक्त केली आहे. NCF २००५ ने तर नमूद केले आहे की, भूगोला सारखा विषय हा मुलांना पाठ्यपुस्तकापेक्षाही निरीक्षणातून जास्त कळतो ह्या दृष्टीने त्यात शिक्षकांना बाह्य

परिसरातून शिक्षण देण्याबाबत ह्यात सुचविले आहे. ह्या दृष्टीनेही गुरुदेवांचे विचार अत्यंत मार्गदर्शक आहेत.

वास्तविक पाहता प.पू. गुरुदेवांचा प्रत्येक विचार हा आधुनिक काळात अत्यंत महत्वपूर्ण आहे. हे वरील विवेचनावरुन आपणास लक्षात येते.

## ४.६) नवनवीन संकल्पना :-

प्रस्तुत प्रकल्पातील एक उद्दिष्ट म्हणजे ''स्वामी चिन्मयानंदांच्या विचारातून नविनतम संकल्पनांचा शोध घेणे''. ह्या मुद्यास अनुसरून खालील प्रमाणे विश्लेषण देण्यांत येत आहे.

प.पू. गुरुदेवांचे विचार हे अत्यंत सर्जनशील व कृतीशील आहे. प्रत्येक आध्यात्मिक संज्ञेकडे पाहण्याचा दृष्टिकोनच नव्हे तर अध्यात्माकडे पाहण्याचा दृष्टिकोन त्यांचा कृतीशील व सृजनशील आहे आणि म्हणूनच त्यांनी आपल्या तत्वज्ञानामध्ये अनेक नवनवीन संकल्पना मांडल्या. आधुनिक विज्ञानाचाही विचार त्यांनी कला आहे. ह्या संकल्पना सर्वामान्यपणे पुढीलप्रमाणे आहेत.

### १) बुध्दीयोग :-

भारतीय तत्वज्ञानाने ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तीयाग हे तीन साधना मार्ग सांगितले व त्यावरी भारतीय तत्वज्ञानात विस्तृत भाष्यही करण्यात आलेले आहे. गुरुदेवांनी मांडलेला हा ''बुध्दीयोग'' ही संकल्पना मानवाकरिता अतिशय मार्गदर्शक ठरते. ही संकल्पना गीता अध्याय तीन वरील भाष्यात समाविष्ठ आहे. बुध्दी ही निश्चयात्मिका असते तर मन हे संकल्प विकल्पात्मक असते. विचार जेव्हा गोंधळलेले व विक्षेपीत असतात तेव्हा त्यांना मन असे म्हणतात आणि विचार जेहा एकाग्र शांत अविक्षेपीत निश्चयी असतात तेव्हा त्यांना बुध्दी म्हणतात. म्हणून बुध्दी योग म्हणजे बुध्दीशी एकनिष्ठ होऊन त्यात स्थीर राहणे. व्यक्तिचे मन त्याच्या विवेकबुध्दीच्या पूर्णपणे नियंत्रणाखली ठेऊन निश्चयाने तुमच्या आंतरिक बाह्य कर्मावर पूर्ण ताबा ठेऊन राहणे ह्याला बुध्दीयोग म्हणतात. जी बुध्दी मनाचे सर्वंकष नियंत्रण करते व मन आज्ञाधारकपणे जिच्या नियंत्रणाखाली येते. अशा बुध्दीच्या स्तरावर व्यक्तिने राहण्याचा व कर्म करण्याचा केलेला प्रयत्न बुध्दीच्या सहकार्यात मन कर्म करण्याचा केलेला प्रयत्न बाह्य मनाने अंतर्मनाच्या नियंत्रणाखाली व त्याच्या आज्ञेत कर्म करण्याचा केलेला प्रयत्न म्हणजे बुध्दीयोग होय. असे केल्याने नवनवीन वासना बंध निर्माण करीत जाण्याऐवजी व्यक्ती तिच्या अंत:करणात आधी असलेल्या वासनांच्या दाट थरापासून मुक्त होत जाते.

अशाप्रकारे जेव्हा एखादी व्यक्ती तिचा अहंकार पूर्णपणे समर्पित करते तेव्हा ती व्यक्ती बुध्दी योगात स्थीत आहे असे समजण्यात येते. मानवाची बुध्दी ही मन काबूत आणण्यात यशस्वी करण्याची पात्रता मानवी बुध्दीत निर्माण करणे ही बाब प्रत्येक व्यक्तीकरिता व्यक्तिगत प्रगतीच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्वाची आहे.

## २) **Economics of Thought :-**

वास्तविक प्राचीन भारतीय तत्वज्ञानाने ही संकल्पना दिली. प.पू. गुरुदेवांनी गीता अध्याय ३ च्या विवेचनात ह्याचे विश्लेषित रुप मांडले आहे. 'मानव निर्माण की कला' ह्या पुस्तकातही ह्या सिध्दांताचा संदर्भ आलेला आहे. ह्या सिध्दाताचे विवेचन करतांना गुरुदेव म्हणतात, ''मानवी पुरवठ्याच्या सिध्दांतानुसार जेव्हा आम्ही विषयाची मागणी करतो तेव्हा विषय आमच्याकडे येतात व ह्या विषयाची मागणी होत नाही तेव्हा त्याचा पुरवठाही होत नाही. जो व्यक्ती विषयाचे ग्रहण करीत नाही तो विषयापासून निवृत्त होतो, असे अनेक लोक आहेत. ज्यांनी अनेक वर्षापूर्वी सिगारेट सोडली होती पण आजही ते त्याचे सेवन करीत आहेत. मागणीचा रस सुप्त रुपात व्यक्तीत राहतो आणि भविष्यात चुकूनही अनुकूल पदार्थ अथवा परिस्थिती ह्यांच्या संपर्कात तो येतो तेव्हा त्याच्या वासना पुनश्च प्रगट होतात. जेथे आत्मसंचय नाही तेथे कोणतेच सद्‌गुण रहात नाहीत. असंयमी व्यक्तीस सत्‌शिक्षा योग्य वाटत नाही. त्याचा सांस्कृतिक विकासही होत नाही. विषयाच्या मागे धावणारे त्याचे मन हे पूर्णत्वाच्या प्रसादापासून वंचित होते. बुध्दीमान व्यक्ती सुध्दा विषयाच्या आकर्षणाने मोहित होऊन मुर्खतापूर्ण कार्य करतो. आत्मसंचयाबाबत सर्व धर्म घोषणा करतात. सदाचार, नैतिक मूल्य हे केव्हाही प्रशंसनीयच आहेत पण ते जीवनाचे अभिन्न अंग कसे बनतील जर ह्याची प्रक्रिया सांगितली नाही तर नैतिक उपदेश हा एकप्रकारचा धोकाच ठरेल. आपल्या संकल्पशक्तीच्या जोरावर आपल्या बहिर्मुख प्रवृत्तीला रोखायला हवे. आवडत्या वस्तुवरुन आपण आपले मन तात्काळ वापस आणू शकतो पण तसे घडत नाही. ते वारंवार पुन्हा पुन्हा त्याच विषयवस्तुंवर जाते. पण वारंवार प्रयत्नाने ते पुन्हा वापस आणता येईल. आपल्या संकल्प शक्तीच्या जोरावर आपले बहिर्मुख मन आपणास वापस आणता येईल व हे वापस आणलेले मन रचनात्मक कार्याकरिता वापरता येईल. उच्च ध्येयाच्या प्रति त्याची दिशा बदलावी लागेल. मनाला उच्च

आदर्शाचे ध्येय प्रदान करावे लागेल. त्याला चैतन्याचा स्त्रोत बनवावे लागेल. अतिक्रियाशील मनाच्या माध्यमातून जीवनात सफलता प्रदान करता येईल.

अंतीमत: जीवनात साफल्य प्राप्त करणे, सार्थक जीवन प्राप्त करणे हे मानवाचे जीवनध्येय असते. ही सार्थकता संपादन करण्यासाठी मनाला प्रशिक्षण देणे ही बाब महत्वाची ठरते. त्यादृष्टिकोनातून गुरुदेवांचा Law of Economics of Thoughts हा सिध्दांत महत्वाचा ठरतो.

## हिंदु समाजवाद :-

हिंदु समाजवाद ही संकल्पना मांडतांना गुरुदेव म्हणतात, ''परम दिव्य सत्तेस मान्यता हा हिंदु समाजवादाचा आधार आहे. हे विश्व म्हणजे त्या अनंतत्वाची अभिव्यक्ती आहे. म्हणूनच सर्वांना आपल्या जीवनात प्रेम, सहायता आणि दानवृत्ती ह्याचा स्विकार करावा लागेल. समाज सहाय्यामध्ये जेवढा त्याचा अहंकार अभिव्यक्त होईल. तेवढाच प्रत्येक व्यक्ती आपल्या स्वार्थाकरिता एकमेकांना धोका देईल. एकमेकांना अनन्वीत लाभ प्राप्त करेल. लवकरच धनामध्ये विषमता उत्पन्न होऊन त्यामुळे वर्गकलह जाती जाती समस्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ताणतणाव सुरु होतात. त्यामुळे सर्वप्रथम लोकांच्या हृदयाची शांती भग पावते. त्यानंतर समाजाची शांतता भंग पावून राष्ट्रीय विघटनास आरंभ होतो. परिणामी आंतरराष्ट्रीय युध्द सुरु होतात. हिंदु मान्यतेनुसार हे संपूर्ण विश्व घर आहे. संपूर्ण प्राणी त्याचे निवासी आहेत. सामुहिक प्रयत्नाच्या माध्यमातून जर काही त्यांना प्राप्ती झाली असेल तर ती त्यांनी आपसात वाटून घ्यायला हवी. हे वितरण आवश्यकतेनुसार नको तर समान वितरण हवे. इतिहासाच्या कोणत्याही काळात उत्पादक थोडे तर उपभोगक्ती जास्त आहेत. समाज सेवेसाठी आपलया साऱ्या क्षमता लावणारे सज्जन पुरुष सर्व पापापासून मुक्त होतात. अशा व्यक्तिचे त्याच्या जीवनात कोणती कर्तव्य शेष रहात नाहीत. समाजाचे त्याच्यावर कोणतेही ऋण रहात नाही. परिणामी ते सामाजिक चोर नाही. नियम कर्माचे संपादन जेव्हा बिना अहंकार किंवा अहंकार रहीत कामनांनी केले जाते तेव्हा वर्तमान वासनांचा क्षय होतो. नवीन वासना उत्पन्न होऊ शकत नाही. अशी जीवन पध्दती हा हिंदु समाजवाद आहे. प्रत्येकास सर्वांच्या कल्याणासाठी अधिकाधिक उत्पादन करुन कठोर परिश्रम करुन समाजाकडून फक्त आपल्या हिस्स्याचा अन्य

भाग घ्यायचा आहे. अशा पध्दतीने वर्तन करणाऱ्या व्यक्तीचे कोणतेही कर्तव्य शेष रहात नाही व आपल्या भागाच्या उपभोगाचे स्वातंत्र त्यांना राहते. अर्थात हिंदु समाजवादाची मांडणी करीत असतांना हिंदु धर्माचा समाज कल्याणकारी दृष्टिकोन प.पू. गुरुदेवांनी मांडला आहे. समाज ऋण फेडण्याची संकल्पना ह्यात आहे. परिणामी आपल्या उत्पन्नाचा हिस्स्याचे समाजात वाटप करीत असतांना धनकोची भूमिका उपकार कर्त्याची राहणार नाही तर तो स्वत: ऋणको असेल. समाजाचे आपल्यावर ऋण आहे ही भावना व्यक्तीच्या मनात निर्माण होणे व ती दृढ करणे ही बाब ह्यासाठी महत्वाची ठरते. प्रश्नोपनिषदातील शंतीपाठा वर भाष्य करतांना गुरुदेव म्हणतात, ह्या प्रार्थनेत आपणास हिंदु समाजवादाचे 'दासकॅपिटल' आढळते. समाजातील जातीतील प्रत्येकजण उत्कटतेने मनापासून केवळ मांगल्यास भेटावे म्हणून इच्छा करील.

## अध्यात्मवादी वास्तववाद :-

वास्तविक गुरुदेव हे अध्यात्मवादी आहेत. वेदांताचे अभ्यासक व प्रचारक आहेत. पण वास्तव समाजाचे दर्शन त्यांना जे घडले त्यातूनच आज लोकांना आध्यात्म्याची वेदांताची आवश्यकता आहे. ह्या प्रेरणेतून त्यांच्या मनात 'गंगोत्री योजने'चा उगम झाला. त्यांनी काही ठिकाणी अध्यात्माचा वास्तववादातून विचार केल्याचे आपणास जाणवते. ते म्हणतात, जर कोणतेही जीवनविषयक तत्वज्ञान खूप आकर्षक असेल पण त्याचे व्यावहारिक रुप क्लिष्ट असेल तर ते आदर्श स्वप्नवत राहते. ते व्यावसायिक जीवन पध्दतीचे रुप होऊ शकत नाही. आमच्या पूर्वजांना असा आदर्शवाद मान्य नव्हता. ज्यांची मुळे वास्तवात नाही आणि ज्याचा अवलंब वास्तविक जीवनात होऊ शकणार नाही. ऋषी हे स्वत:ला जीवन समस्यांपासून वाचविणारे नव्हते. अथवा केवळ कल्पनेत रमणारे नव्हते ते सामंजस्य शांती सौंदर्य सेवायुक्त जीवन जगावयास उत्सुक होते. भारतीय तत्वज्ञानावर निष्क्रीयतेचा व भारतीय प्राचीन ऋषींवर पळपुटेपणाचा आक्षेप लावणाऱ्या लोकांना हे उत्तर आहे. भारतीय तत्वज्ञान अध्यात्मिक कल्पनेत रमणारे नाही ते वास्तव आहे, नव्हे ते जीवनाचे अधिष्ठान आहे.

## जन्मसिध्द मानवी हक्क अधिकार :-

मानवी अधिकाराबाबत प.पू. गुरुदेवांनी भाष्य केले आहे ते म्हणतात, ''मानवाला स्वत:ची उन्नती करुन घेण्याचे स्वातंत्र्य दिलेले असते. प्राणी किंवा वनस्पती यांना न मिळालेल्या विवेक शक्तीमुळे हे वैभव आपणास मिळाले आहे. सिंह हे हरिणांना ठार मारणारच कारण मारणे हे त्यांची सहजप्रवृत्ती असते. वृक्ष त्यांच्या शाखाखाली येणाऱ्या प्रत्येकाला अहेतूकपणे सावली देतो ते काही तो मोठा अगत्यशील असतो म्हणून नव्हे तर त्याने जे काही करावे म्हणून नेमून दिले असते. त्याहून दुसरे ते काहीही करु शकत नाही. जीवनाच्या त्या निम्न स्तरामध्ये ते केवळ स्वसंरक्षणाच्या सहजप्रवृतीने नियमीत केले जाते. परंतु मानवाच्या अवस्थेला आल्यावर त्याला विवेकशक्ती दिली गेली असल्याने तो स्वत:च्या सहजप्रवृत्तीला बळी पडत नाही. तर त्याला पाहिजे असेल तर तो निम्न पशुवृत्तीच्या वर उन्नत होऊ शकेल आणि अशा प्रकारे स्वत:वरुन पूर्ण प्रभुत्व मिळविण्याचा अधिकार प्राप्त करु शकेल. हा मानवाचा विशेषाधिकार आहे. अर्थात स्वत:ची उन्नती करुन घेणे हा मानवाचा विशेषाधिकार आहे. आध्यत्मिक अधिकार हा मानवाचा सर्वश्रेष्ठ अधिकार आहे. आध्यात्मिक व्यक्तित्व असणाऱ्या मानवाच्या स्वभावातील सत्याचा आणि शाश्वत स्वरुपाचा शोध ही ईश्वराकडून अथवा युगाकडून मिळालेली आकस्मिक देणगी नाही. स्वत:चे सत्यस्वरुप जाणून घेणे हा मानवाचा जन्मसिध्द हक्क आहे.

''तू पाप्यातील पापी असलास तरी तू देखील तुझे हल्लीचे दु:खदायक जीवन ओलांडून अपूर्ण व नाशवंत जीवनाच्या पलीकडील तीरावर जाऊन पोहोचशील'', असे आश्वासन आपल्या ग्रंथांनी दिले आहे. आपण ईश्वरी अंश आहोत असे मानण्याचा हक्क मानवाला आहे. हाच मानवाचा आध्यात्मिक अधिकार आहे.

## वैश्विक नागरिकत्व :-

आजचे युग हे वैश्विकतेचे युग आहे. या काळात वैश्विक खेड्याची संकल्पना आकाराला आली आहे. अशा ह्या वैश्विक खेड्यात राहणारा नागरिक कसा असावा ह्याबद्दलचे मार्गदर्शन प.पू. गुरुदेवांच्या चिंतनातून सुटले नाही. कठोपनिषदाच्या विवेचनात म्हणतात,

''पूर्णत्व पावलेला मानव तोच जो देवत्वाच्या अनुभूतीच्या अवस्थेत सर्वस्व होण्याकरिता विकसित झालेला असतो आणि त्याला केवळ आपले नातेवाईक देशबांधव केवळ यांच्या बाबतच नव्हे तर सर्वांकरिता सारखीच संवेदना असते. असा पूर्ण विश्वात्मक प्रेम असलेला परिपूर्ण महात्मा केवळ जगाचा खरा नागरिक असतो.'' अर्थात विश्व नागरिकत्वासाठी सर्वांच्या प्रती समान दृष्टिकोन हवा ही बाब महत्वाची आहे.

**Spiritual Socialism :-**

चिन्मय युवा केंद्राच्या मागील स्थापनेच्या प.पू. गुरुदेवांचा दृष्टिकोन हा Dymanic Spirituality निर्माण करणे हा होता. पण त्याचबरोबर युवकांच्या माध्यमातून आदर्श समाज व्यवस्था त्यांना निर्माण करावयाची होती. Creascenda Peacks मध्ये त्याचा हा दृष्टिकोन व्यक्त करण्यात आला आहे. सर्व चांगली कामे चांगल्या कार्यकर्त्यास स्वयंपूर्ण (Self Sufficient) बनवितात. देशाच्या अर्थव्यवस्थेबाबत त्यांचा दृष्टिकोन समाजवादी होता. त्यांनी युवकांना निधी निर्माण समाजकार्याकरिता वापरण्याबाबत कल्याणकारी दृष्टिकोन दिला जेव्हा जेव्हा युवक असा निधी गोळा करीत असतो तेव्हा तेव्हा त्यांचे वाक्य होते. "It is a great uplifting sense of joy and self respect when with our own creative thoughts we produce wealth. I am all the more glad to note that the wealth so produced has been volantarily surrendered for the benifit of the chyk community". ह्या ठिकाणी त्यांचा आदर्श समाजवाद होता. Socialism in action ही नाविण्यपूर्ण संकल्पना त्यांनी मांडली. All the member of community would use their faculties for creating wealth usefully and satisfaction if that within is freeiy and readily offered for the welfare of the society that is socialism in action". प.पू. गुरुदेवांचे हे विचार लोककल्याणकारी समाजकल्याणकारी आहेत.

**आध्यात्मिक कार्यवाद (Spiritual Progmatism) :–**

कार्यवादी तत्वज्ञानता अनुभवांच्या पुन:संयोजनाला व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने महत्वाचे स्थान देण्यात आले आहे व त्यात अनुभव घेणाऱ्या व्यक्तिला येणारे अनुभव

शैक्षणिक व अशैक्षणिक असे दोन प्रकारचे असतात. अर्थात ज्या अनुभवातून व्यक्ती शिकतो ते शैक्षणिक अनुभव होय. अशा शेक्षणिक अनुभवातून व्यक्तीच्या अनुभवाचा साठा समृध्द होतो व त्याचे शिक्षण होते. पण कार्यवादाची मर्यादा ही की अनुभव प्रक्रियेचे वर्णन करण्यास कार्यवाद अपुरा पडला आहे. कार्यवादाची ही मर्यादा गुरुदेवाच्या पुढील विवेचनातून दूर होते. 'जीवनज्योत' ह्या पुस्तकात ते म्हणतात, ''जीवन ही अनुभवांची अखंड मालीका आहे. वीट हे जसे भितीचे परिमाण आहे. त्याचप्रमाणे अनुभव हे जीवनाचे परिमाण आहे. भिंतीचा पक्केपणा व कमकुवतपणा हा ती बांधतांना वापरलेलया विटांच्या प्रकारावर व घडणीवर अवलंबून असतो. त्याचप्रमाणे अनुभव हे जीवनाचे घटक असल्यामुळे ती व्यक्ती कोणत्या प्रकारचे जीवन जगत आहे हे त्यावरुन ठरते. अनुभव सुखद असतील तर जीवन सुखी असते व अनुभव दु:खद असतील तर जीवन दु:खी असते. आपल्या अनुभवांना योग्य वळण देणे, हा जीवनातील समस्या सोडविण्याचा उपाय आहे. हा अनुभव घेण्यासाठी तीन घटकांची आवश्यकता आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अनुभावक | - | अनुभव देणारा |
| २) | अनुभाव्य | - | ज्याचा अनुभव घेतला जातो ती वस्तु |
| ३) | संबंध | - | अनुभावक व अनुभाव्य ह्यातील संबंध |

अनुभव हा शारीरिक, भावनात्मक, बौध्दिक आणि आध्यात्मिक अशा चार निरनिराळ्या व्यक्तिमत्वाच्या बांधणीने बनलेला असतो. जेव्हा अनुभावक एखाद्या वस्तुच्या संपर्कात येतो तेव्हा त्याच्या आंतरिक व्यक्तिमत्वाच्या चार स्तरावरुन कार्य करणाऱ्या चार निरनिराळ्या अनुभव उपकरणांनी तो त्या वस्तुशी संपर्क साधतो. ह्या चार पैकी प्रत्येक व्यक्तिमत्व वेगळे बनले असते. प्रत्येकास त्याची मूल्ये व मागण्या असतात. वस्तुमुळे निर्माण होणाऱ्या प्रत्येक घटनेमध्ये चारही व्यक्तिमत्वे अनुभव घेण्यासाठी सिध्द असतात. हे चारही व्यक्तिमत्व जेव्हा एखाद्या वस्तुच्या व्यक्तिच्या संपर्कात येतात तेव्हा त्याच्या एका वा दोन व्यक्तिमत्वाला समाधान प्राप्त होते. इतर व्यक्तिमत्वामध्ये असमाधानाचीच भावना असते. परिणामी त्यांच्या व्यक्तिमत्वामध्ये संघर्ष उत्पन्न होऊन ताण निर्माण होतो. परंतु ह्यामध्ये एकसंघपणा व सुसंघटीतपणा असणे आवश्यक आहे. व्यक्तिमत्वामध्ये जेवढी एकसंघता येईल तेवढाच प्राप्त होणारा अनुभव हा आनंददायी ठरेल व ह्यातून मानवाच्या जीवनात शांतता व

स्थैर्य ह्यांची प्राप्ती होईल.

अनुभव व व्यक्तिमत्व विकास ह्यामधील हा सहसंबंध गुरुदेवांनी व्यक्त केला आहे व त्याच्या माध्यमातून केवळ अनुभवाचीच प्रक्रिया नाही तर त्याचा व्यक्तिमत्वावर होणारा परिणामही त्यांनी विषद केला आहे.

## मानवी बौध्दिक उत्क्रांतीचे टप्पे :-

पाश्चात्य तत्वज्ञानात डार्विनने मानवाचा उत्क्रांतीवाद सांगितला. पण मानवी बुध्दीचा उत्क्रांतीवाद ह्यावर गुरुदेवांनी भाष्य केले आहे. बौध्दिक उत्क्रांतीवादात मानवी बुध्दीमत्ता ही कोणत्या पध्दतीने कशी विकसित होत गेली व आज ती कोणत्या स्तरावर आहे ह्याचे विवेचन आपणास आढळते. मानवी बुध्दीमत्ता विकासाचे गुरुदेवांनी चार युग सागितले आहे. ते पुढीलप्रमाणे -

### १) अवलोकन युग :-

मानवी इतिहासाच्या सुरवातीला सारासार विचार आणि ज्ञान ह्या ऐवजी सहजप्रवृत्ती मनोविकार ह्यानुसारच वागत असे. तो निसर्ग चमत्कार व घडामोडी ह्याचे अवलोकन करीत असे. त्याचे हे अवलोकन प्राण्याच्या अवलोकनापेक्षा श्रेष्ठ नव्हते. आजुबाजूची परिस्थिती अनुकूल असे तेव्हा तो आनंदी होई व प्रतिकूल असे तेव्हा त्याला दु:ख होत असे व तो क्लेश सहन करीत असे. पण तो जे अवलोकन करी त्याबाबत त्याने कधीही का? व कसे? हे प्रश्न विचारले नाहीत व त्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला नाही.

### २) निरिक्षणाचे युग :-

ह्या युगात मानवाचे फक्त अवलोकनाने समाधान होत नव्हते. त्याच्या भोवतालच्या घटनाबाबत तो का? व कसे? हे प्रश्न करायला लागला. त्याची बुध्दी कार्यकारण भाव शोधू लागली. मानव जसजसा विकसित झाला तसतसा तो जास्त निरिक्षणक्षम होऊ लागला. अद्भूत निसर्गशक्तीबद्दल आश्चर्य व्यक्त करु लागला. कार्यकारणभाव तो शोधायला लागला. ही कारणे शास्त्रशुध्द विचार व तर्क ह्या पलीकडची असत.

## ३) शास्त्रीय युग :-

मानव जसजसा उत्क्रांत झाला तसतसा तो शास्त्रीय युगात पुढे सरकला. आपल्या भोवती व आपल्या विषयीच्या आणि आपल्या भोवतालच्या बाबीचे घटनांचे कारण शोधू लागला. अद्भूत जगाची त्याने तपासणी केली. ह्याबाबत सत्य बाबी त्याने संग्रहित केल्यात. त्यावर काही प्रयोग केले त्यातून बुध्दीगम्य व तर्कशुध्द अनुमाने काढली. त्यातून निघणाऱ्या नियमांची पध्दतशीर मांडणी केली. परिणामी अंधश्रध्दा व स्वैर समजुती ह्याची जागा शास्त्रीय सत्याने घेतली. हे शोध घेण्याचे कार्य सुरुच राहिले. समाजाच्या कल्याणासाठी सुरुच राहिले. पदार्थ विज्ञान आणि रसायनशास्त्रज्ञ वनस्पती शास्त्रज्ञ व गणितज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ आजही प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहे.

## ४) चिंतनयुग :-

संशोधनाचा पाठपुरावा करतांना एक वेळ अशी येते की, निरनिराळ्या निसर्ग नियमामध्ये प्रगट होणारा सुसंवाद आणि त्याची तालबध्दता याबद्दल तो आश्चर्य करतो. ह्या सगळ्या अनुशासनावर अधिसत्ता चालविणारा शाश्वत नियमांचा पुरस्कर्ता कोण असावा ह्याबाबत मग मानव चिंतन करण्यास सुरवात करतो. ह्याप्रमाणे त्याचे वस्तुनिष्ठ शोधन पध्दतीचे पर्यवसान चिंतनामध्ये उन्नत होते. हीच मानवाची चिंतनयुगात प्रविष्ठ होण्याची खूण आहे.

मानवी बुध्दीच्या उत्क्रांतीचे हे टप्पे पाहता चिंतनयुग ही मानवी उत्क्रांतीची पूर्णावस्था आहे व ह्या अवस्थेप्रत आपले धार्मिक महात्मे पोहोचले आहेत. कारण तत्वज्ञान व धर्म ह्यांचा संबंध आपल्या बुध्दीच्या चौथ्या टप्प्याशी येतो. हा शास्त्रीय ज्ञानाचा पुढचा टप्पा आहे. दुर्दैवाची बाब ही की विज्ञानाने ही बाब मानली नाही व त्याने धर्माचा धिक्कार केला. तत्वज्ञान व धर्माने लावलेले शोध हे विज्ञानाच्या कितीतरी पलीकडचे आहेत आणि म्हणूनच ते नियमांचे नियम व ज्ञानाचेही ज्ञान आहे.

## जन्मपूर्व शिक्षण :-

गुरुदेवांनी जन्मपूर्व शिक्षणवर अतिशय भर दिला अहे. माता गर्भावस्थेत जे अनुभव घेते त्याचे संस्कार हे तिच्या बालकांचे जन्मपूर्व संस्कार असतात. ह्यावर गुरुदेवांचा ठाम विश्वास होता. ऐतरीयोपनिषाच्या विवेचनात गुरुदेवांनी हा विचार व्यक्त केला आहे. ते म्हणतात, ''पुरातन काळात स्त्रीयांना वेद शिक्षण्यासाठी ऋषीमुनींकडे जाण्याची पूर्ण मुभा होती. पाश्चात्य देशात आजही Prenatal Education ची संकल्पना मांडण्यात आली आहे. ते विचार आमच्या ऋषीमुनींनी फार पूर्वी मांडले होते. त्यांनी केवळ गर्भावस्थेत स्त्रीच्या मनात शुध्द सात्विक विचार बाळगावेत. याचे जोरदार समर्थन केले नाही तर त्याहीपुढे जाऊन तिच्या मनात विषयासक्त विचार येऊ नये ह्याची काळजी घेण्याबाबत सूचित केले आहे. ''गर्भवती स्त्रीयांनो कृपया मुक्त व्हा.'' हा धर्माने दिलेला आदेश आहे. मूल गर्भावस्थेत असतांना शिक्षण देणे ही संकल्पना हिंदु तत्वज्ञानात आहे. ऐतरेयोपनिषदात असा उल्लेख आहे. ज्यात गुरुसभेतील गर्भवती स्त्रीयांना थोडा वेळ बाजूला जाण्याची विनंती करण्यात आली आहे. खंडाच्या शेवटी पुन्हा अभ्यास कक्षात परत येण्याबाबत गुरुचा आदेश आहे. ह्याचे अर्थ निर्वचन करतांना गुरुदेव म्हणतात, पूर्वी वेदाच्या अभ्यासक हिंदू स्त्रीयाही होत्या. पण पुढे हिंदू धर्म अवकळेला लागला आणि त्याच्या अवनतीच्या काळात स्वार्थी पुरोहित वर्गाने परंपरेची दैदिप्यमान शुध्दता आणि तिचे निरोगी सामर्थ्य हेतुपुरस्पर नष्ट केले. स्त्रीयांना दूर जाण्याचा जो आदेश दिला होता. तो सर्व स्त्रीयांना दिला नव्हतो. तो फक्त गरोदर स्त्रीयांना होता. त्यांनाच निवृत्त होण्यास सांगण्यात येत असे. ह्या काळात मानसशास्त्र अतिशय प्रगत होते. आज पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये जन्मपूर्व शिक्षणाची पध्दत सिध्दांत उदयाला आला व पाश्चिमात्य ह्या सिध्दांताचे शोधक आपण आहोत. ह्या भ्रमात रहात आहेत. पण जेव्हा आपण प्राचीन हिंदु वाङ:मयाकडे वळतो तेव्हा आपल्याला आढळून येते की, हा सिध्दांत भारतात वैदिक काळापासून अस्तित्वात आहे. मातेने सेवन केलेल्या अन्नाचे सात्मिकरण झाल्यावर जर ते तिच्या गर्भाशियातील भ्रुणाच्या शरीराच्या आणि आकाराच्या निर्मितीसाठी उपयोगात येते तर मन सहाजिकच मातेच्या गरोदर पणातील विचार मुलांच्या वैचारिक घडणीला दिशा आणि प्रेरणा अधिक प्रमाणात देत असले पाहिजे. ज्या मातेला तिच्या गोदरपणात एखादा तीव्र मानसिक धक्का किंवा भीती बसली असेल अशा मातांना झालेल्या बालकांना उन्मादवायू, मानसिक

दुर्बलता इत्यादी आजार उद्‌भवण्याची अनेक उदाहरणे आढळून आली आहेत. तसेच जी आधुनिक माता हिंसक चित्रपटात रमते आणि आपल्या संध्याकाळचा वेळ वैषेयिाक चैनित किंवा अतिरेकात घालविते आणि हीन लालसांचे जीवन जगते. ती आपल्या भावी मुलांचे चारित्र्य जाणीवपूर्वक अशारितीने घडवित असते की, अशा मातांना झालेली मुले वयात येण्याच्या पूर्वीच सार्वजनिक अनैतिकतेच्या क्षेत्रात राष्ट्रीय समस्या निर्माण करतात.

Prenatal Education ही संकल्पना आता पाश्चात्य राष्ट्रात सुध्दा रुजते आहे. ह्या संकल्पनेवर प.पू. गुरुदेवांनी विशेष प्रकाशझोत टाकला आहे.

**Cultural Revival Plan :-**

Catch them young ह्या लेखात त्यांनी ही नावीण्यपूर्ण संकल्पना मांडली आहे. ते म्हणतात, "Our culture Revival plan must have necessarily a minimum of three schemes. Schemes to revive (a) The manhood, b) The womanhood, e) The childhood. Man and women are taken up for reeducation and rehabilitation togather and separately.

**सहअस्तित्वाचा पाया :–**

Law of Co-existence हा नवीन युगाचा महामंत्र आहे. ह्याचे आध्यात्मिक अधिष्ठान जोवर मानवाला समजत नाही. तोवर ह्या नियमाचे पालन समाजात होत नाही. हे आध्यात्मिक अधिकोन गुरुदेवांनी गीता अध्याय याचे विवेचन करतांना स्पष्ट केले आहे. ते म्हणतात, ''आत्म स्वरुपाचा अनुभव आल्यावर योगी सर्व विश्व म्हणजे आपणच आहोत असे ओळखतो आणि स्वत:च्या उजव्या पायावर प्रेम करावे की करु नये असा प्रश्न जगामध्ये कुणालही पडत नाही. स्वत:च्या शरीराचे सर्व अवयव प्रत्येक व्यक्तिला सारखेच प्रिय असतात. कारण शरीरातील वेगवेगळ्या भागातील स्वत:च्या घनिष्ठ तत्वाचा त्याला सहजपणेच अनुभव येत असतो. तुमच्या दातांनी जर नकळत तुमची जीभ चावली तर त्या गुन्ह्यासाठी दातांना शिक्षा करण्याचे तुमच्या मनातही येणार नाही कारण जीभ व दात दोन्हीमध्ये तुम्ही स्वत: सारखेच राहिलेले असतात. नामरुपाचे हे विश्व माझ्या दृष्टीने एकसंघ रुप होते. ही सर्व

जळीस्थळी सर्वकाळी केवळ मीच असतो. आज मानवाचा हा दृष्टिकोन विकसित होण्याची आवश्यकता आहे.

## उद्योजकतेचे आध्यात्मिक अधिष्ठान :-

उद्योजकतेचे आध्यात्मिक अधिष्ठान गुरुदेवांनी गीता अध्याय ९ च्या विवेचनात उदाहरण म्हणून व्यक्त केले आहे. ते म्हणतात, “कोणत्याही उद्योगात मनुष्य जर आपले काम इच्छित विचार (संकल्प) ध्येयाच्या एकाग्रतेने व सतत ओतू शकत असेल तर तो खात्रीने यशस्वी होईल. परंतु दुर्दैवाने सामान्य मनुष्य त्याचे विचार यशस्वीरित्या विचारांच्या एकाच चाकोरीत ठेवू शकत नाही. म्हणून त्याचे ध्येय सदा बदलत असल्याने ते गाठण्याचा त्याचा निश्चय ही बदलत असतो. अशा अनिश्चयी मनुष्याची कोणत्याही उद्योगाच्या मार्गात कधीही प्रगती होणे शक्य नाही. केवळ विचारच निर्मिती करु शकतात. नुसती कृती नाही. हे उघड सत्य आपण नाकारतो हीच युगाची मोठी शोकांतिका असावी. पोषण देणाऱ्या विचार शक्तीपासून कृतींना सामर्थ्य मिळत असते. पोषण देणारी शक्ती जेव्हा गुदमरते व क्षीण होते तेव्हा बाहेरच्या कृतींना कार्यान्वित करणारी शक्तीही सामर्थ्य आणि कार्यक्षमतेच्या दृष्टीनी कमजोर होते. एकाग्र मनात उत्पन्न होणारे, व्यक्तीने स्वत:च्या जीवनात स्वत:साठी निवडलेले निश्चित ध्येय प्राप्त करण्यासाठी तिने एकाग्र चित्ताने केलेले विचार पूर्ण महत्वाकांक्षा उत्साह आणि जोम ह्यामधून ते अखंडपणे वाहू दिले पाहिजे. निव्वळ विचार करणे हे ही पुरेसे नाही. कर्म हे नि:संशय आवश्यक आहे. आजकालचे बरेचसे तत्व जरी ते आपल्या बुध्दीत आयुष्याचे एखादे ध्येय सुसूत्रपणे राखू शकत असते तरी प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात उतरुन ह्या ध्येयाच्या सिध्दतेकरिता जास्तीत जास्त कार्य करण्यास तयार नसतात. जीवनात ज्याच्या शिवाय यश संपादन होऊ शकत नाही असे दोन घटक आहेत. १) इच्छा आणि विचार ह्यांची सुसंगती, २) एखाद्या प्रसंगाला पूर्णपणे तोंड देण्यासाठी ध्येयात स्वत:ला झोकून देणे, ३) आत्मसंयमन.

अशा विविध नवनवीन संकल्पना त्यांच्या विचारसरणीत आढळतात.